शनिवार । २३ जानेवारी १९८२ । एक रुपया

माणूस

# ऑपरेशन-अंतुले....विरोधकांचा विजय

ज्या अर्थी अंतुले यांना मुख्यमंत्री पदावरून काढण्यासाठी इंदिरा गांधींना न्यायालयाची मदत घ्यावी लागली, त्या अर्थी अंतुले आणि त्यांचा गट बरीच ताकदवान होता (—आहे ?), हे उघड आहे. आपल्या मुख्यमंत्रीपदाचा अंतुल्यांनी राजीनामा दिल्यावरही पुन्हा अंतुलेच हवेत असे म्हणणारे, त्या दृष्टीने खटपट करणारे महाभाग संख्येने काही कमी नव्हते. दिल्लीतली एक कुजबूज तर अशी होती की, मध्यपूर्वेतील काही अरब देशही अंतुल्यांच्या बाजूने आपले वजन खर्च करीत होते. अंतुले हे इंदिरा गांधींना डोईजड होत होते, त्यांनी शेवटी शेवटी आव्हानात्मक पवित्रा घेतला होता, अशा अर्थाची खास वार्तापत्रेही काही मोठ्या समजल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेली होती. पण हे सगळे पवित्रे, डावपेच फोल ठरले, मुख्यमंत्रीपद टिकावे म्हणून अंतुल्यांनी केलेल्या सर्व खटपटी-लटपटी वाया गेल्या व न्या. लेंटिन यांनी निकाल दिला त्याच दिवशी अंतुल्यांनाही जावे लागले. लेंटिन यांचा एकच घाव, पण तो अगदी अंतुल्यांच्या मर्मावरच बसला. जणू रामशास्त्री आणि राघोबादादाच!

पण केवळ न्यायालयाचा विरुद्ध गेलेला निकाल किंवा भ्रष्टाचाराची दखल, एवढेच या अंतुले-गमनामागचे कारण आहे का ? न्यायालयाचा आदर इंदिरा गांधी ठेवतातच असा काही मागचा इतिहास नाही. अलाहबाद न्यायालयाचा निकाल आपल्या विरुद्ध गेल्यावर इंदिरा गांधींनी कुठे सत्ता सोडली ? उलट आणीबाणी पुकारून सगळीच सत्ता स्वतःकडे घेतली. तसेच भ्रष्टाचाराचे आहे. भ्रष्टाचारी म्हणून त्यांनी आजवर कुणाही मंत्र्याला काढलेले नाही. न्यायालयाने भ्रष्टाचारी म्हणून ठरवलेल्या मंडळींनाही त्यांनी पुन्हा, काही काळ जाऊ देऊन, पावन करून घेतलेले आहे-त्यांना सत्तास्थानेही बहाल केलेली आहेत. आजही अंतुले गेलेले असले तरी कर्नाटकात गुंडुराव, बिहारात मिश्रा वगैरे मंडळी सत्तास्थानांवर मौजूद आहेतच. तेव्हा न्यायालयाचा निकाल विरुद्ध गेला तरी अंतुल्यांना आणखी काही काळ सत्तेवर राहू देणे, इंदिरा गांधींना नैतिकदृष्ट्या मुळीच वर्ज नव्हते. तरीही अंतुल्यांचा राजीनामा तडकाफडकी स्वीकारला गेला, त्यांना सत्तेवरून दूर व्हा म्हणून सांगण्यात आले. असे का ? अंतुले डोईजड होण्याच्या प्रयत्नात असतीलच तर त्यांना ठिकाणावर आणणे हा एक उद्देश असणारच. पण त्याहीपेक्षा एक महत्त्वाचा उद्देश यामागे असावा. राजकीय विरोधक पुन्हा एकत्र येऊ लागलेले आहेत. नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकातून भाजप, डावे कम्युनिस्ट यांना विजय मिळालेले आहेत. जो आदिवासी विभाग संपूर्णपणे इंदिरामय असायला हवा, तेथेच भाजपने मुसंडी मारून दाखवलेली आहे. समाजवादी काँग्रेस, उजवे कम्युनिस्ट, जनता हे गट जरी नगण्य असले तरी चरणसिंग आणि वाजपेयी एका व्यासपीठावर येणे, उत्तर प्रदेशात त्यांनी संयुक्त पदयात्रा काढणे इंदिरा गांधींना कसे परवडू शकणार ? त्यातच अंतुले भ्रष्टाचाराचे प्रकरण विरोधकांना मिळाले तर त्यांचा जोर वाढणार, लोकमतही हळूहळू बदलत जाणार—विरोधकांकडे वळणार ! मागे असेच घडले. चिमणभाई, गफूर यांच्या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष केले आणि विरोधकांना हे खाद्यच ठरले. तीच चूक पुन्हा कशासाठी ? म्हणून इंदिरा गांधींनी ऑपरेशन-अंतुले तडकाफडकी करून टाकले असावे. भिवानीला जर विरोधक एकत्र आले नसते तर शक्यता होती की, अंतुल्यासंबंधीचा निर्णय थोडा लांबणीवरही पडला असता. वृत्तपत्रांच्या टीकेकडे इंदिरा गांधी दुर्लक्ष करू शकतात.

न्यायालयांचे निर्णयही त्यांनी धाब्यावर बसवले आहेत. भ्रष्टाचाराचेही त्यांना वावडे नाही. पण राजकीय विरोध ? तो मुळापासूनच उखडला पाहिजे. अंतुल्यांचा बळी यासाठी दिला गेला असण्याची शक्यता आहे.

¤

अंतुले मुख्यमंत्रीपदावरून जरी गेले असले तरी ते संपले असे कुणी मानू नये. एक तर राजकीय माणूस महत्त्वाकांक्षी असल्याने कधीही संपत नसतो. संन्यास घेऊन, स्वतःहून दूर गेलेले वृद्ध वसंतही मुख्यमंत्रीपदाची खुर्ची दिसताच, पुन्हा या खेळात सामील होतात तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदच काय, दिल्लीचे तख्तही हस्तगत करू पाहणारा तरुण व 'हिंमतबाज' राजकारणी, अशा एखाद्या पराभवाने धक्क्याने कायमचा गारद होईल, अशी कल्पनाच करणे चूक आहे. आज नाही उद्या, मुंबईत नाही दिल्लीत अंतुले पुन्हा डोके वर काढतील ! शिवाय अजूनही त्यांनी जमा केलेल्या कोटयवधी रुपयांच्या प्रतिष्ठानांचा प्रश्न अनिर्णितच आहे. अंतुल्यांचे 'उच्चाटन' झाले या आनंदात या खऱ्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होण्याची दाट शक्यता आहे. या प्रतिष्ठानांचा एकदा सोक्षमोक्ष लागून हा सगळा पैसा सरकारजमा झाल्याशिवाय अंतुले-हटाव मोहिमेची सांगता कशी होणार ? हा पैसा जोवर अंतुले वापरू शकतात तोवर त्यांची ही शक्ती राजकारणात प्रभाव गाजवल्याशिवाय राहणार नाही. कायदेशीर किंवा राजकीय उपाय योजून प्रतिष्ठानांचा हा सर्व पैसा म्हणूनच सरकारजमा केला पाहिजे ! हे अर्थातच इंदिरा गांधी करणार नाहीत. कारण अंतुल्यानी त्यांना अडचणीच्या काळात साथ दिली होती व त्याही या प्रतिष्ठान-प्रकरणात थोड्याफार गुरफटलेल्या आहेतच. त्यांची उघड किंवा मूक संमती असल्याशिवाय प्रतिभा-प्रतिष्ठानला 'इंदिरा' हे नाव जोडण्याची अंतुले यांची एरवी हिंमतच झाली नसती ! तेव्हा हा प्रतिष्ठानांचा पसा सरकारजमा करण्याचा प्रश्नही विरोधकांनाच धसास लावावा लागणार आहे. एक अडचण विरोधकांपुढे या वेळी जरूर आहे. पूर्वी चिमणभाई, गफूर यांच्या भ्रष्टाचारांबद्दल जशी जनमानसात चीड होती तशी चीड, इतका सगळा गाजावाजा होऊनही, अंतुल्याबद्दल निर्माण झालेली नाही. ज्यांनी या अंतुले-हटाव मोहिमेला भरपूर प्रसिद्धी दिली, मोहिमेचे सूत्रचालन केले, त्यांच्या हेतूबद्दल लोकांना खात्री नसावी किंवा भरमसाठ देणग्या दिल्यामुळे, अनेकांना व्यक्तिगत पातळीवर उपकृत करून ठेवल्यामुळे, जनतेसाठी दरबार उघडल्यामुळे खरोखरच गोरगरिबांना अंतुल्यांविषयी प्रेम वाटत असावे. अंतुल्यांवर शाब्दिक टीका करून, त्यांचेकडून 'फ्लॅट' मात्र पदरात पाडून घेणाऱ्यांवर लोकांनी तरी का व कसा विश्वास ठेवायचा ? शिवाय भ्रष्टाचार ऑक्टोपससारखा इतका सर्व अंगांनी आपल्याला वेढून आणि वेटाळून राहिलेला आहे की, तो लवकरच शिष्टाचार म्हणून मान्यताही पावेल ! नैतिकतेच्या कल्पनाच बदलत आहेत. मधू लिमयानी अंतुले-राजिनाम्यानंतर मुंबईला झालेल्या सभेत आपली ही व्यथा बोलूनही दाखवली. अंतुले गेले हे ठीकच झाले; पण लोकांच्या मनात भ्रष्टाचाराविषयी चीड नाही, लोकमानस उदासीन आहे, असे ते म्हणाले. ही उदासीनता कशी घालवायची ? भ्रष्टाचारविरोधी लढा ही उदासीनता गेल्याशिवाय यशस्वी होणे कठिण आहे. तरीही मृणाल गोरे-सामंत यांच्यासारखी मंडळी, भाजपचे कार्यकर्ते, न्या. लेंटिन यांच्यासारखे न्यायमूर्ती, श्री. अशोक देसाई यांच्यासारखी वकीलमंडळी, काही वृत्तपत्रे हा लढा यथाशक्ती लढवत राहतात, ही आशादायक चिन्हे आहेत. खरोखरच या सर्व मंडळीचे कौतुक केले पाहिजे. त्यांना सुयश चिंतिले पाहिजे. त्यांना यथाशक्ती ज्याने त्याने सक्रिय साहाय्यही केले पाहिजे ! भ्रष्टाचार फोफावला तर आपली लोकशाही, आपला समाजवाद, आपल्या तळागाळाचा विकास यापैकी कशालाच काही अर्थ उरत नाही, हे आंधळे इंदिरा-पूजक ध्यानातच कसे घेत नाहीत ?

— श्री. ग. मा.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : चौतिसावा

२३ जानेवारी १९८२

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

मुंबई वार्ता

# फोरासरोड, ऑपरेशन मालवणी

आपल्या हिंदी चित्रपटात ' इस जालिम, निर्दय दुनियासे टकराकर ' हार जानेवाल्या बेबसीसे ' आणि ' पापी पेटके लिए ' शरीरविक्रय करणाऱ्या वेश्यांच्या चमचमीत करुण कहाण्या असतात. वर एखाद्या 'मौसी'ची फोडणीही असते– ' इस कोठीकी सीढियाँ कभी किसीके घरके आगन में नही जा उतरी बेटी ! ' इत्यादी आणि त्यावरचं पब्लिकचं मनापासूनचं चुक–चुक वगैरे.

पण यापलीकडे जाऊन या स्त्रियांसाठी कोणी काही केलंय ? सामान्य माणसांची सहानुभूती तर सोडाच, पण समाजसेवा हेच ज्यांचं व्रत आहे, कार्य आहे अशा संस्था तरी या बाबतीत किती करतात ? काही वर्षांपूर्वी मुंबईच्या नायर रुग्णालयानं जे हॉस्पिटलमध्ये येऊन औषध घेऊ शकण्याच्या स्थितीत नाहीत, अशा रुग्णांना घरी औषधं पोचवणारा एक ' होम मेडिकल प्रोग्रॅम ' सुरू केला. एका माणसानं येऊन फोरास रोडवरच्या बिछान्याला खिळलेल्या एका वेश्येला तपासून औषध देण्याची विनंती केली. येणाऱ्याना त्या भागात सुरक्षिततेची हमीही देऊ केली.

पण अशा ' होम'मध्ये राहणाऱ्यांसाठी हा ' होम मेडिकल प्रोग्रॅम' नव्हता !

डॉ. विजया भालेराव तेव्हा नायरच्या स्टाफमध्ये अगदी नव्या होत्या. मनात असूनही त्याना तेव्हा फारसं काही करता आलं नाही, पण नंतर के. इ. एम. हॉस्पिटलमध्ये प्रिव्हेन्टिव्ह अँड सोशल मेडिसिन विभागाच्या प्रमुख झाल्यावर मनातल्या आणि कागदावरच्या सगळ्या योजना कृतीत आणायला त्यांनी धडक्यानं सुरुवात केली. वेश्यांना–मानवी जमातीच्या एका वर्गाला–आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणं हा असाच एक कार्यक्रम ! अगदी रुग्णालयासारख्या सरकारी संस्थेत, जिथे उच्चशिक्षित आणि विचारक्षम समाजसेवेची थोडी–फार चाड असलेली माणसं असतात, तिथेही खुळ्या समजुती, आकस आणि दुराग्रह याविरुद्ध विजयाबाईंना जबरदस्त झगडा करावा लागला. प्रत्यक्ष वेश्या-वस्तीत, विशेषत: दलालांकडून तर किती अडथळे आले याची मोजदादच नाही ! या स्त्रियाचं कुठलंही अन्य पुनर्वसन करणार नाही, केवळ त्यांच्या आरोग्यविषयक काळजीपुरता आमचा संबंध असेल, या अटीवर कामाला परवानगी मिळाली. सुरवातीला श्री. प्रमोद नवलकरांबरोबर जाऊन एका 'घरा'ची आणि 'घरवाली'ची ओळख करून घेतली. या बाईची सामाजिक जाणीव आणि संवेदनक्षमता अगदी थक्क करणारी होती. ती म्हणाली, ' आधीच आमच्याकडे गिऱ्हाईक येतं ते त्याचं काही दुःख असतं, ते विसरायला. आमच्या मुलीकडून त्याला काही गुप्तरोगच मिळाले, तर त्याच्या दुःखात ती भरच नाही का ठरणार ? '

वेश्यांच्या सामाजिक जाणिवांचा प्रत्यय तर पुष्कळ आला, पण समाजाची वृत्ती मात्र फक्त हट्टी, दुराग्रही आणि कृतघ्न ठरली. गंमत म्हणजे, या स्त्रिया पुरुष डॉक्टर्सकडून तपासणीला तयार होईनात आणि व्ही. डी. स्किन डिपार्टमेंटला असलेल्या एकमेव स्त्री-डॉक्टरला तिचे बॉस असं काम करायला परवानगी देईनात ! एवढ्या स्त्रियांची तपासणी, रक्ताचे नमुने गोळा करणं, त्यांची छाननी, ते रिपोर्टस् परत नेऊन देणं, औषधं पुरवणं म्हणजे अवाढव्य काम होतं. अखेर विजयाबाईंनी सर्वांची मनं हलके हलके वळवली, सगळ्यांचं सहकार्य घेतलं, तेव्हाच त्या कामाचा काही पार लागला. रक्ताच्या तपासणीचे रिझल्ट घेऊन विजयाबाई हॉस्पिटलच्या गाडीनं जायला निघाल्या की ती विवक्षित जागा लवकर परत सापडायची नाही. मग ड्रायव्हरला सात्त्विक संताप यायचा. त्या बाया मुली काही करण्याच्या लायकीच्याच नाहीत. त्या चिखलातच रहायच्या' आणि हाच सद्गृहस्थ रात्री–अपरात्री त्यांचे उंबरे झिजवत असणार ! या स्त्रिया कधी रस्त्यात भेटल्या तर ओळख दाखवायच्या नाहीत, कारण कुणाला अडचणीत न आणण्याचं त्यांचं 'प्रोफेशनल एथिक्स' आहे; पण माणसाना मात्र त्यांच्यासाठी माणुसकीचंही ' एथिक्स ' नसावं !

वर्षभराच्या कालावधीनंतर विजयाबाईंना हे काम बंद करणं भाग पडलं. आता साऱ्या लाल फितीतून वाट काढत ते परत सुरू करण्यात त्यांना नुकतंच यश मिळालं आहे. या मधल्या कालखंडात त्यानी आपल्या डिपार्टमेंटच्या फौजफाट्यानिशी मालवणीच्या झोपडपट्टीवर हल्ला चढवला होता. १९७७ साली, तेव्हाच्या म्युनिसिपल कमिशनर देशमुखांनी तीन महापालिका रुग्णालयांना तीन झोपडपट्ट्या नेमून दिल्या होत्या. त्यात के. इ. एम. च्या वाट्याला मालवणी आली. अंतर बरंच, येणं–जाणंही गैरसोयीचं, वेळ खाणारं; पण काम करण्याची इच्छा असताना या गोष्टी वरवरच्या ठरतात ८१ सालच्या शिरगणतीनुसार मालवणीची लोकसंख्या लाखाच्या घरात आहे. त्या वेळी ती ४० हजाराच्या आसपास होती. एवढ्या लोकांचा हेल्थ अँड मॉर्बिडीटी सर्व्हे १५० इटर्नीज्च्या सहाय्यानं विजयाबाईंनी केवळ दहा दिवसांत संपवला. त्यांच्या कामाचा धडाका बघून कमिशनर खूष झाले; पण विजयाबाई तेवढ्यावरच थांबल्या नाहीत पुढे फॉलो–अप नसेल, काही कृती करायची नसेल तर सर्व्हेचे कागदी घोडे काय कामाचे ? सर्व्हेच्या निष्कर्षांच्या आधारे काही काम करायला आम्हाला परवानगी द्या, मदत द्या, असा उलट तगादा त्यानी लावला !

ही तळमळ बघून कमिशनरनी प्राथमिक शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलामागे ५० पैशाची मदत मंजूर केली. या रकमेतून या मुलाना अन्न द्यायचं होतं आणि इथून ' ऑपरेशन मालवणी'ला सुरुवात झाली. प्राथमिक शाळेतली मुलं हा खरं म्हणजे तिथल्या साऱ्या समाजाचा केवळ एक घटक झाला पण विजयाबाईंनी त्याचा मोठा कौशल्यान वापर केला आणि साऱ्या समाजालाच य आरोग्य मोहिमेत ओढून घेतलं. ही सगळी गोष्ट मोठी मनोरंजक आणि उद्बोधक आहे

प्राथमिक शाळेतल्या मुलांसाठी पन्नास पैसे मंजूर झाले खरे, पण त्यातल्या अठ्ठावीस पैशांचं एज्युकेशन डिपार्टमेंट दूध देत असे. तेव्हा बावीस पैशात सकस अन्न पुरवणं अशी ही कामगिरी अधिकच अवघड बनली. 'आम्ही या मुलांना आठवड्यातून कधी उसळ, तर कधी खिचडी, कधी डाळ–ढोकळी असा आलटून-पालटून मेनू देतो. हा पौष्टिक पण होतो. आणि मुलांना आवडतो. पण या अन्नातून त्यांना १० ते १२ ग्रॅम प्रोटिन्स आणि ३०० कॅलरीज मिळतात' मुलांच्या या मेनूविषयी विजयाबाई एवढ्या आत्मीयतेनं आणि उत्साहानं बोलत होत्या की, जणू कुणा आप्तेष्टाच्या लग्नाची मेजवानीच असावी ! हे अन्न तिथेच शिजवलं जातं, आणि सुमारे ३३०० शाळकरी मुलाना वाटलं जातं.

या साऱ्या प्रकल्पात महापालिकेचा उद्देश केवळ मुलाना सकस अन्न देण्याचा होता, पण विजयाबाईंचा उद्देश होता बावीस पैशातही सकस अन्न देता येतं, हे दाखवून देण्याचा ! मुलांच्या आयाना, हे अन्न शिजवायला मदतीसाठी रोज दहा बायकांनी आलं पाहिजे, असा एक दंडक त्यांनी घातला; पण आपण नाही आलं तरी आपल्या मुलांना खायला मिळेल, असं लक्षात आल्यावर महिनाभरातच या बायकांनी येणं बंद केलं. अखेर उद्वेगानं काही मुलासमोर बोलताना विजयाबाईंनी म्हटलं की, मी हे अन्न द्यायला काही बांधील नाही ! तेव्हा मुलानी आपल्या आयाना अक्षरशः ओढत तिकडे आणलं, आणि परत एकदा सर्व सुरळीत चालू झालं. आज तर व्हिटॅमिन एसाठी तिथे पालेभाज्याचे मळेही लावले आहेत आणि अपंग मुलं त्याची संपूर्ण देखभाल करत असतात. मालन्यूट्रिशनच्या अतिशय गंभीर प्रश्नाची ही यशस्वी हाताळणी आहे आणि त्याची फळं मुलांच्या शारीरिक सुस्थितीमध्ये दिसूनही येतात. सर्व मुलांची शाळेत प्रवेश घेताना आणि शाळा सोडताना शारीरिक तपासणी होते आणि त्या दोन तपासण्यांच्या निष्कर्षात केवढा तरी फरक आढळून येतो.

दुसऱ्याही एका महत्त्वाच्या प्रश्नावर अशीच मुलाच्या सहकार्यानं मात करता आली. लहान मुलांना ट्रिपल पोलिओचे डोस द्यावे लागतात, याची मुळी तिथे जाणीवच नव्हती. शिवाय या रोगाबरोबर खरूज, क्षय, महारोग अशाही रोगांचा प्रादुर्भाव काही कमी नव्हता; मग या रोगाची प्राथमिक लक्षणं ओळखण्याचं शिक्षण मुलांनाच, दिलं. तेव्हा त्यांनी भराभर आपल्यातले रोगी शोधायला, त्याना औषधोपचारासाठी शाळेत आणायला सुरुवात केली. ट्रिपल पोलिओच्या डोसांसाठी ही शाळकरी मुलं आपल्या आयांना, आपल्या धाकट्या भावंडांना घेऊन यायला भाग पडायची. हा बदल एवढा प्रचंड आहे की, दुसरा-तिसरा डोस घ्यायला येणाऱ्यांचं प्रमाण पूर्वी केवळ वीस टक्के होतं, ते आज नव्वद टक्क्यांवर गेलं आहे. गेल्या वर्षभरात या भागात एकही घटसर्प अथवा पोलिओची केस आढळली नाही. शिवाय, या साऱ्या गोष्टीमुळे शाळेतील मुलांची उपस्थिती जवळजवळ शंभर टक्के झाली, हा आणखी अतिरिक्त फायदा. खरजेचंही उच्चाटन झाल्यातच जमा आहे आणि अस्वच्छतेची आगर असलेल्या झोपडपट्ट्यांच्या दृष्टीनं, हे खास लक्षणीय यश म्हणावं लागेल !

मालवणीचा हा सारा प्रकल्प मोठा उद्बोधक आहे. मुलं हा कुठल्याही समाजाचा खास आस्थेचा, जिव्हाळ्याचा आणि कौतुकाचा विषय असतो. पण केवळ 'देवाघरची फुलं' यासारखे कौतुकाचे आणि भाबड्या प्रेमाचे चार शब्द उधळण्यातच धन्यता मानली जाते. विजयाबाईंनी मात्र मुलांचं हे समाजातलं महत्त्वाचं स्थान अचूक ओळखलं आणि एखाद्या तरफेसारखा त्यांचा वापर करून संपूर्ण समाजातच परिवर्तन घडवून आणलं. केवळ पालकच मुलांना शिकवतात असं नाही, तर मुलंही पालकांना शिकवतात, घडवतात, हे तत्त्वापुरतं न राहता इथे प्रत्यक्षात आलं आहे. 'चाइल्ड इज द फादर ऑफ मॅन' असं वर्डस्वर्थनं एके ठिकाणी म्हटलं आहे, ते अगदी सरळ आणि ढोबळ अर्थानं इथं खरं ठरतं. महाराष्ट्राच्या या भावी आधारस्तंभांनी आजच हे विशेषण सार्थ करायला सुरवात केली आहे.

या साऱ्याबरोबरच विजयाबाईंचे आणखी काही अनुभव आणि काही निरीक्षणं नमूद करणंही अगत्याचं आहे. प्रशिक्षित समाजसेवा आणि महिलामंडळछाप समाजसेवा यात फरक आहे. समाजसेवा म्हणजे केवळ भूतदया, दानधर्म नव्हे. त्यासाठी दयाबुद्धी तर हवीच; पण प्रामुख्यानं खंबीर मन हवं, झटपट आणि सारासार विचार करणारी बुद्धी हवी, स्वतःची गुंतवणूक न करता काम करण्याची शक्ती हवी; आणि कामावर जबर निष्ठाही हवी. यापैकी कशाचाही तोल बिघडून चालणार नाही. एका मेडिकल सोशल वर्करला, परत परत सांगूनही कुणाला तिनावर चौथं मूल झालं की एवढा सात्त्विक संताप येत असे की, ती केसपेपर फाडून टाकत असे. हा प्रामाणिकपणा आणि कार्यनिष्ठा काय उपयोगाची ? स्वतः विजयाबाईना, फोरासरोडवर काम करीत असताना रोज येणारं नैराश्य, विषण्णपणा आणि बिघडणारा मूड याचा भयंकर अनुभव आहे. तशात झोपडपट्टीतलं काम तर सर्वांत वाईट! ते धोकादायक तर आहेच; पण त्याचबरोबर कधीही न संपणारं आणि 'थँकलेस' अशा प्रकारचं ते काम आहे. ग्रामीण भागातला अनुभव वेगळाही असेल; पण झोपडपट्टीतल्या माणसांना कृतज्ञता तर सोडाच, पण केल्याची जाणही नाही, असा विजयाबाईंचा कटू अनुभव आहे.

अर्थात् निष्कामपणे करायचा हा कर्मयोग त्याच्या अंगी आता चागला बाणला आहे. फोरासरोडवरचं काम त्यांनी पुन्हा सुरू केलं आहे. शिवाय महापालिका हद्दीबाहेरही जाऊन आपल्याला काम करायला मिळावं आणि आपलं काम वाढावं अशा धडपडीत त्या सध्या आहेत. त्या दृष्टीने पनवेल जवळच्या रासायनीमधलं त्यांचं काम हळूहळू आकार घेत आहे.

— ललिता बर्वे

## डॉ. सामंतांचे 'युद्ध'

डॉ. दत्ता सामंत ही व्यक्ती कामगारक्षेत्रात सध्या अगदी शिखरावरती आहे. मुबईतील कामगारांबरोबरच मुबईबाहेरीलही कामगार त्यांच्या आगमनाची आतुरतेने वाट पहात आहेत. आपलं नेतृत्व सामंतांनी स्वीकारावं म्हणून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत.

गेल्या काही वर्षापासून डॉ. सामंतांनी कामगारासाठी जे काही केलं त्याचं हे फलित आहे. कामगाराच्या न्याय्य मागण्यांना वाचा फोडण्यासाठी, कामगारशक्ती दाबून टाक-

ऱ्या मालकाला धडा शिकवण्यासाठी डॉ. सामंतांनी मालकाविरुद्ध, सरकारविरुद्ध गेल्या काही वर्षांपासून 'युद्ध'च सुरू केले आहे. निदर्शने, मोर्चे, लाँगमार्च, मंदकाम, संप आदी मार्गांद्वारे डॉ. सामंतांनी हे युद्ध हाताळले आहे. ह्या युद्धात डॉ. सामंतांना वेळोवेळी जयच मिळत गेला आहे!

परंतु ह्या जय मिळवण्यासाठी डॉ. सामंतांना घाम गाळावा लागला आहे. काही कामगारांचं त्यासाठी रक्तही खर्ची पडलं आहे! तरीही आपल्या कार्याची वृत्तपत्रे म्हणावी तशी दखल घेत नाहीत, दखल घेण्याचे सोडून वृत्तपत्रे मालकाची, सरकारची चमचेगिरी करतात, असे सामंतांना वाटत असावे. म्हणून ह्या सर्वांना उत्तर देण्यासाठी आपलं एक युनियनचं पत्र असावं असा विचार कित्येक दिवसांपासून डॉ. सामंतांच्या प्रमुख कार्यकर्त्यांत घोळत होता.

ह्या विचार कार्यकर्त्यांनी डॉ. सामंताच्या कानावर घातला आणि डॉक्टरांनी लगेच त्याला संमती दिली. त्यानतर लिखित झालेले युनियनचे 'युद्ध' नावाचे हे पत्र जून–जुलै महिन्यातच प्रकाशित होणार होते; पण डॉ. सामंताच्या अचानक अटकेने ते लांबणीवर पडले.

तुरुंगातील सुटकेनंतर सामंतांची आणि लिखाणातील रेकॉर्डब्रेक अनिल थत्ते याची गाठ पडली आणि मग अनिल थत्ते यानी 'युद्ध' साप्ताहिकासाठी प्रमुख सल्लागार म्हणून सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली.

'युद्धा'ची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतल्यानंतर थत्तेंनी निरनिराळ्या वृत्तपत्रांमध्ये 'युद्धा'बाबतची जाहिरात दिली. जाहिरात दिल्याप्रमाणे ३ नोव्हेंबरला पहिला अंक प्रकाशितही झाला! डॉ. सामंतांच्या कामगारांची संख्या असख्य असल्याने पहिल्या अंकाचे कामगाराकडून स्वागतही झाले.

पहिल्या अंकानंतर दुसरा अंक १० नोव्हेंबरला बाहेर आला; पण कामगार तिसऱ्या अंकाची प्रतीक्षा करत असतानाच 'युद्ध तूर्त बंद केले आहे' असे घाटकोपर येथील डॉ. सामतांच्या कार्यालयातून सांगण्यात आले.

डॉ. सामंतांच्या 'युद्धा'चे हे दोन अंक निघाले आणि 'युद्ध' बंद पडलं! पहिल्या अंकानंतर दुसऱ्या अंकात प्रामुख्याने तीन बदल जाणवले. 'युद्ध' या नावाने प्रथम प्रकाशित झालेला दुसरा अंक 'श्रमिक युद्ध' या नावाने निघाला. या बदलाचं कारण असं की, पाच–सहा वर्षांपूर्वी डॉ. सामंतांनी पत्रकार चंद्रकांत पुरंदरे यांच्या सहाय्याने काढलेले 'युद्ध' जेव्हा बंद केले होते तेव्हा हे नाव पुन्हा वापरणार नसल्याचे लिहून दिले होते. ही चूक ध्यानी आल्यानंतर 'युद्ध'चे नाव 'श्रमिक युद्ध' असे ठेवण्यात आले. दुसरा बदल हा की, पहिल्या अंकात सल्लागार म्हणून राजा राजवाडेंचेही नाव जाहीर झाले होते; पण दुसऱ्या अंकात ते गळाले. याचे कारण विचारले असता समजले की, राजा राजवाड्यांना न विचारताच हे नाव प्रकाशित केले गेले होते! तिसरा बदल म्हणजे 'युद्ध'ची किंमत ४५ पैशांवरून २५ पैशांवर आणण्यात आली!

'युद्ध' बंद होण्याचे एक कारण म्हणजे वितरणाची अडचण! 'युद्ध'च्या दोन्हीही अंकांचे वितरण घाटकोपर येथील युनियन कार्यालयातून झाले; परंतु ह्या वितरणात बाराशे ते पंधराशे रुपयांची घट झाल्याचे निदर्शनास आले.

वाचकांच्या मनोगताला पूर्णपणे वाहिलेले पुण्यातील एक मासिक जेव्हा बंद पडले तेव्हा रेकॉर्डब्रेक अनिल थत्तेंनी एका ठिकाणी लिहिले होते की, 'उषःकाल होता होताच काळरात्र झाली!' रेकॉर्डब्रेक अनिल थत्तेंची यापेक्षा वेगळी काय अवस्था झाली आहे?

आणि चार पानी 'युद्ध'ही लगेच थांबवणारे गोएंकाचा 'इंडियन एक्सप्रेस' कसा काय विकत घेऊन चालवणार आहेत?

—मोहन शंकर कुलकर्णी
घाटकोपर

# इंदिरा गांधी
## कार्यपद्धती बदललेली नाही!
वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी आपल्या अधिकारवर्षाच्या दुसऱ्या वाढदिवशी नवा वीस कलमी कार्यक्रम घोषित केला आणि दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळात मोठे फेरबदल जाहीर केले! या दोन्ही निर्णयांचा विचार करण्यापूर्वी प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, पंतप्रधानाची कार्यपद्धती काही बदललेली नाही. मग नवा वीस कलमी कार्यक्रम ठरला कसा? काँग्रेस कार्यकारणीचा निर्णय किंवा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणून काही तो जाहीर झालेला नाही. याचा अर्थ पंतप्रधानांनी स्वत:च तो आखला व जाहीर केला! काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत आर्थिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस वेग आणायला हवा, असे आवाहन इंदिरा गांधींनी केले होते; पण तेव्हाही काही नवा कार्यक्रम आखण्याच्या त्या विचारात आहेत असे त्यानी सूचित केलेले नव्हते. काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदाशी, तसेच मंत्रिमंडळाशी विचारविनिमय करून पंतप्रधानानी हा कार्यक्रम निश्चित करायला काय हरकत होती? पण महत्त्वाचे निर्णय सहकाऱ्याशी विचारविनिमय करून घ्यावयाचे, हा त्यांचा पिंडच नाही! आपल्या सहकाऱ्याना त्या किती दुय्यम लेखतात, हे या प्रसंगाने पुन्हा एकदा दिसून आले.

पूर्वीचा वीस कलमी कार्यक्रम आणि नवा वीस कलमी कार्यक्रम यात काय फरक आहे? या दोन्ही कार्यक्रमात वास्तविक नवे काय आहे? जमीन सुधारणा कायद्याची काटेकोर अंमलबजावणी आणि उपलब्ध जादा जमिनीचे वाटप हे कलम पहिल्या वीस कलमी कार्यक्रमात होते, तेच नव्या कार्यक्रमातही आहे. पहिला कार्यक्रम १९७५ च्या आणीबाणीत जाहीर करण्यात आला. त्यानंतर एकोणीस महिन्यांनी निवडणुका जाहीर होईपर्यंत इंदिरा गांधींच्या हाती कर्तुमकर्तुम् सत्ता होती; पण या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने फारच सथ प्रगती झाली. त्यानंतर १९८० मध्ये पुन्हा सत्ता हाती आल्यानतरच्या दोन वर्षातही परिस्थितीत फरक पडला नाही. नव्या वीस कलमी कार्यक्रमात त्याचा पुन्हा समावेश केला; पण जमीनसुधारणा पुऱ्या करण्यास निश्चित काहीच मुदत घातलेली नाही व अशा मुदतीअभावी त्याला वेग येणे कठीण आणि निश्चित मुदतीला सरकार बांधून घेत नसेल तर कागदी घोषणेपलीकडे त्याला फारसा अर्थ रहात नाही. जमीनसुधारणा सरकारला खरोखर मनापासून अमलात आणायच्या आहेत का आणि त्यासाठी बडा शेतकरी व जमीनदार वर्गाला दुखावण्याची सरकारची तयारी आहे का, हा खरा प्रश्न आहे. सत्तारूढ पक्ष समाजवादाच्या कितीही घोषणा करो, हा वर्ग त्याचा पाठीराखा व आधारस्तंभ आहे. त्याच्या हितसंबधाना बाध येईल अशी पावले सरकार निर्धाराने टाकणार आहे का? आतापर्यन्तचा अनुभव पाहता सरकार तसे काही करील असे वाटत नाही. शेतमजुरांच्या किमान वेतनाची पुनर्पाहणी

व त्याची काटेकोर अंमलबजावणी हे कलम जुन्या कार्यक्रमाप्रमाणे नव्या कार्यक्रमातही आहे. सध्याच्या राहणीमानाच्या दृष्टीने किमान वेतन फारच अपुरे आहे. त्यात वाढ यापूर्वीच व्हावयास हवी होती. किमान वेतनाची पुनर्पाहणी सरकार केव्हा करणार आणि नवे वेतन केव्हा अंमलात येणार, यासाठी कोणतीच मुदत जुन्या कार्यक्रमात नव्हती आणि नव्या कार्यक्रमातही ती घातलेली नाही !

जादा पन्नास लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणणे हे उद्दिष्ट पूर्वीच्या कार्यक्रमात होते. नव्या कार्यक्रमात ओलिताखालील क्षेत्रात वाढ करणे असे मोघम उद्दिष्ट ठेवलेले आहे. ओलिताखालचे क्षेत्र किती वाढणार आणि किती मुदतीत हा कार्यक्रम पार पाडणार याचा उल्लेख त्यात नाही. राज्यांच्या पाटबंधारे मंत्र्यांशी विचारविनिमय करून त्याचे उद्दिष्ट ठरवायला हवे. कोरडवाहू शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी उपाय योजणे आणि डाळी, कडधान्ये, गळिताची धान्ये यांच्या उत्पादनवाढीसाठी खास प्रयत्न करणे, याचा समावेश नव्या कार्यक्रमात करण्यात आला आहे. गोडेतेलाच्या किमती दरवर्षी भरमसाठ वाढतात आणि सरकारला तेल आयात करावी लागते. भाववाढीविरुद्ध परिणामकारक उपाय योजण्यात सरकारला दरवर्षी अपयश येते. बडया तेल–उत्पादकांचे व व्यापाऱ्यांचे हितसंबंध यात गुंतलेले आहेत. उत्पादनवाढीपेक्षा टंचाई निर्माण करून व किंमती भरमसाठ वाढवून जादा नफा मिळवण्याचे त्यांचे धोरण असते. सत्तारूढ पक्षाच्या निवडणूकनिधीस या वर्गाकडून मोठ्या देणग्या मिळतात. त्यामुळे त्यांच्या हितसंबंधाना बाध येईल असे उपाय सरकार निर्धाराने योजीत नाही.

मागास जाती व जमातींच्या विकास कार्यक्रमास वेग आणणे या कलमाचा समावेश वीस कलमी कार्यक्रमात नव्याने केला आहे. येथे मागास म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागास की सामाजिकदृष्ट्या मागास हे स्पष्ट केलेले नाही. आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटासाठी रोजगार प्रशिक्षणाचा समावेश पहिल्या कार्यक्रमात होता. मागास, जातीजमातीमध्ये आर्थिक व सामाजिक दोन्ही दृष्टीनी मागास असलेल्यांचा समावेश करायला हवा. वेठबिगार प्रथा नष्ट करण्याचा समावेश पहिल्या कार्यक्रमात होता. आणीबाणीत राष्ट्रपतींनी वटहुकूम काढला आणि वेठबिगारी नष्ट झाल्याचे जाहीर करण्यात आले; पण केवळ वटहुकमाने किंवा कायद्याने ही प्रथा नष्ट होत नाही. अजूनही काही राज्यात ती अस्तित्वात आहे. वेठबिगारांच्या पुनर्वसनावर नव्या कार्यक्रमात भर आहे. पहिल्या कार्यक्रमात त्याचा काही विचारच नव्हता. ग्रामीण भागातील रोजगार वाढविण्याच्या कार्यक्रमाशी हा प्रश्न निगडित आहे !

सर्व खेडयात पिण्याच्या पाण्याची सोय करणे हे कलम पहिल्या कार्यक्रमात नव्हते; नव्या कार्यक्रमात ते समाविष्ट केले आहे. पिण्याच्या पाण्याची सोय ही माणसाची मूलभूत गरज आहे. पिण्याचे पाणी तर मिळायला हवेच, पण ते जास्तीत जास्त स्वच्छ कसे मिळेल याचीही तरतूद हवी. कारण खेडयांतील रोगराई मुख्यत: अस्वच्छ पाण्यामुळे निर्माण झालेली असते. वीजउत्पादन वाढविण्याचा मोघम उल्लेख पूर्वीच्या कार्यक्रमात होता. सर्व खेडयांचे विद्युतीकरण पूर्ण करणे हे उद्दिष्ट नव्या कार्यक्रमात ठेवले आहे, ते किती वर्षात साधणार याचा उल्लेख त्यात नाही; पण आठ वर्षांत ते पूर्ण करण्याची योजना ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाने आखली आहे. जलद औद्योगिक विकासासाठी प्रत्येक खेड्यापर्यंत वीज जायलाच हवी ! पाण्याइतकीच दुसरी मूलभूत गरज घराची. ग्रामीण भागातील कुटुंबाना घरांसाठी जागा उपलब्ध करून घरबांधणीस मदत देण्याचा समावेश नव्या कार्यक्रमात केला आहे. जुन्या कार्यक्रमात त्याचा काही उल्लेख नव्हता. खेडयापेक्षाही शहरात रहाण्यासाठी जागा मिळण्याचा प्रश्न अधिकच बिकट झालेला आहे. मोठ्या शहरांतून झोपडपट्ट्या वाढत आहेत. झोपडपट्ट्यांचे निर्मूलन हे उद्दिष्ट तर आता रद्दच झालेले आहे ! झोपडपट्ट्याची सुधारणा करून आवश्यक सोयी करणे यावर नव्या धोरणात भर आहे. शहरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटासाठी घरबांधणी-योजना राबविणे आणि जमिनीच्या किंमती अवास्तव वाढणार नाहीत यासाठी उपाययोजना करणे, याचा समावेश नव्या कार्यक्रमात केला आहे; पण मुख्य आवश्यक गोष्ट आहे उद्योगधंद्यांच्या विकेंद्रीकरणाची ! ग्रामीण भागात रोजगाराच्या सोयी उपलब्ध झाल्याशिवाय शहरांकडे जाणारा लोंढा थांबणार नाही; पण याबाबतीत अजूनही संथ गतीनेच पावले टाकली जात आहेत.

सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी तेथील कार्यपद्धती सुधारण्याचा समावेश नव्या कार्यक्रमात केला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग कार्यक्षमतेने चालू नाहीत, याची ही कबुलीच आहे. नोकरशाहीतील बडे अधिकारी संचालक नेमून कार्यक्षमता येत नाही. त्या त्या क्षेत्रातले तज्ज्ञ संचालकपदी हवेत. सार्वजनिक सहकारी म्हणजे परके, आपला त्यांच्याशी काही संबंध नाही, अशी सर्वसामान्य माणसाची वृत्ती आढळते. सरकारी मालमत्तेचा, सुविधांचा वाटेल तसा उपयोग करायचा, त्यासाठी वारेमाप उधळपट्टी करावयाची ही अनिष्ट प्रवृत्ती यातूनच वाढत आहे. ही वृत्ती बदलल्याशिवाय आपली एकूण कार्यक्षमता वाढणार नाही !

नव्या कार्यक्रमात नवे काही नाही. खरा प्रश्न आहे तो, कार्यक्रमापेक्षा त्याच्या अंमलबजावणीचा. त्यासाठी नोकरशाहीवरच सरकार विसंबून आहे. पक्षकार्यकर्त्यांनी वास्तविक त्यात लक्ष घालायला हवे; पण अशी संघटना उभारण्याकडे नेहरूंच्या काळापासूनच दुर्लक्ष झालेले आहे. हा मूळ दोष सुधारल्याशिवाय अमलबजावणीला वेग येईल कसा ?

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या पुनर्घटनेने इंदिरा गांधींना काय साधले ? प्रणव मुकर्जींना अर्थमंत्रीपदाची महत्त्वाची जागा त्यांनी कोणत्या कसोटीवर दिली ? पंतप्रधानांचे विश्वासू सहकारी हाच त्यांचा मुख्य गुण ! आर्थिक प्रश्नाचे ते विशेष तज्ज्ञ असल्याचे दिसून आलेले नाही. रेल्वे खाते केदार पांडेकडून प्रकाशचंद्र सेठीकडे आले; पण पांडे यांच्यापेक्षा ते अधिक कार्यक्षम आहेत असे म्हणता येणार नाही. इंदिरा गांधींनी लहरीप्रमाणे खाती बदलली. त्यामागे काहीही योजना दिसत नाही. पटावरील सोंगट्यापेक्षा मंत्र्यांना अधिक महत्त्वाचे स्थान नाही ! यशवंतरावांना संरक्षणमंत्रीपद मिळेल अशी अपेक्षा त्यांचे चाहते करीत होते; पण बाईंनी त्यांना दूर ठेवले आहे ! संघटनेतही त्यांना महत्त्वाचे पद दिलेले नाही. झैलसिंग यांची अकार्यक्षमता सिद्ध झाली असता गृहमंत्रिपद त्यांच्याकडेच आहे. तेव्हा मंत्रिमंडळाच्या फेरबदलातून कारभारात अधिक कार्यक्षमता येईल असे मानायला फारशी जागा नाही. □

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ खुर्च्या बदलून सुधारण्याचा प्रयत्न

'अवती-भोवती' या सदराचा मजकूर लिहिण्याचे पुढे ढकलत होतो. हेतू होता की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कोण विराजमान होते ते पहावे व आजवर महाराष्ट्राच्या कोणाही मुख्यमंत्र्याला जावे लागले नाही अशा पद्धतीने जावे लागलेल्या ए. आर. अंतुले यांच्याबद्दल व येणाऱ्या मुख्यमंत्र्याबद्दल लिहावे; पण अगदी शेवटच्या घडीपर्यंत वाट पाहूनही नवीन मुख्यमंत्री हाती लागला नाही ! महाराष्ट्र इंदिरा काँग्रेस विधिमंडळ पक्षाने पक्षाच्या व देशाच्या थोर नेत्या पंतप्रधान इंदिरा गांधी यानीच काय तो निर्णय करावा, असा निर्णय घेऊन टाकला. निर्णय करण्याचा वकूब या विधिमंडळ पक्षाकडे कधीच नव्हता, आजही नाही. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्रिपदावरून हालल्यापासूनचा हा अनुभव असल्याने विधिमंडळ पक्षाच्या निर्णयाचे आश्चर्य वाटले नाही. शंकरराव चव्हाण काय किंवा अंतुले काय, हे काही विधिमंडळ पक्षाने निवडलेले नेते होते की काय? श्रेष्ठीनी त्यांना नेते म्हणून निवडले. आमदारानी त्यांना स्वीकारले. आजवर कोणाही मुख्यमंत्र्यानी केले नाहीत इतके अंतुलेजीनी आपल्या पक्षाच्या आमदारांचे लाड केले. त्याच्यावर प्रचंड दडपणही ठेवले. अंतुले जाणार, भ्रष्टाचार-प्रकरणी जाणार हे निश्चित झाल्यावरही तमाम मंत्रिमंडळ दिल्लीकडे धाव घेऊन, अंतुले पुन्हा एकदा हवेतच नारा लावू इच्छित होते. यावरूनच सत्तासूत्रे संपादणाऱ्या मंडळीची एकंदर पातळी लक्षात येते. अर्थात अंतुले जाऊन त्यांच्या जागी इंदिराजीनी बसवलेला नवीन माणूस हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत कारभारास लागलाही असेल ! आमदार जसे निर्णय घेऊ शकले नाहीत त्याचप्रमाणे तोही निर्णय घेऊ शकत नसल्याने सहकाऱ्यांच्या नावाच्या याद्या घेऊन त्यांची मुंबई-दिल्ली वाऱ्यांमध्ये त्यांची उदंड दमछाक झालेली असेल ! दरम्यान अंतुलेजी यांना, आपण कोणताही गुन्हा केला असे वाटत नसल्याने, त्यानी उच्च न्यायालयाच्या खडपीठापुढे अपील दाखल केले आहे.

महाराष्ट्राबद्दल हे असे आणि इतकेच हाती असताना केंद्रीय मंत्रिमंडळामधील फेरबदलाचे वृत्त हाती आले आहे. जानेवारी ८० मधील निवडणुकांनंतर इंदिराजींनी केलेला हा सहावा महत्त्वपूर्ण फेरबदल ! अनेक अनपेक्षित बदल घोषित झाले असले तरी झाले हे एकदम फायनल, असे समजण्याचे कारण नाही. इंदिराजीच्या धक्कातंत्रामध्ये (शॉक ट्रीटमेंट) अचूक बसतील असेच हे फेरबदल आहेत. झैलसिंग याचे गृह खाते जाईल असे वाटले होते; परंतु त्यांना हात लागलेला नाही. अर्थमंत्रीपद संभाळणाऱ्या व्यंकटरामन याच्याबद्दल इंदिराजी समाधानी नसल्या तरी त्याचे अर्थ खाते, बजेट तोंडावर आले असताना जाईल असे वाटत नव्हते; पण त्यांची अर्थ खात्यातून उचलबांगडी झाली आहे ! शिवराज पाटील याचे नाव महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी घेतले जात होते; पण त्यांना संरक्षण खात्यातून उचलून व्यापार खाते स्वतंत्रपणे देण्यात आले आहे. त्याचा दर्जा राज्यमंत्री असाच असला तरी वाणिज्य विभाग ते स्वतंत्रपणे संभाळतील. ज्यांच्या डोक्यावर कॅबिनेट दर्जाचा मंत्री नाही असे केवळ चार राज्यमंत्री आहेत. शिवराज पाटील त्यापैकीच एक असल्याने त्यांना काम करणे सुलभ जाईल. इंदिराजीच्या आप्त शीला कौल (शिक्षण व समाजकल्याण), बुटासिंग (पुरवठा व पुनर्वसन) व भगवत झा आझाद (मजूर) हे स्वतंत्रपणे खाती संभाळणारे अन्य तीन राज्यमंत्री आहेत. वाणिज्य व मजूर या खात्यांना कॅबिनेट दर्जाचा मंत्री नाही, हे विशेष मानावे लागेल. अर्थात सरक्षणासारख्या महत्त्वाच्या खात्याला दोन वर्षे कुठे मंत्री होता ? या फेरबदलाच्या वेळी यशवंतराव आत येतील, असे काही जणांना वाटत होते; पण साहेब आहेत तिथेच, म्हणजे खासदारपदीच आहेत ! अर्थ खाते हे अतिशय महत्त्वाचे खाते. लोकसभा निवडणुकीत मार खाऊन राज्यसभेत आलेल्या प्रणवकुमार मुखर्जी याना देण्यात आले आहे. आज देशाची अर्थसूत्रे सभाळणे म्हणजे अक्षरश: तारेवरची कसरत आहे. प्रणवकुमार मुखर्जी यांनी अर्थ खात्याच्या नजीक असणारी व्यापार, बँकिंग, उद्योग यांसारखी खाती संभाळली असली तरी नवीन जबाबदारी जास्त तोलामोलाची आहे. वेंकटरामन यांचे अर्थखाते काढून घेण्यात आले असले तरी त्यांना अपमानित करण्यात आलेले नाही. प्रथम श्रेणीच्या खात्यांपैकी संरक्षण खाते त्यांच्या हाती देण्यात आले आहे. दोन वर्षे बाईंनी स्वत: हे खाते संभाळले. आता या महत्त्वाच्या खात्याला स्वतत्र मंत्री मिळाला आहे. पी. सी. सेठी याचा कार्यक्षमतेबद्दल कधीच लौकिक नव्हता. कार्यक्षमतेची जिथे अत्यंत गरज आहे असे रेल्वे खात्यासारखे महत्त्वपूर्ण खाते पी. सी. सेठी यांच्या हाती सुपूर्त करण्यात आले आहे. वसंत साठे यांच्या खात्याला हात लागलेला नाही. ते बाईंच्या विश्वासातील आहेत आणि इंदिराजी त्यांच्या कामाबद्दल समाधानी दिसतात. तथापि त्यांचे सहकारी मात्र सतत बदलण्यात आले आहेत. प्रथम त्यांना रामदुलारी सिन्हा या राज्यस्तरीय मंत्री सहाय्यक म्हणून देण्यात आल्या होत्या. पुढे त्यांना मजूर खात्यात ढकलण्यात आले आणि कुमुदबेन जोशी उपमंत्री म्हणून आल्या. आता त्यानाही माहिती व नभोवाणी खात्यातून ढकलण्यात आले असून अरिफ महोम्मद खान यांच्याकडे हे खाते सोपवण्यात आले आहे. काही खात्यांची फेररचना करण्यात आली आहे. पोलाद व खाण यांचा विभाग स्वतंत्र न ठेवता उद्योग खात्यामध्ये हा विभाग सामावून टाकण्यात आला आहे. नारायण दत्त तिवारी याच्याकडे हे खाते सोपवण्यात आले आहे.

या फेररचनेच्या वेळी कॅबिनेट दर्जाचा केवळ एकच नवीन मंत्री घेण्यात आला आहे. नव्याने आलेले जगन्नाथ कौशल हे कायदा, न्याय व कंपनी व्यवहार या खात्याचा कारभार संभाळतील. कायदामंत्री शिवशंकर याचे खाते बदलले जाईल, असे कोणालाही वाटले नव्हते; परंतु या खात्याचा कारभार इंदिराजींना हवा त्या पद्धतीने चालवूनही, त्यांना कायदा मंत्रालयातून उचलून पेट्रोलियम, रसायने व खते असे खाते त्यांच्याकडे देण्यात आले आहे. त्यांना हा बदल फारसा रुचण्यासारखा नसला तरी स्वीकारावा लागला आहे कारण सहकाऱ्यांशी विचारविनिमय वगैरे भाग येथे संभवतच नाही ! खाते-

चिटणीस बदलावेत इतक्या सहजतेने मंत्रीगणांच्या खुर्च्या बदलल्या जातात. हे बदल का व कसे केले जातात याची जाण त्या मंत्र्यांनाही नसते. त्यामुळेच इंदिराजींनी मनात आणताच कालपर्यंत कायदाखाते संभाळणारे शिवशंकर आजपासून पेट्रोलियम व रसायने यांच्या फायलीचा ढीग उपसत बसतील ! पक्षामधील फाटाफुटीनंतर अनेक जुने सहकारी इंदिराजींच्या जवळ आले; पण त्यांपैकी कुणालाही मंत्रिमंडळामध्ये स्थान मिळालेले नाही. गेल्या दोन वर्षांच्या काळात ज्यांना वगळण्यात आले ते कमलापती त्रिपाठी पुन्हा येत असल्याची करंजिया यांची अगदी आतल्या गोटातील बातमी होती; परंतु तीही खोटी ठरली ! नवीन भरती करताना नवीय मंडळीना अधिक वाव देण्याचे धोरण दिसते. इंदिराजींच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांपैकी नरसिंहराव (परराष्ट्र), व्यंकटरामन (अर्थ) व शिवशंकर (कायदा) हे तीन मंत्री इंदिराजींच्या सावलीतही आपली भलीबुरी प्रतिमा तयार करू शकले. त्यांपैकी दोघांची खाती बदलण्यात आली आहेत.

आपल्या जुन्या सहकाऱ्यांपैकी मगनभाई बारोट, चंदुलाल व वेंकट रेड्डी यांना वगळण्यात आले आहे. कॅबिनेट स्तरावरील एकाही मंत्र्याला डच्चू देण्यात आलेला नाही. खुर्च्या बदलून कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न येथे झालेला दिसतो. नव्याने येणाऱ्या दहा मंत्रीगणांपैकी जगन्नाथ कौशल यांचा उल्लेख वर केलाच आहे. त्यांच्याखेरीज आलेल्या मंडळीमध्ये कल्पनाथ राय यांचा संसदीय व्यवहार खात्याचे उपमंत्री म्हणून समावेश करण्यात आला आहे. हे राय लोकसभा निवडणुकीमध्ये मार खाऊन राज्यसभेत आले होते. आता मंत्री झाले आहेत ! स्टीफन यांनी अटलजीबरोबर हार खाल्ली असली तरी ते निदान पोटनिवडणुकीद्वारा लोकसभेत आले आहेत. उदंड बडबड करणाऱ्या स्टीफन यांच्याकडे दळणवळण खाते आहे.

हे बदल नेमके कशासाठी करण्यात आले ? इंदिराजी यांनी बदल घोषित झाले त्याच्या आदल्या दिवशी, वीस कलमी कार्यक्रमावरील धुरळा झटकून, पुन्हा हा कार्यक्रम सुधारित स्वरूपात आपण अमलात आणला असल्याचे घोषित केले. त्यापाठोपाठ हे बदल तसे धक्कादायक जरूर आहेत; परंतु अपेक्षेप्रमाणे मात्र नाहीत. कार्यक्षमता सुधारण्यास या बदलांमुळे फार मोठा हातभार लागेल असे वाटत नाही. सुमारे चार–सहा महिन्यांपूर्वी खाते-सचिवांच्या बदल्या करण्यात आल्या. आता मंत्रीगणांची खाती बदलण्यात आली आहेत. धाडसी म्हणता येईल असा निर्णय या खाते बदलामध्ये पहावयास मिळत नाही. दोन वर्षांनंतरही इंदिराजींना तोलामोलाचे सहकारी लाभल्याचे दिसत नाही. जुन्या मंडळींना पक्षात घेण्यात आले असले तरी सत्तेपासून दूर ठेवण्यात आले आहे. स्वतः इंदिराजींवर कामाचे विलक्षण दडपण आहे. विविध राज्यांमध्ये ज्या घडामोडी घडत असतात त्याबाबतचे अंतिम निर्णय त्यांनाच घ्यावे लागतात. आसाममध्ये तैमूर हालल्या तर कोणाला आणायचे, अंतुले गेले, आता त्यांचा उत्तराधिकारी कोणी व्हायचे, कर्नाटकात निवडणुका कधी घ्यायच्या, प. बंगालमध्ये ज्योती बसूंना निवडणुकीच्या वेळी सत्तेवर ठेवायचे की नाही, केरळमध्ये डाव्या कम्युनिस्टांना ढिले करण्यासाठी कोणती धोरणे राबवायची, हे सारे अखेर केवळ इंदिराजींनी ठरवायचे आणि हे सारे करून देशाचा कारभारही करायचा म्हटल्यावर कार्यक्षमतेला मर्यादा पडणारच. त्याला झळाळी देण्याचा प्रयत्न अशा खाते बदलांद्वारे केला जातो इतकेच !

## □ विश्वविख्यात व्यंगचित्रकार– आर. के. लक्ष्मण

'टाइम्स ऑफ इंडिया' किंवा 'महाराष्ट्र टाइम्स' हातात घेणाऱ्या वाचकाची नजर अगदी स्वाभाविकपणे व सवयीने पहिल्या पानावर विराजमान झालेल्या आर. के. लक्ष्मणच्या व्यंग चित्राकडे जाते. अगदी ताज्या बातमीचा आधार घेऊन आपल्या मिश्किल कुंचल्याने त्याने कोणाची तरी टोपी उडवलेली असते. रकानेच्या रकाने मजकूर लिहून जे सांगता येणार नाही ते लक्ष्मण आपल्या एका चित्राद्वारे सांगून जातात. जगामधील प्रथम श्रेणीच्या व्यंगचित्रकारामध्ये आज त्याची गणना होते. प्रथम श्रेणीच्या अनेक मानकऱ्यांना ज्या दिव्यातून जावे लागते त्या साऱ्या दिव्यांतून लक्ष्मण यांनाही जावे लागले आहे. त्यांच्या जीवनप्रवाहाचा धावता आलेख 'इंडिया टूडे'च्या अंकामध्ये प्रसिद्ध झाला आहे. आपल्या दोन इंचांच्या छोट्या चौकटीमधील सर्वसामान्य माणसाकडून व्यक्त होत असलेल्या प्रतिक्रियामधून, लक्ष्मण आज तीस दशलक्ष वाचकांहून अधिक वाचकांपर्यंत पोचतात. त्यांचा हा सर्वसामान्य माणूस (कॉमन मॅन) वाचकांच्या अगदी नित्य परिचयाचा झाला आहे. तो स्वतः बोलत नाही. तो केवळ प्रतिक्रिया नोंदवतो आणि त्याच्यामार्फत लक्ष्मण यांनी नोंदलेली ही प्रतिक्रिया असंख्य व्यक्तीचे मनोगत बोलून दाखवते. व्यंगचित्रकारांमध्ये आज मानाचे पान पटकावून बसलेले श्री. लक्ष्मण गेल्या चौतीस वर्षांहून अधिक काळ 'टाइम्स ऑफ इंडिया'द्वारा असंख्य वाचकापर्यंत जाऊन पोहोचत आहेत. आजवर त्यांनी नऊ हजारांहून जास्त व्यंगचित्रे काढली आहेत, तर सात हजाराहून जास्त चित्रांद्वारा सामाजिक घटनांवर भाष्य केले आहे. 'इलस्ट्रेटेड विकली'च्या अंकामधून आजवर त्यांनी पाचशेहून जास्त राजकारणी व्यक्तींची, पानभर पसरलेली रंगीत व्यंगचित्रे काढलेली आहेत. त्यांची ही व्यंगचित्रेही विलक्षण भेदक आणि संबंधित व्यक्तीच्या वर्तणुकीचा अचूक वेध घेणारी आहेत. वयाच्या सातव्या वर्षापासून कुंचल्याची भाषा बोलणाऱ्या लक्ष्मण यांनी त्यांचे बंधू, विख्यात कादंबरीकार आर. के. नारायण यांच्या अनेक कादंबऱ्यांसाठी, तसेच आपली पत्नी कमला लक्ष्मण हिने लहान मुलांसाठी लिहिलेल्या पुस्तकांसाठी अनेक चित्रे रेखाटली आहेत. आजही टाइम्सचे नेहमीचे काम संभाळून लक्ष्मण अनेक बाहेरची कामे सहजगत्या हातावेगळी करतात. कधी स्टेट बँकेचे कॅलेंडर, तर कधी विमको या काडयापेटया बनवणाऱ्या कंपनीच्या पेटयाची कव्हर्स, तर कधी एअर–इंडियासाठी सचित्र कॅटलॉग अशी अनेक प्रकारची कामे ते करत असतात. लक्ष्मणजी केवळ व्यंगचित्रकार नाहीत. ते स्वतः उत्तम लेखकही आहेत. त्यांनी अनेक शब्दचित्रे, स्वतःच्या कुंचल्यातून उतरलेल्या व्यंगचित्राची जोड देऊन सादर केली आहेत. खेरीज कथा, कादंबरी, प्रवासवर्णन यांसारखे लिखाणही त्यांनी केले आहे. भरपूर कार्यमग्न असूनही फावला वेळ

मिळाला तर लक्ष्मण कावळ्यांची व मांजरांची विविध ढगामधील चित्रे काढतात. सहज विरंगुळा म्हणून त्यांचा हा उद्योग चालू असतो, असे त्यांच्या पत्नीनेच म्हटले आहे.

लक्ष्मणजी लेखणीने आणि कुंचल्याने महामिष्किल असले तरी त्याना भेटल्यावर त्याचा स्वभाव, त्यांच्या या लेखणी व कुंचल्यापेक्षा पुष्कळच वेगळा असल्याचे जाणवते. जाहीर व्यासपीठावरून भाषणे ठोकणे त्यांच्या स्वभावात बसण्यासारखे नाही; परंतु व्यक्तिगत पातळीवर अथवा एखाद्या छोटया गटाबरोबर सूर जमला तर मात्र लक्ष्मणजींची स्वारी चांगलीच खुलते आणि दीड–दोन तासांची झकास मैफील सहज जमू शकते. अशा वेळी मग लक्ष्मणजीचा नकल्या स्वभावही उसळून वर येतो. अशाच एका खाजगी बैठकीमध्ये त्यांनी भोजनाच्या वेळी गोरा साहेब कसा जेवतो याची अशी बेमालूम नक्कल केली की, बैठकीत सहभागी झालेल्या मंडळींची हसता हसता मुरकुडी वळून गेली. त्यांच्या टाइम्समधील व्यंगचित्रामधील जो सामान्य मनुष्य आहे ना, त्याचा भाबडेपणा कित्येक वेळा लक्ष्मणजीच्या वागण्यात पहावयास मिळतो. लक्ष्मणजी राजकारणाचे आणि समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षक आणि दांडगे अभ्यासक आहेत, हे वेगळे सागण्याची गरज नाही. त्यांच्या असाधारण चित्रामधून ते जे बोचरे भाष्य करतात त्यातून या गोष्टीची सहज प्रचीती येते. आपल्या व्यंगचित्राचे प्रेरणास्थान म्हणून १९४०–५० मधील अँग्लोसॅक्सन व्यंगचित्रकाराच्या परपरेचा उल्लेख लक्ष्मणजी करतात. त्यातही डेव्हिड लोबद्दल, त्यांच्या चित्राबद्दल लक्ष्मणजीना विशेष आकर्षण. पुढे १९५० मध्ये डेव्हिड लो टाइम्समध्ये आले असताना सर्वप्रथम लक्ष्मण याना पुष्कळच अवघडल्यासारखे झाले होते, अशी एक आठवण जे. सी. जैन यानी सागितली आहे. लोकेरीज विख्यात इग्लिश व्यंगचित्रकार विकी हा लक्ष्मणजीचा आणखी एक आवडता व्यंगचित्रकार. 'डेली मेल'चे एलिंगवर्थ आणि 'वॉशिंग्टन पोस्ट'चा हर्ब्लॉक हे त्यांचे आणखी काही आवडते व्यंगचित्रकार. व्यगचित्रकाराना मिळावे तसे उत्तेजन मिळत नाही आणि त्यामुळे व्यगचित्रकलाही झपाटयाने अस्तंगत होत चालली आहे, असे त्याना वाटते. आज बातमी आणि व्यंगचित्र बरोबरीने धावते. लक्ष्मणजी म्हणतात, एक जमाना असा होता की, बातमीपत्र पोचावयास बारा–पधरा दिवस लागत आणि चित्रकार व व्यंगचित्रकार याना निवातपणे काम करता येत असे. बातमीचे आयुष्यही पुष्कळच मोठे असल्याने एखाद्या बातमीवर भरपूर विचार करून व्यंगचित्रकार त्याच्या फुरसतीने चित्र तयार करीत असे. आज राजकीय घटना घडली म्हणेपर्यंत त्या घटनेचा अस्त होऊन काही तरी नवीन उदयाला आलेले दिसते. स्वाभाविकपणे माझ्यासारख्या व्यगचित्रकारालाही त्या वेगाने काम करावेच लागते.'

आर. के. लक्ष्मण या नावाने परिचित असलेल्या लक्ष्मणजीचे पूर्ण नाव– रसीपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण. म्हैसूर संस्थानच्या शिक्षणखात्यामधील एक अधिकारी श्री. आर. व्ही. कृष्णस्वामी यांच्या आठ मुलापैकी आर. के. लक्ष्मण सर्वात धाकटे ! धाकटे असल्यामुळे ते आपल्या पालकाचे व त्यातही विशेषतः आईचे लाडके होते. अगदी लहानपणापासून त्यांना चित्रकलेची दांडगी आवड असल्याने आई भाजी आणायला निघाली की, अभ्यास वगैरे बाजूला सारून आणि कुंचला आणि कागदाचा गठ्ठा घेऊन ते आईमागोमाग बाहेर पडत व वाटेत भेटणाऱ्या मंडळींची चित्रे रेखाटण्याचा उद्योग करत असत. शालान्त परीक्षेच्या अडथळयावर एक थप्पड खाऊन अखेर त्यानी हा अडथळा ओलांडला खरा; परंतु चित्रकला हेच आपले खरे क्षेत्र आहे हे लक्षात घेऊन त्यानी मुबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला. तथापि नमुन्यादाखल म्हणून जी चित्रे त्यांनी पाठवली होती ती पात्रतायोग्य न वाटल्याने त्यांना प्रवेश मिळू शकला नाही. गमतीचा भाग म्हणजे, पुढे मुबईस येऊन त्यानी चांगले नाव मिळवल्यावर त्याच संस्थेने आपल्या वार्षिक समारंभासाठी त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण केले. त्या वेळी भाषण करताना स्वतः लक्ष्मण यानीच ही आठवण सांगितली व वर अशी पुस्ती जोडली की, 'बरे झाले मला त्या वेळी प्रवेश मिळाला नाही ते. तो जर मिळाला असता तर मी व्यंगचित्रकार होण्याऐवजी एखाद्या व्यावसायिक स्टुडिओमध्ये कलाकार म्हणून जिंदगीभर काम करत बसलो असतो !'

शिवराम यांच्या विनोदी मासिकातून लक्ष्मण यांची चित्रे प्रसिद्ध झाली. त्याचे बंधू आर. के. लक्ष्मण याच्या ज्या कथा 'हिंदू' या मद्रास येथील दैनिकातून प्रसिद्ध झाल्या त्या कथासाठी त्यांनी चित्रे काढून, प्रत्येक चित्राला अडीच रुपये असा मोबदला १९३० साली मिळवला. काका सुब्बाराव यांच्या 'स्वराज्य'मधून दर पंधरवड्याला त्याचे एक राजकीय व्यंगचित्र प्रसिद्ध होऊ लागले. त्याचे महाविद्यालयीन शिक्षण एका बाजूने चालूच होते. त्यामुळेच पुढे यथा काळ त्यानी बी. ए. ची पदवीही घेतली. मद्रासच्या जेमिनी स्टुडिओच्या ॲनिमेशन विभागामध्येही त्यांनी काही काळ काम केले. तथापि त्या कामात त्यांना गोडी न वाटल्याने १९४६ मध्ये स्वारी दिल्लीमध्ये येऊन दाखल झाली व दैनिकात व्यगचित्रकार म्हणून काम मिळवण्याची झटून खटपट केली. त्या संदर्भात 'हिंदुस्थान टाइम्स' या दैनिकाचे श्री. दुर्गादास तसेच रामनाथ गोएंका याचीही गाठ घेतली. त्या वेळी एका दैनिकात काम करणाऱ्या अहमद या व्यगचित्रकाराने त्याना प्रादेशिक वृत्तपत्रामध्ये काही काळ काम करण्याचा सल्ला दिला. काही जमण्याचे लक्षण न दिसल्याने त्याना पुन्हा मद्रासला परतावे लागले. आता दिल्लीचा नाद सोडून त्यांनी मुबईकडे मोर्चा वळवला. मुबईमध्ये पाऊल ठेवले तेव्हा खिशात फक्त ५० रुपये होते आणि काही दिवसात काम मिळणे जरूर होते. त्यानी प्रथम आर. के. करंजिया याची गाठ घेतली. लक्ष्मणची चित्रे पाहून करंजिया प्रभावित झाले व त्यांनी लक्ष्मण याना चित्रकार म्हणून नोकरी दिली. 'ब्लिटझ'साठी एखाद्या घटनेची चित्रे काढण्याचे काम त्याच्यावर सोपवण्यात आले. पुढे त्याना व्यंगचित्रमालिका काढण्याचे काम देण्यात आले आणि या मालिकेतील तंत्री हा जादूगार चांगलाच लोकप्रिय झाला ! करंजिया यांनी लक्ष्मण याना या मालिकेबद्दल चागले ७०० रुपयांचे घसघशीत मानधन दिले. पुढे त्यानी 'फ्री प्रेस'चे नटराजन याची गाठ घेतली. 'ब्लिटझ'मधील कामगिरी नटराजन यांना ठाऊक असल्याने त्यांना विशेष काही सागावे न लागता, लगेच ३०० रु. महिना अशा पगारावर त्यांना तिथे नोकरी लागली. त्या वेळी बाळ ठाकरे हे 'फ्री प्रेस'च्या स्टाफवर होते. लक्ष्मण यानी चांगले झटून काम केले. रोजच्या व्यंगचित्राखेरीज ते दर आठवड्यातून साप्ताहिकी आवृत्ती-

मध्ये राजकीय व्यंगचित्रमालिका प्रसिद्ध करू लागले. खेरीज त्यांचे ब्लिटझचे काम चालूच होते. व्यंगचित्राबाबत त्याना 'फ्री प्रेस'चे संचालक सदानंद याच्याकडून काही सूचना मिळताच त्यांनी तो आपला उपमर्द समजून तेथील राजीनामा देऊन टाकला! मुबईत यापुढे आपण राहू शकू असे त्याना वाटत नव्हते. पुन्हा दक्षिणेत परतण्याचा त्यांचा विचार होता; पण झटका आल्याप्रमाणे ते 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या ऑफिसमध्ये गेले. त्या वेळी Walter Laghammer नावाचा जर्मन कलाकार टाइम्सचा आर्टडायरेक्टर होता. त्याला लक्ष्मण यांचे 'फ्री प्रेस'मधील काम माहीत होते. तरीही त्याने थोडी-फार चाचणी घेतलीच आणि लक्ष्मणच्या हुन्नरीवर खूष होऊन दरमहा सहाशे रुपये पगारावर टाइम्समध्ये त्याला चित्रकार म्हणून ठेवून घेतले. तेव्हापासून लक्ष्मण जे टाइम्समध्ये आहेत ते आजतागायत! १९५० मध्ये फ्रँक मोरेस टाइम्सचे संपादक झाल्यावर लक्ष्मण यांना पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. 'फिल्म फेअर', 'इलस्ट्रेटेड विकली' या बेनेट कोलोमन कंपनीच्या अन्य पत्रासाठीही लक्ष्मण यांनी काम केले. आज टाइम्सच्या पहिल्या पानावर जो सामान्य माणूस लक्ष्मणच्या २ इंची चौकटीमध्ये रोज पहावयास मिळतो तो प्रथम २ डिसेंबर १९५७ रोजी अवतीर्ण झाला आणि तेव्हापासून लक्ष्मणची आणि त्याची वाटचाल चालूच आहे!

## □ काळे सोने म्हणून समजले जाणाऱ्या तेलाची टंचाई

तेलाचा आणि पेट्रोलियम पदार्थांचा वापर अत्यंत जबाबदारीने करा, असा आदेश देणाऱ्या जाहिराती आणि लघुपट आपण वारंवार पाहतो; पण तेलाबाबतची परिस्थिती किती गंभीर आहे याकडे द्यावे तितके लक्ष मात्र देत नाही. कलकत्त्याच्या 'अमृतबझार पत्रिके'मध्ये अलीकडेच याबाबत एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखात काळे सोने समजले जाणाऱ्या तेलाची लवकरच किती तीव्र टंचाई भासू लागेल याचे बोचरे चित्र उभे केलेले दिसले. प्रतिवर्षी २०० कोटी रुपयांचे तेल आपण विविध स्वरूपाच्या वाहनांवर खर्च करतो. हे असेच चालू राहिले तर या शतकाच्या अखेरीस पेट्रोलियम पदार्थांची अभूतपूर्व टंचाई निर्माण होऊन इंधन हा एक मोठा यक्षप्रश्न होऊन बसेल. एखाद्या वस्तूची कमतरता भासू लागली की, त्या वस्तूचे मोल वाढते. इंधनाच्या बाबतीत हे वारंवार दिसून आले आहे. पेट्रोलियम पदार्थ ही अत्यंत गरजेची वस्तू असल्याने त्याचा वापर तर कमी होण्याची शक्यता नाहीच. उलट प्रतिवर्षी विविध स्वरूपाच्या वाहनाची सातत्याने भर पडत असल्याने पेट्रोलसाठी असलेली मागणी वाढीस लागलेली दिसते. किंमती झपाट्याने वाढत असल्या तरीही या मागणीवर परिणाम झालेला दिसत नाही. इंधनाची कमतरता भरून काढण्यासाठी, निर्यातीपासून प्राप्त होणारी मोठी रक्कम सध्या खर्च पडत असून, पेट्रोलियम व अन्य तदनुषंगिक पदार्थांचा पुरवठा मागणीप्रमाणे करायचे म्हटले तर निर्यातीपासून प्राप्त होणाऱ्या रकमेच्या साठ टक्के रक्कम इंधनासाठी आवश्यक असलेले पेट्रोल व डिझेल यांच्या खरेदीवर खर्च करावी लागेल. पेट्रोल व डिझेल वापरणाऱ्या वाहनाची निर्मितीही झपाट्याने वाढत आहे. जानेवारी ते ऑक्टोबर १९८१ या कालखंडात मोटारगाड्या व जिप्स यांची निर्मिती ५८ हजाराहून जास्त होती, तर वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रक्सची संख्या याच काळात ५६ हजारांहून जास्त असल्याचे दिसून आले. स्कूटर, मोपेड व अन्य दुचाकी वाहने यांची निर्मितीही भरपूर वाढली असून, या वाहनांना मागणीही उत्तम आहे. संख्येच्या हिशेबात बोलायचे तर जानेवारी ते ऑक्टोबर '८१ या कालखंडामध्ये चार लाखाहून जास्त नवीत वाहने रस्त्यावर आली आहेत. मोठ्या शहरांतून ही दुचाकी स्वयंचलित वाहने अक्षरशः कचऱ्यासारखी झाली असून या वाहनांवरही मोठ्या प्रमाणावर इंधन खर्ची पडते. पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती महागल्या की, स्वाभाविकपणे या वाहनावरील खर्च वाढीस लागणार आहे. ग्राहकाला हे माहीत असले तरीही सोयीचे वाहन म्हणून या दुचाकी वाहनांना प्रचंड मागणी असून, एक 'बजाज'चा अपवाद वगळता अन्य कोणत्याही कंपनीची दुचाकी वाहने आज सहजी उपलब्ध आहेत. मध्यम वर्गीयांचा ही वहाने खरेदी करण्यावर भर आहे; पण येत्या तीस वर्षांत इंधनाचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार असल्याने या वाहनाचा वापर करणे शक्य होणार नाही. पेट्रोलवर अनेक प्रकारची नियंत्रणे येतील, त्याच्या किंमतीमध्येही भरमसाठ वाढ होईल, मोठ्या शहरात वाहतुकीचे गंभीर प्रश्न निर्माण होतील आणि नाइलाज म्हणून का होईना; पण मोठ्या शहरामधील काही विशिष्ट भागामध्ये जावयाचे असेल तर खाजगी मोटारचालकांना जबरदस्त प्रवेश-फी द्यावी लागेल किंवा सार्वजनिक वाहनांचा वापर करूनच या विशिष्ट भागामध्ये प्रवेश करावा लागेल! हाँगकाँगसारख्या ठिकाणी आताच ही प्रथा सुरू आहे. इंधनाच्या टंचाईने उग्र स्वरूप धारण केले तर भारतामध्येही अशा स्वरूपाचे नियंत्रण येत्या दशकाच्या अखेरीस येऊन थडकेल! इंधनाचा प्रश्न अत्यंत गंभीर असून उद्योगधंदे व वाहतूक यावर या टंचाईचे दूरगामी परिणाम होणार असल्याने विविध देशाच्या शास्त्रज्ञांनी आतापासूनच पेट्रोलसाठी अन्य पर्याय शोधण्यास प्रारंभ केला आहे. तसा पर्याय हाती आला तर ठीक, अन्यथा अत्यंत गंभीर अशा इंधनसमस्येला संपूर्ण जगाला तोंड द्यावे लागणार असून भारतासारख्या विकसनशील देशांना या येऊ घातलेल्या संकटाचा विशेष त्रास होणार आहे! □

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह
देवाघरचा पाऊस
लेखक : रवींद्र पिंगे
आवृत्ती : दुसरी
किंमत : दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे

# उत्तर मीमांसा : ३६

स. शि. भावे

# सी. रामचंद्र, सुरेश आणि उच्च अभिरुची

## सी. रामचंद्र गेले

नशील्या आणि रसील्या सुरांचा जादूगार गेला ! 'सफर' – 'शहनाई' पासून 'अनारकली' –'परछाई' पर्यंत आणि पुढे 'ए मेरे वतन के लोगों' पर्यंत, स्वरमाधुर्याने पुन्हा पुन्हा भिजवणारा संगीतकार गेला.

माणूस गेला म्हणजे वाईट वाटतेच. सी. रामचंद्रांशी ज्यांचे माझ्यासारखे सुराचे नाते जुळले आहे, त्यांना तर 'तुम क्या जानो, तुम्हारी यादमे हम कितना रोएँ!' असे वारंवार म्हणावे लागेल.

फरक असा असेल की, हे अश्रू केवळ दुःखाचे नसतील. या अश्रूत आम्हा रसिकांची आकंठ, उत्कट तृप्ती असेल.या अश्रूत आमची कृतज्ञता असेल. या अश्रूत सी. रामचंद्रांच्या संगीत-चमत्काराला आम्ही केलेला मुजरा असेल. या अश्रूत आमचे भावार्त क्षण असतील. जे आम्ही सी. रामचंद्रांच्या स्वरलालित्यात त्या त्या वेळी चिंब करून घेतले होते. या अश्रूत सी. रामचंद्र असतील, त्यापेक्षाही आमच्यात भिनलेले त्यांचे संगीत असेल !

कलावंताचे हे भाग्य असते. तो जातो. पण त्याची कला टिकते. खरे तर ते आपणा सर्वांचे भाग्य असते. तो जातो. पण त्याची कला आपल्यासाठी उरते.

सी. रामचंद्रांच्या स्वरांची नक्षी त्यांच्यामागे अशीच कायम राहणार आहे. त्यांचे लाखो चाहते त्यांच्या स्वरावलींचा आनंद पुन्हा पुन्हा घेणार आहेत. या दृष्टीने पाहता रामचंद्रांचे जीवन मृत्यूच्या किती तरी आधीच सफल झालेले होते असे म्हणावयाला हवे. त्यांच्याजवळचे स्वरमाधुर्यातील जे जे म्हणून उत्तम होते ते ते त्यांनी वाटून टाकले होते. त्या बाजूने ते कृतार्थ झाले होते. शेवटी मृत्यू जेव्हा त्यांना घेऊन गेला तेव्हा त्याची कृतार्थ कुडी त्याच्या स्वागतासाठी तयारच होती. रस वाटून टाकला होता. रिकामी खोळ उरली होती. तीच मृत्यूने नेली.

¤

रामचंद्रानी हा स्वररस किती आणि कसा श्रीमंतीने वाटला होता, त्याचे प्रत्यंतर त्यांच्या मृत्यूनंतर ज्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त झाल्या त्यांवरून चांगल्या तऱ्हेने आले.

दूरदर्शन, आकाशवाणी या सार्वजनिक प्रसारमाध्यमानी त्यांची दखल घ्यावी, यात तसे आश्चर्य नव्हते. या माध्यमांची ती गरज होती. या माध्यमांच्यासाठी रामचंद्रांचे संगीत अजून ताजे आहे, चलनी आहे. पण दखल घेण्याघेण्यातही फरक असतो. रामचंद्रांची दखल विशेष समरसतेने घेतली गेली. रामचंद्रांचे संगीत ऐकत ऐकत लहानाची मोठी झालेली पिढी आज या क्षेत्रात कर्तीसवरती आहे. त्यांनी विशेष आपुलकीने या स्वरसम्राटाच्या कर्तृत्वाची दखल घेतली.

वृत्तपत्रांनीही केवळ एक महत्त्वाची न्यूज स्टोरी, याच दृष्टीने रामचंद्राच्या मृत्यूची नोंद केली नाही. स्वरमेळाचा एक जमाना समाप्त झाला, अशा गंभीरतेने त्यानी ही नोंद घेतली. या लेखनात जो तपशील भरलेला होता तो केवळ कार्यक्षमतेचा द्योतक नव्हता. तो तपशील, गाणी, ती गाणारे पार्श्वगायक, ते चित्रपट, गाण्यांचे ते ते प्रसंग–यांचा तो तपशील उत्स्फूर्त स्मरणाने आलेला होता. स्मरणाची ही उत्स्फूर्तता भावनेच्या घट्ट बंधनातून स्फुरलेली होती. 'तरुण भारत' आणि 'सोबत' यामध्ये ग. वा. बेहेरे यांनी केलेले उत्कट लेखन हे या भावबंधांचे नमुनेदार उदाहरण होते.

¤

हे सारे ऐकताना आणि वाचताना असे जाणवत होते की, संगीताच्याच नव्हे तर एकूणच अभिरुचीच्या वाटचालीत जमाना बदलला आहे.

सुमारे पंधरा-एक वर्षांपूर्वीपर्यंत सिनेसंगीताची अशी प्रतिष्ठेने दखल घेण्याचा रिवाज नव्हता. उघडपणे तशी दखल घेण्याची कुणाची बिशादही नव्हती ! शास्त्रीय संगीत, मग नाट्यसंगीत, मग सुगमसंगीत आणि सरतेशेवटी सिनेसंगीत असे चातुर्वर्ण्य संगीतात होते. आपल्या व्यापक चातुर्वर्ण्याचा कर्मठपणा संगीतातील या वर्णभेदातही होता. सिनेसंगीत-सुगमसंगीत यांना नाक मुरडणे आणि शास्त्रीय संगीत व नंतर केवळ कृपा म्हणून नाट्यसंगीत यांचा उल्लेख करणे ही संगीतक्षेत्रातील कळतेपणाची आणि प्रतिष्ठितपणाची खूण होती. बाकी सारे संगीतातील 'अब्रह्मण्यम्' होते !

पंधरा-एक वर्षांपूर्वीपर्यंत असे पवित्रतेच्या आग्रहाने गुदमरलेले वातावरण होते. मग पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वी काय असेल त्याची कल्पनाच करावी लागेल ! रामचंद्र चितळकर हा गृहस्थ ब्राह्मण. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी. त्याने. '**संडे के संडे**', किंवा '**जवानी की रेल चली जाए रे**' अशी फिरंगी ढंगाची गाणी बसवावीत हे 'अब्रह्मण्यम्'च होते. ही गाणी गुणगुणणारी मुले उनाड समजली जात, तर या गाण्याच्या सुंदरपणाची ग्वाही देणारे वाया गेले असे समजले जात असे !

ही वाया जाण्याची एक गंमतच आहे. एक जमाना असा होता की, ज्या वेळी नाटके पाहण्याचे वेड म्हणजे वाया जाण्याची हमी समजली जात असे. **बालगंधर्व, केशवराव भोसले, मा. दीनानाथ** इत्यादी श्रेष्ठ कलावंतांनी नाट्यक्षेत्रावरील हा 'हलकेपणा'चा शिक्का धुऊन काढला. या शतकाच्या तिशीत जेव्हा सिनेमा नव्याने आला तेव्हा नाट्यक्षेत्राला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती.

मला वाटते, 'वाया गेली' असा दोषारोप ज्यांच्यावर होतो ती मंडळी वयाने प्रौढ झाली, कुटुंबात स्थिर आणि समाजात प्रतिष्ठित झाली, म्हणजे दोषारोपाच्या त्या त्या क्षेत्रालाही प्रतिष्ठा प्राप्त होत असते. ही नवप्रतिष्ठित पिढी, आपले 'वाया गेलेले (!)' दिवस 'गेले ते दिवस !' अशा आपुलकीने आणि गौरवाने आठवीत असते.

'स्मरणरमणीयतेने' (nostalgia) त्या अवखळ दिवसाना सौंदर्याची किनार आपोआप प्राप्त होत असते.

१९४० ते ५० या दशकात सिनेमाने नाटकी रंग सोडला. तोपर्यंतचे सोहराब मोदीचे 'पुकार'सारखे चित्रपट किंवा जयंत देसाईंचे 'संत तुलसीदास'सारखे चित्रपट हे नाटकी वळणाचे होते. नाटकाचेच फक्त दोन (कधी तर एकाच) कॅमेऱ्यातून चित्रण झाले आहे असे हे चित्रपट पाहताना वाटते. या चित्रपटात संवाद, हालचाली, सगीत सारेच नाटकी शैलीचे होते. 'कुंकू', 'माणूस' यांसारख्या शांतारामांच्या 'प्रभात' चित्रानी आणि 'किस्मत'सारख्या बॉंबे टॉकीजच्या चित्रानी चित्रपट हे 'हलत्या चित्राचे पट' होऊ लागले. हालचाली, संवाद, संगीत हे चित्रपटाचे घटकही हलत्या चित्राशी सुसंगत होऊ लागले. संगीत अधिक हलते, तुकड्यातुकड्याचे, चित्रचौकटीच्या गतीशी समांतरता राखणारे झाले.

नाट्यसृष्टीला आदर्श मानणाऱ्या त्या काळातील प्रौढ, प्रतिष्ठित पिढीला हे नवे रूप म्हणजे हलक्या दर्जाचा पोरकटपणा वाटला तर नवल नाही

¤

नंतरच्या वीस-पंचवीस वर्षांत हा पोरकटपणा प्रौढ प्रतिष्ठित झाला आहे. काळाचे आणखी एक वर्तुळ पुरे झाले आहे.

नट म्हणून त्या वेळचा युवक म्हणजे अशोककुमार. तो तर आज चित्रपटसृष्टीचा ऋषि-'मुनी' झाला आहे! त्या वेळचे 'टीनएजर्स' राजकपूर, दिलीपकुमार, देवआनंद (सुद्धा!) आज प्रतिष्ठित मार्गदर्शकांच्या भूमिकेत आहेत. त्या वेळचा आणखी एक 'टीनएजर' गुरुदत्त हा आधी ५५ ते ६५ या दशकातील 'टीनएजर्स'चा (अशोक शहाणे--नेमाडे यांच्या बंडखोर पिढीचा) आदर्श बडखोरी हीरो ठरला आणि आज त्याला मरणोत्तर आदर्श प्रौढाची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे!

संगीत देणाऱ्यातील त्या वेळचे बंडखोर म्हणजे गुलाम हैदर, हुस्नलाल भगवतराम, सी. रामचंद्र आणि सचिनदेव बर्मन. आणि यांच्या पाठोपाठ नौशाद, सज्जाद, शंकर-जयकिशन आणि सलिल चौधरी. १९४० ते ६५ ही पंचवीस वर्षे या मंडळींनी त्या काळातल्या 'वाया जाणाऱ्या' पिढीला आपापल्या खास ढंगाच्या स्वरमाधुर्यात गुगवून ठेवले होते. आज हे सारे संगीतकार प्रौढ प्रतिष्ठिताच्या (veterans) रांगेत येऊन बसले आहेत!

त्या वेळची 'वाया गेलेली' पिढी आता प्रौढ झाली आहे, हे याचे एक कारण आहे; पण याहीपेक्षा, आकाशवाणी, वृत्तपत्रे व नियतकालिके, आणि गेली दहाएक वर्षे दूरदर्शन या सामूहिक माध्यमांनी गेल्या पिढीतल्या या तथाकथित पोरकटपणाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे, हे लक्षात घ्यावयास हवे.

आकाशवाणीच्या जाहिरातविभागाचे (सध्या विज्ञापनविभागाचे) याबाबतीत मोठे साहाय्य झाले. भारतीय आकाशवाणीने हा विभाग मान्य करण्याआधी सिलोन रेडिओने या नव्या चित्रपटसंगीतकारांना मोठी संधी व मोठे प्रोत्साहन दिले. 'बिनाका गीतमाला' आणि या गीतमालेचे ढंगदार संयोजक अमीन सयानी यांची या बाबतीतील कामगिरी कधीही दुर्लक्षिता येणार नाही. बिनाका गीतमालेचा सुरवातीचा पंधराएक वर्षांचा काळ हा स्वच्छ ताजेपणाचा काळ होता. 'झुमरीतलैया'हून हजारो पत्रे आणविण्याचा धंदेवाईक स्पर्धेचा काळ नंतर सुरू झाला; पण या सुरुवातीच्या काळात गुणवत्ता, लोकप्रियता आणि सामूहिक प्रतिष्ठा यांतील संगती स्वाभाविकपणे आणि मनापासून साभाळली जात होती. संगीत-कलेची प्रतिष्ठा आणि खऱ्या गुणवत्तेची परंपरा या दोन्हीबाबत सिलोन रेडिओने या काळात विशेष जागरूकता दाखविली होती आणि या जागरूकतेने नव्या परंपरा सुरू केल्या होत्या. सकाळी साडेसात ते आठ या वेळात 'पुराने फिल्मोंकी गीते' सादर करणे आणि दररोज या कार्यक्रमाच्या शेवटी सैगलची ध्वनिमुद्रिका सादर करणे ही या परंपरापैकी एक भरजरी परंपरा. आपल्या आकाशवाणीने या प्रयोगाचे अनुकरण बऱ्याच समर्पकतेने केले आहे. रोज रात्री अकरा ते साडेअकरा या वेळात सादर होणारा 'बेलाके फूल' हा कार्यक्रम असाच एक चांगला कार्यक्रम आहे.

या कार्यक्रमांचे दृश्य स्वरूप म्हणजे दूरदर्शन सादर करीत असलेले 'छायागीत' या कार्यक्रमात, श्राव्य अंशापेक्षा दृश्य अंशाला स्वाभाविकच जास्त महत्त्व आले आहे आणि संगीतकलेच्या आविष्काराला वेगळे परिमाण प्राप्त होऊ लागले आहे. सिनेसंगीतही आता बदलले आहे. संगीतात, निदान त्या संगीताच्या लयीत श्रोत्यानेही सहभागी व्हावे, आपल्या शरीराची गतिमान, लयबद्ध हालचाल त्या संगीत लयीत मुरवून सुरू करावी, हा नवा आविष्कार संगीताच्या आस्वादात हळू हळू मिसळत आहे. केवळ दुरुन आस्वाद नव्हे तर संगीतात सहभाग हे तर नव्या 'डिस्को' संगीताचे किंवा 'ओसीबिसा'चे सूत्र आहे.

'डिस्को' किंवा 'ओसीबिसा'ची चाहती मंडळी सध्याची 'वाया जाणारी' मंडळी आहेत. योग्य त्या कालावधीनंतर ही मंडळीही 'प्रतिष्ठित' होतील, यात अर्थातच शंका घेण्याचे कारण नाही!

आकाशवाणी, दूरदर्शन आणि नियतकालिके यांच्यामुळे एक मात्र झाले आहे. 'वाया गेलेले' आणि 'प्रतिष्ठित झालेले' या दोन शिक्क्यांतील अंतर गेल्या तीसएक वर्षांत कमी-कमी झाले आहे. कालचे 'वाया गेलेले' आजचे 'प्रतिष्ठित' होत आहेत! दोन अवस्थामधला अंतराचा काल जसजसा कमी होतो आहे तसतशी 'स्मरणरमणीयता' ही गोष्टही कमी कमी होते आहे. नवीन ते प्रतिक्षणी (instant) निर्माण होते आहे आणि त्याला तत्क्षणी (instant) मान्यताही मिळत आहे.

¤

आता, हे चांगले की वाईट?

आजची प्रतिष्ठित पिढी तर असे अंतर नाहीसे होणे वाईटच समजत आहे. अभिरूची खालावत आहे, अशी आधीच्या प्रतिष्ठित पिढ्याची त्या त्या वेळच्या नव्या पिढीबद्दल तक्रार असे. आज, अभिरुची हा प्रकारच मुळात नष्ट होत आहे, अशी आजच्या प्रतिष्ठित पिढीची तक्रार आहे.

ही तक्रार कितपत रास्त आहे?

या प्रश्नाचा विचार करू लागलो की मला सुरेशची आठवण येते. गेली इतकी वर्षं त्याची माझी मैत्री आहे. या अभिरुचीच्या प्रश्नावर त्याची माझी सतत चर्चा होत असते. या वेळी तो एक भूमिका सातत्याने मांडीत असतो. तो म्हणतो :

'ही अभिरुची उच्च आणि ती हलकी

असे मुळी ठरविताच येणार नाही. तसे ठरविण्यासाठी कोणताही तात्त्विक अथवा वस्तुनिष्ठ निकष उपलब्ध नाही !'

'असे कसे ? अभिजात (classical) आणि **लोकायत** (popular) असा फरक आपण करतोच की नाही ? ' मी विचारतो.

'आपण फरक करतो हे खरे; पण तेवढ्याने आपण करतो तो फरक खरा आहे किंवा उचित आहे, असं सिद्ध होत नाही.'— सुरेशचे शांत उत्तर.

'पण या क्षेत्रात चिंतन करणारे विद्वान तर अभिजाततेचं नेहमी समर्थन करीत असतात. '—मी (प्राध्यापकाच्या पद्धतीने) विद्वानांचा आधार शोधतो. आणि पूर्वी एका वादात एका विद्वानाने मला ऐकविलेले वाक्य मी सुरेशला ऐकवतो. ते विद्वान म्हणाले होते, 'नवीन पिढी ' सुखी होते', 'आनंदी असते' एवढं म्हणून हा प्रश्न सुटणार नाही. त्या 'सुखाचा' वा 'आनंदाचा' आशय कितपत सकस आहे, हे पाहिलं पाहिजे. '

यावरही सुरेश शांतच असतो. तो हसून म्हणतो—

'अरे आशय, सकस वगैरे आहे की नाही, हे कसं ठरवणार ? तर समाजाच्या धारणेसाठी किंवा प्रगतीसाठी सकस असाच विचार करणार की नाही ? आणि हा विचार कोण करणार ? तर त्या त्या काळचे मूठभर वरिष्ठ ! या वरिष्ठांचंच म्हणणं का बाबा मानायचं ? सांस्कृतिक क्षेत्रातील वरिष्ठांचंच मानावं, असं सूत्र सिद्ध करणारा निकष कोणता ? अं ? '

सुरेश पुढे बोलत राहतो...

'तुला विद्वानांचा आधार हवाय ना ? देतो. **केशवराव भोळे** हे संगीत कलेतले विद्वान होते हे तुला कबूल आहे ना ? तर त्यांनी हुस्नलाल भगतरामच्या एका रचनेला श्रेष्ठ कलाकृती म्हटलं आहे. **चुपचुप खडे हो, जरूर कोई बात है,** ही रचना श्रेष्ठ आहे असं त्यांनी म्हटलंय. तुला समजणाऱ्या भाषेत सांगायचं तर हा आकृतिबंध संपूर्ण, स्वयंपूर्ण अन्यून-अनतिरिक्त इत्यादी आहे. याला का नाही अभिजात म्हणायचं ? केशवरावांना 'धीरेसे आजा रे' ही रामचंद्रांची लोरीही बेहद्द आवडत असे. सुसंगत, संपूर्ण रचनेचं एक आकर्षक उदाहरण म्हणून ते या लोरीचा उल्लेख करीत असत. आता बोला !'

हा त्याचा हल्ला ऐकायला एकदा ते वर उल्लेखिलेले विद्वानही हजर होते ! सुरेशचे बोलणे संपल्यावर मी आशेने त्यांजकडे पाहिले. सुरेशला ते चपलख उत्तर देतील अशी माझी खात्री होती.


पण ते विद्वान काहीच बोलले नाहीत. सुरेशला 'अभिजात' वगैरे समजू नये याचे त्यांना वाईट वाटलेले दिसले. सुरेशबद्दल त्यांना दया वाटली असावी. ती त्यांच्या बोलण्यात प्रकट होत होती. ते एवढेच म्हणाले— 'उच्च, अभिजात पातळी तुम्हाला समजत नाही, याबद्दल मी तुम्हाला दोष देणार नाही. तुमच्या पिढीचीच ही शोकांतिका आहे !'

यावर सुरेश नेहमीप्रमाणेच खळखळून हसला आणि म्हणाला, 'तुम्ही खरे म्हणजे आतून चिडला आहात. तुम्ही अभिजात वगैरे मंडळी असे दुसऱ्यावर फार चटकन चिडता किंवा दुसऱ्यांची कीव करता. आम्ही कधी असे चिडतो का ? दुसऱ्याची कधी अशी कीव करतो का ? विचारा, का करीत नाही म्हणून? कारण आम्ही खरी समानता मानतो. समान असलेल्यांनी कसली एकमेकांची कीव करायची ?'

सुरेशचे मुद्दे मला नेहमीच महत्त्वाचे वाटत आले आहेत. म्हणूनच 'मोहब्बत ही न जो समझे, वो जालिम प्यार क्या जाने' हे गुणगुणताना मला रामचंद्रांबरोबरीनेच सुरेशचीही आज आठवण होते आहे ! □


PROGRAF

अरं तिच्याऽऽ पाटीऽऽल!



म्हंजे बघा, पाटीऽऽल आपलं शंकर पाटील हो. गोष्ट सांगाया लागलं का की होऽऽ नुस्ती मजजा... अगागा हसून हसून बेऽऽजार ! जंक्शन स्टेडचं समोर उभं राहतय की हो... धिंड, मीटिंग, नाटक या गोष्टी म्हंजे तर पाटलांचा हुकमाचा यक्काच ! आता या गोष्टी प्रत्यक्ष पाटलांच्या आवाजात कॅसेटवर... अरं तिच्याऽऽ पाटील!

अलूरकर म्युझिक हाउस

४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे-४११००४. फोन ३०६६२, ३२९१०.

' सर्व प्रमुख रेकॉर्डस् व पुस्तकविक्रेत्यांकडे उपलब्ध '



# निष्काम कर्मयोगी क्रांतिकारक राशबिहारी बोस

(जन्म : २५ मे १८८६)  (मृत्यु : २१-१-१९४५)

**लेखक : र. धों. घाणेकर**

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यपूर्वकालातील सशस्त्र क्रांतिकारकांचा सत्य घटनांवर आधारित अस्सल इतिहास ज्या वेळी लिहिला जाईल त्या वेळी इतिहासकारांना जहाल व तेजस्वी क्रांतिकारक राशबिहारी बोस अन् चंद्रशेखर अझाद ह्यांचा बहुरंगी जीवनपट चित्रित करताना आपण निराळ्याच जगात वावरत आहोत, असे वाटेल. एकापाठोपाठ घडलेल्या त्यांच्या चमत्कारिक व धाडसी घटनांची नोंद करता करता आपोआप विचार सुचत रहातील, पुढे सरकत राहतील, लेखणीला निराळीच धार चढेल अन् गतइतिहासात गुरफटून बसलेले असंख्य धागे दोरे उकलताना अतीव आनंद व निराळीच अनुभूती प्रत्ययास येईल, हे निश्चितच!

'क्रांतिकार्यार्थ तन-मन-धन अर्पण करणारा मी ब्रिटिश सरकारच्या हातात जिवंत कधीच सापडणार नाही. मालविलेल्या जीवन-ज्योतीनंतर माझी लाश सरकारच्या हाती लागेल !' असे छातीठोकपणे आव्हान देणाऱ्या क्रांतिकालातील शूर वीरांमध्ये फक्त हे दोनच हिंदू क्रांतिकारक ! पहिले चंद्रशेखर अझाद ' की ज्यांना ब्रिटिशांबरोबर सशस्त्र सामना देत असता अलाहबादच्या आएफ्रेड पार्कमध्ये २७ फेब्रुवारी १९३१ ह्या पुण्यदिवशी मृत्यु आला व दुसरे राशबिहारी बोस, की ज्यांची ज्योत मालविली ती ३८ वर्षे सतत क्रांतिकार्य करून, दूर जपान देशात, २१ जानेवारी १९४५ ह्या मंगलदिनी! लाख-लाख रुपयांची बक्षिसे जाहीर झाली, निरनिराळी आमिषे दाखविण्यात आली, अनेक फिरते व वाकबगार हेर पाळतीवर ठेवले गेले. शेकडो पोलीस अधिकारी दिवस—रात्र पाळतीवर राहिले पण हे दोघे शूर-वीर ब्रिटिश सरकारच्या हाती जिवंतपणी कधीच सापडले नाहीत. जन्मभर राष्ट्र स्वतंत्र्य करण्याचा विदिध्यास बाळगणाऱ्या ह्या वीरांचे जीवन-समर्पण, म्हणजे हिंदुस्थानच्या सशस्त्र क्रांति-इतिहासातील एक सुवर्णपानच ! जन्मभर ज्वलनच ! आपल्या समर्पणाने राष्ट्राच्या अस्मितेला उजळा देत, एकसारखा प्रकाश-झोत फेकत, अखेर त्यांनी आपल्यामागे काहीच शिल्लक ठेवले नाही. ठेवली ती अखंड जिवंत स्मृती ! निबिड अंधःकारांत उजळा देत जीवन-चैतन्य निर्माण करणे हा दीपशिखा व उदबत्ती ह्यांचा धर्म आहे, त्यांच्या समर्पणानंतरही मागे रक्षा शिल्लक रहातेच; परंतु क्षणिक तेज दाखविणाऱ्या व उजेड देणाऱ्या कर्पुराची कृती काही वेगळीच ! दुसऱ्याला उजेड द्यावयाचा व अखेर काहीही शिल्लक ठेवावयाचे नाही. ज्योतीत ज्योत मिसळून अलिप्त व अलग रहावयाचे, हा कर्पुराचा धर्म. त्याच थाटाचे जीवन ह्या दोन क्रांतिकारकांचे जीवन-ज्योत मालविली जाईपर्यंत प्रकाश देत राहिले. परकीयांच्या अपवित्र हातांचा स्पर्श त्यांनी कधीच होऊ दिला नाही, अनेक वादळातून अन् प्रलयातून त्यांची जीवन-नौका संथपणे व डौलदारपणे पुढे सरकत सरकत अगदी काठ गाठण्याच्या सुमारासच बुडली, अस्तंगत झाली ! २१ जानेवारी १९४५ हा राशबिहारींचा निर्वाणदिन आणि त्या निमित्ताने आज त्याना वाहिलेली ही श्रद्धांजली !

राशबिहारींचा जन्म सुबलजह ह्या खेडेगावी २५ मे १८८६ ह्या दिवशी झाला. पूर्वीच्या बरद्वान जिल्ह्यातले हे एक खेडेगाव. त्यांचे वडील विनोदबिहारी सरकारच्या नोकरीत राहिल्यामुळे त्यांच्या निरनिराळ्या ठिकाणी बदल्या होत, त्यामुळे राशबिहारींचे शिक्षण फारसे झालेच नाही. नोकरीतून मुक्त झाल्यावर विनोदबिहारी सिमल्याला एका छापखान्यात नोकरीला लागले. संसार ओढगस्तीचा म्हणून त्यांनी एका मित्रामार्फत राशबिहारींना डेहराडूनच्या सरकारी जंगल-संशोधन केन्द्रामध्ये नोकरीला लावले. लष्करात भरती होण्यासाठी त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले पण ते जमले नाही. वय १८ वर्षाचे. दिसावयाला चलाख, नजर गहिरी, चालण्या-बोलण्यात निराळीच ऐट व प्रत्येक गोष्ट लक्षात घेऊन हिरीरीने पार पाडण्याकडे विशेष कल. तेव्हा साहजिकच डेहराडूनच्या क्रांतिकारकांच्या नजरेत तो भरला; व त्याला तेथील 'टागोर-व्हिला' ह्या भव्य वास्तूमध्ये राहण्या-जेवण्याची व्यवस्था करून दिली गेली. आयुष्यातले हे काही तरी योगायोग असतात, लागेबांधे असतात व त्याला अनुसरूनच माणसाला तशी बुद्धी होते, नकळत एका विशिष्ट दिशेने त्याची पावले पडत जातात व नकळत काही गोष्टी घडत असतात ! राशबिहारींच्या ऐन तारुण्यात अशीच ही गोष्ट घडली व त्यांचा संबंध 'टागोर-व्हिला' ह्या वास्तूशी आला. डेहराडूनमधील 'प्रफुल्लराय टागोर व्हिला' हे सशस्त्र क्रांतिकारकांचे एक केंद्र होते, ही गोष्ट साधारणपणे कोणालाच माहित नव्हती. त्या ठिकाणी मोठमोठाले क्रांतिकारक येऊन सल्लामसलत करून जात. त्यांमध्ये जितेन्द्रमोहन चतर्जी, जतिन्द्रनाथ बानर्जी ऊर्फ निरालंबस्वामी, बारिन्द्रकुमार घोष, लाला लजपतराय, किसनसिंग (भगवतसिंगांचे वडील), लाला अमरदास, हरदयाल, अमीरचंद, डॉ. यदुगोपाळ मुकर्जी, 'संगस्याल'चे संपादक सरदार अजितसिंग, व 'स्वराज्य' साप्ताहिकाचे संपादक सूफी अंबाप्रसाद ह्यांची नावे प्रामुख्याने दिसतात. ह्या सर्वांच्या साहचर्यामुळे राष्ट्रस्वातंत्र्याची विद्युत-चेतना राशबिहारींच्या अंगात संचरली ती ह्या 'टागोर व्हिला'मध्ये. त्यांच्यात आमूलाग्र परिवर्तन झाले राष्ट्रोद्धारासाठी आपले जीवन वाहून घेण्याचा त्यांनी संकल्प सोडला व तो अखेरपर्यंत पाळला !

ते धामधुमीचे १९०७ साल होते. बंगालच्या फाळणीनंतरचा वणवा सगळीकडे पेटलेला होता. 'युगांतर', 'वंदे मातरम्', 'संध्या' ही साप्ताहिके त्यांच्या वाचनात येऊ लागली. शक्तीपूजा संघटनेचे 'पांढरे बकरे बळी घ्या!' हे जहाल परिपत्रक त्यांनी अगणित वेळा नजरेखालून घातले. अखेर ते स्वतःच क्रांतिकारक बनले. पोटापाण्याचा उद्योग म्हणून ते इमाने-इतबारे सरकारी नोकरी करीत, पण बाकीचा सर्व वेळ टागोर व्हिलात क्रांतिकार्य. योगायोग असा गमतीचा, की 'प्रफुल्लनाथ टागोर व्हिला' ह्या नावाचे राशबिहारींना इतके जबरदस्त आकर्षण वाटत असे की १९१५ साली हिंदुस्थानातून जपानला फरारी होण्यासाठी त्यांनी जो पासपोर्ट मिळविला तो ह्या 'पी. एन. टागोर' ह्याच नावावर! १ मे १९०८ला मुझफरपूरला खुदिराम बोस व प्रफुल्ल चाकी ह्यानी बॉम्बचा पहिला धुमधडाका उडविला, ब्रिटिशांच्या डोळ्यांवरील झोप उडविली अन् बॉम्ब-युग निर्माण केले. त्यानंतर थंड व शांत स्वभावाचे राशबिहारी संतप्त होऊन क्रांतिकारकांच्या गटात दाखल झाले अन् एखाद्या अग्निबाणासारखे जे पुढे सटकले ते शेवटपर्यंत मागे वळलेच नाहीत! अलिपूर बॉम्ब-केसमधील माफीचा साक्षीदार नरेंद्र गोस्वामी ह्याच्यावर तुरुंगातील दवाखान्यात आरोपी कन्हय्यालाल दत्त व सत्येंद्रनाथ बोस ह्यानी पिस्तुले झाडून ३१ ऑगस्ट १९०८ ला त्याचा बळी घेतला! ती पिस्तुले तुरुंगात व्यवस्थेशीरपणे पोहोचविण्याची जबाबदारी चंद्रनगरच्या क्रांतिनेत्यांनी श्रीचंद्र घोष, बसंतकुमार बानर्जी व राशबिहारी बोस ह्या तिघावर टाकली होती ती त्यानी किती सुरेख जबाबदारीने पार पाडली! त्या वेळी हे तिघेही तरुण २१।२२ वर्षांचे होते. ह्या कोवळ्या वयात केवढे हे धाडस!

## हार्डिजवर टाकलेला बाँब

चंद्रनगरच्या क्रांतिकारकानी बाँब बनविण्याचा कारखानाच उघडला होता. काकिनारा हे गाव नदीच्या एका किनाऱ्याला ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दीत व नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावरील चंद्रनगर हे गाव फ्रेंच-हिंदुस्थानच्या हद्दीत. काकिनारा येथे सोन्या-चांदीचा धंदा करणारा एक सोनार अशुतोष नियोगी हा एक क्रांतिकारकच होता. तो लागेल त्या त्या वेळी कांकिनाराहून नदी पार करून चंद्रनगरला सल्फ्युरिक, नायट्रिक, पिकरिक् व कारबॉलिक ॲसिड व पोटॅश क्लोरेट् क्रांतिकारक मणीन्द्रनाथ नाईक ह्याच्याकडे पोहोचते करून रातोरात परत कांकिनाराला यावयाचा. मणीन्द्रनाथ योग्य ते मिश्रण करून बाँब तयार करावयाचे व क्रांतिकारकाना पुरवावयाचे. असे १९०८ पासून ते थेट १९१५ पर्यंत सतत चालूच होते. प्रत्येक बाँब हा अंदाजे १ पौंड ११ औंस वजनाचा असे. फ्रान्सहून परस्पर चंद्रनगरला पिस्तुले व दारुगोळा चोरून-मारून शिताफीने क्रांतिकारकांच्या हातात पडत असत. १९०९ साल उगवले अन् सर्व हिंदुस्थानभर-विशेषतः पंजाब, बंगाल व महाराष्ट्र-येथे सशस्त्र क्रांतिकारकाची केंद्रे ब्रिटिश राज्यकर्त्यांवर धाडसी हल्ले करण्यासाठी सिद्ध झाली. जोर वाढतच चालला. इंग्लंडहून सावरकरांनी धाडलेली पिस्तुले हिंदुस्थानात येऊन पोहोचली, आणि धुमधडाका सुरू झाला. जूनच्या ८ तारखेस बाबा सावरकरांना काळे पाण्याची सजा झाली. १ जुलैला भर लंडन शहरात मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीचा बळी घेतला! १३ नोव्हेंबरला लॉर्ड मिंटोवर अहमदाबाद येथे बॉम्ब फेकण्यात आला. १५ नोव्हेंबरला अनुशीलन समितीवर बंदी आली. अलीपूर बॉम्ब-केसचा निकाल लागून १२ डिसेंबरला बारींद्रकुमार, उल्हास दत्त, इंदुभूषण, हृषीकेश धंजीलाल, हेमचंद्रदास व विभूतिभूषण सरकार ह्या क्रांतिकारकांची अंदमानकडे रवानगी झाली अन् ह्या सगळ्यावर कळस म्हणजे २१ डिसेंबरला शूर कान्हेरे, कर्वे व देशपांडे ह्यानी नाशिकला घेतलेला जॅकसनचा बळी! ह्या तिघाही तरुणांची वये ह्या वेळी वीसच्या आसपास होती!

डेहराडूनला नोकरी करीत असतानाच अधूनमधून चंद्रनगर, कलकत्ता, लाहोर, कानपूर, दिल्ली व बनारस ह्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष सशस्त्र क्रांतीत भाग घेण्यात राशबिहारी पटाईत व सराईत झाले होते. अत्यंत धीम्या व घुम्या वृत्तीचा, थंड डोक्याचा राशबिहारी विजेसारखा इतक्या चपलखपणे वावरत होता तरीदेखील डेहराडूनला १९१३ पर्यंत त्याच्याविषयी कोणाला, कधीही व कसलाही संशय आला नाही. डेहराडूनचे टागोर व्हिला क्रांतिकेंद्र जवळजवळ त्यानेच काबीज करून टाकले होते. १९११ मध्ये राशबिहारींनी 'आत्मसमर्पण' नावाची क्रांतिकारकांची गुप्त संघटना उभारावयास सुरवात केली. ह्या वेळचे त्याचे उद्योग म्हणजे बाँब तयार करण्याची कृती शिकणे, ते हातावळावयास शिकणे, पिस्तुलाची नेमबाजी शिकणे व सैन्यातील गुरखा शिपायांकडून शस्त्रे विकत घेणे. चंद्रनगरच्या प्रवर्तक संघटनेचे अध्वर्यू क्रांतिकारक शिरीष घोष, मोतिलाल रॉय व राशबिहारी ह्यानी व्हाइसरॉयवर बाँब फेकण्याची योजना निश्चित केली व ते त्या कार्याला लागले. त्यात विशेष पुढाकार घेतला तो अनुशीलन समितीचे प्रफुल्लचंद्र गांगुली व राशबिहारी ह्यानी! चंद्रनगरहून डेहराडूनला परतताना राशबिहारींनी आपल्याबरोबर एक नेकीचा तरुण नेला तो म्हणजे बसंतकुमार बिश्वास! आपण एकटे असल्यामुळे एक स्वयंपाकी बरोबर आणला आहे, असे बसंतकुमारविषयी सांगून ते मोकळे होत. हळूहळू ह्या बिश्वासला घेऊन त्यांनी त्याला बाँब व पिस्तुले हाताळविण्यास शिकवले. दोन महिन्यातच तो त्यामध्ये प्रवीण झाला. त्याला डेहराडूनला फार काळ आपल्या सान्निध्यात ठेवणे योग्य नाही असे वाटल्यावरून राशबिहारींनी त्याला लाहोरला नेले व क्रांतिकारक बालमुकुंदमार्फत एका खाजगी दवाखान्यात नोकरीला लावले. त्याची सर्व हकिकत बालमुकुंदाच्या कानावर घातली व तो आपल्यापैकीच एक असल्याची खात्री करून दिली. दुसऱ्याच दिवशी राशबिहारी आपल्या कामावर रुजू!

१३ ऑक्टोबर १९१२ ला अवधबिहारी, बालमुकुंद, दीनानाथ गांगुली ह्याच्याबरोबर विचारविनिमय करून दिल्लीमध्ये लॉर्ड हार्डिजवर बाँब फेकण्याचे राशबिहारींनी निश्चित केले. बसंतकुमारला त्यांनी सर्व कटाची व कारस्थानाची रूपरेषा समजावून सांगितली. तेव्हापासून पुढे २ महिने दोन सर्व क्रांतिकारक दिल्लीला अधूनमधून जमू लागले. अखेर २१ डिसेंबरला लाहोरहून बसंतकुमार व अवधबिहारी दिल्लीला येऊन थडकले. डेहराडूनहून राशबिहारी पण आले. २३ डिसेंबरला लॉर्ड हार्डिजची मिरवणूक दुपारी चादणीचौकात येऊन थडकली अन् नजीकच्या इमारतीमधून राशबिहारी व बिश्वास ह्यांनी हार्डिजवर बाँब फेकलेच! प्रचंड गरुड भरारीच ती! सगळीकडे हलकल्लोळ माजला. ब्रिटिश साम्राज्याचे सिंहासन

हादरले. स्त्री वेषात असलेले राशबिहारी व बिस्वास त्या धामधुमीत पसार झाले ! कोणालाही त्याच्याविषयी संशय आलाच नाही. दुर्दैवाने लॉर्ड हार्डिजला किरकोळ दुखापती झाल्या व तो वाचला. एक घोडेस्वार व दोन चपराशी जागच्याजागीच मेले ! तेथून राशबिहारी तावडतोब जे सटकले ते दुसऱ्याच दिवशी डेहराडूनला नोकरीवर हजर ! नागरिकाची सभा भरली. त्यात हार्डिजवर झालेल्या बाँब-हल्ल्याचा निषेध–ठराव राशबिहारींनी माडला व तो सर्वानुमते मंजूर झाला. आपल्याविषयी काहीही संशय येऊ नये म्हणून त्यानी दाखविलेली बहाद्दुरी व कल्पकता काही विलक्षणच ! इतकेच नव्हे तर पुढे महिन्यानंतर दिल्लीहून हार्डिज विश्रातीसाठी डेहराडूनला गेला असता त्याच्या मिरवणुकीच्या वेळी हातात युनियन जॅक निशाण फडकावीत स्वागत करण्यामध्ये व आपली राजनिष्ठा व्यक्त करण्यामध्ये राशबिहारींनी खरोखर कमाल केली ! सत्तर वर्षांपूर्वीची ही घटना ध्यानात घेतली म्हणजे अंगावर शहारे येतात व राशबिहारींच्या दुर्दम्य आशावादाचे व धाडसी कर्तृत्वाचे कौतुक वाटते.

१७ मे १९१३ ला सिल्हटचा विभागीय कमिशनर जॉर्डन ह्याचा लाहोरला बळी घ्यावयाचे ठरले. राशबिहारींनी आखून दिलेल्या योजनेनुसार लॉरेन्स गार्डनमधील हॉटेलात गॉर्डन येऊन बसला असताना अवधबिहारी व बसंत बिस्वास तेथे गेले; परंतु अलीकडच्या वाचनालयातच बाँबचा स्फोट झाला. एक नोकर मेला ! धावपळ सुरू झाली. क्रातिकारक पसार झाले ! नोकरीवर राहण्यात आता धोका आहे, हे जाणून राशबिहारींनी सहा महिन्याची रजा घेतली व त्यानी डेहराडून सोडले ते कायमचेच ! लाहोरला त्यांनी खोट्या नावावर LIBERTY हे साप्ताहिक काढले. तसेच त्या वेळी निघत असलेले अनुशीलन समितीचे 'स्वाधीन-भारत' व 'स्वातत्र्य' ही दोन्ही जहाल साप्ताहिके चंदीचरण नाथ, भवानीप्रसाद दत्त, संजीवन मुकर्जी, केदारेश्वर भट्टाचार्य, सी. पी. स्विनमॉंग, यू. टोन. मॉंग व यकिन यूसू ह्याच्यामार्फत ब्रह्मदेश, सिंगापूर, मलाया, जपान, उत्तर अमेरिका व कॅनडा देशात धाडण्याची व्यवस्था झाली. 'स्वातत्र्य' साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकात राशबिहारींनी आवाहन केले होते. 'खुदिराम बोस, प्रफुल्ल चाकी, मदनलाल धिंग्रा, कन्हय्यालाल दत्त, कान्हेरे ह्या हिंदू हुतात्म्यांच्या बलिदानाचे विस्मरण होऊ देऊ नका ! हिंदूनो. उठा, जागे व्हा ! स्वातत्र्य मिळवा ! तो आपला जन्मसिद्ध हक्क आहे. ह्या हुतात्म्याच्या प्रेरणेनेच १९१० सालात आपण हार्डिजवर भर राजधानीत बाँब टाकून ब्रिटिशाच्या इभ्रतीला टोला मारला आहे. उठा, शस्त्रे पाजळा व पाढरे बकरे कापून काढा !'

हिंदुस्थानात सशस्त्र क्राती घडवून आणण्यासाठी राशबिहारींनी दंड थोपटले. कलकत्त्याच्या फोर्ट विल्यम किल्ल्यातील लष्करी छावणीमधील हिंदू सैनिकाबरोबर संपर्क साधून व त्याचबरोबर निरनिराळ्या ठिकाणच्या क्रातिकारकाबरोबरही विचारविनिमय सुरू झाला. २० फेब्रुवारी १९१४ ला अमीरचंद व अवधबिहारी हे दोन श्रेष्ठ क्रातिकारक पकडले गेले व अनेकांच्यावर पकडवॉरंटे सुटली. इतकी वर्षे गुपित राहिलेले राशबिहारींचे नाव पोलिसांना आता समजले. त्यांनी डेहराडूनला शोध केला, अनेक ठिकाणी छापे घातले. राशबिहारी चंद्रनगरला निघून गेले, परंतु काही तरी दिव्य करावे असे त्यांच्या मनाने घेतले. निष्णात पोलीस अधिकारी टेगार्ट व डेनहॅम ह्यांना विशेष अधिकार व जादा पोलीस देऊन राशबिहारींना पकडण्यासाठी नेमण्यात आले. त्यांना पकडून देणारास रोख बक्षिसे जाहीर झाली. वर्तमानपत्रांतून सूचना देण्यात आल्या. ४ एप्रिल १९१४ रोजी वडिलांना लिहिलेल्या आपल्या पत्रात राशबिहारींनी आपला ध्येयवाद स्पष्ट केला असून, राष्ट्र-स्वातंत्र्यासाठी आपण आपले जीवन समर्पित केले असल्याचे कळविले आहे. मूळ पत्र बंगाली भाषेत असून ते पश्चिम बंगाल सरकारच्या ऐतिहासिक दप्तरात नोंद झालेले आहे. एप्रिल १९१४ ते जानेवारी १९१५ ह्या कालात राशबिहारी बनारसमध्ये निरनिराळ्या वेषात, निरनिराळी नावे धारण करून निरनिराळ्या ठिकाणी रहात होते. क्रांतीचा रथ भरधाव वेगाने पुढे जात होता !

## महायुद्धाचा काळ

१९१४ ऑगस्टमध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. अशी जगड्व्याळ महायुद्धे ही परतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र होण्याची सुवर्णसंधी व पर्वणी असते, वरदान असते, असे मानले तर १८५७ नंतर, १९०७ पासून पुढे सतत बारा वर्षे हिंदू क्रांतिकारकांनी आतून अन् बाहेरून जी निकराची चिवट झुंज देऊन ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले ते ध्यानात घेतले, म्हणजे असेच वाटते की, हिंदू सशस्त्र क्रातिकारकांची ही दुसरी पिढी ह्या काळात हे दुसरे स्वातंत्र्ययुद्ध लढली. ती पिढी पराभूत झाली, परंतु तिने मागे ठेवलेल्या अनुभवामुळे व वारशामुळे पुढील तिसरी पिढी दुसरे महायुद्ध सुरू झाल्याबरोबर जी कार्यरत राहिली तिने ब्रिटिशाचे जू झुगारून दिले व मायभूमी स्वतंत्र केली. ह्या पद्धतीतही सिंहाचा वाटा उचलला तो शूर राशबिहारींनी!

महायुद्धाचा वणवा पेटल्यामुळे हिंदुस्थानातील ब्रिटिश व हिंदू सैनिकांच्या फौजा युरोप, आशिया व आफ्रिका खंडांतील रणक्षेत्रावर धाडल्या जाऊ लागल्या, तेव्हा सार्वत्रिक सशस्त्र क्रांतीचा उठाव करावयाचा झाला तर तो अशाच सधिकालात करणे श्रेयस्कर असते, हे ध्यानात घेऊन राशबिहारींनी स्वत: दिल्ली, बंगाल, पजाब, डाक्का येथील क्रातिकारकांना एकत्र आणून विचारविनिमय करण्याचे ठरविले. अनुशीलन समितीचा केदारेश्वर गुहा ह्या जर्मनीत जाऊन बोलणी करून नुकताच परतला होता. त्याने धीरेन्द्र सरकार, अनुकूल चक्रवर्ती, राशबिहारी ह्याची गाठ घेतली. बर्लिन-इंडिया कमिटीमार्फत जर्मन सरकार हिंदुस्थानातील क्रातिकारकाना पैसा व हत्यारे पुरविण्यास तयार असल्याचे दिसून आले. आत्मोन्नती, मुक्तिसघ, अनुशीलन-समिती, युगातर ह्या क्रातिकारी संघटना हत्यारे जमविण्याच्या मार्गावर होत्या व परदेशातून हत्यारे व दारुगोळा येत होताच; परंतु बराचसा माल ब्रिटिशानी पोसलेल्या हेराकडून खबरी मिळाल्यावर जप्तही होत होता. अशा परिस्थितीत क्रातिकारक शिरीष मित्र ह्यानी खबर आणली की, कलकत्याची रोडा कंपनी हिंदुस्थानातील सैन्याला पुरविण्यासाठी बरीच हत्यारे मागवीत असते व असाच मोठा साठा ऑगस्ट महिन्याच्या २४ तारखेस कलकत्ता बंदरात उतरणार आहे. त्यातील हत्यारे बंदरावरून परस्पर पळविण्याचा कट राशबिहारींनी रचला. २२ ऑगस्टला राशबिहारी,

अनुकूल चक्रवर्ती, हरिदास दत्त, नरेन्द्र भट्टाचार्य, जगत् गुप्ता, सुरेश चक्रवर्ती ह्यांनी कलकत्त्यातील छटवाली गल्लीच्या जवळ असलेल्या बगीच्यात बैठक घेतली व येणाऱ्या मालावर झडप घालण्याची योजना आखली. नरेन्द्र भट्टाचार्य ऊर्फ मानवेंद्र रॉय व नरेन् घोष यांना ती योजना पटली नाही. त्यांनी आपले अंग काढून घेतले. हरिदास दत्तांच्या डोक्यात हा डाका घालण्याची कल्पना सतत वर्षभर होती व म्हणूनच त्यांनी मोठ्या शिताफीने क्रांतिकारक तरुण शिरिशचंद्र मित्र ह्यांना रोडा कंपनीत नोकरी लावून दिली होती. त्याच्या मदतीने व सल्ल्याने बंदरावर येऊन पडलेल्या हत्यारे व दारुगोळ्याच्या पेट्या कस्टमच्या ताब्यातून काढून घेऊन, क्रांतिकारकांनी आणलेल्या बैलगाड्यांतून परस्पर पसार केल्या गेल्या. २२ वर्षांच्या शिरिषचंद्र रोडा कंपनीतून दुसऱ्याच दिवसापासून फरारी झाला. पळविलेल्या दारुगोळ्याच्या पेट्या मुकर्जींच्या वखारीत लपवून ठेवण्यात आल्या व त्या रातोरात उघडून, निरनिराळ्या पेटाऱ्यात भरून भुजंग धार, राशबिहारी, विहार गांगुली, बसंत दास, जगत् गुप्ता, नरेन्द्र भट्टाचार्य व हरीष शिकंदर ह्यांनी चंद्रनगर, डाक्का, श्यामनगर, लाहोर व अन्य केंद्रांवर ताबडतोब पाठवून देण्याची व्यवस्था केली. ह्याच दारुगोळ्याचा उपयोग करून क्रांतिकारकांनी १९१५ सालात २२ ठिकाणी सशस्त्र हल्ले केले, ३५ राजकीय दरोडे टाकले, ५२ पोलीस खात्यातील अंमलदार व ३७ घरभेदे नतद्रष्ट हेर ठार मारून टाकले. तसेच बालासोर येथे सुप्रसिद्ध लढा देऊन शौर्य गाजविले. ह्या रणधुमाळीत बिनीचे शूर वीर तरिणी मुजुमदार, नलिनी बागची, जोगेंद्रनाथ भट्टाचार्य, देवेंद्रनाथ चौधरी, भूपेन्द्रकुमार दत्त, ह्यांनी व इतर अनेक वीरांनी आपली आहुती पेटलेल्या यज्ञकुंडात अर्पण केली व त्यांच्या उडालेल्या उष्ण रक्ताच्या चिळकांड्यांतूनच सशस्त्र क्रांतिकारकांची नवीन पिढी उदयास आली.

ह्यावेळी अमेरिका व कॅनडा येथे पेटलेल्या गदरच्या चळवळीतील विष्णुपंत पिंगळे लपत छपत, मोठ्या हिंमतीने व शिताफीने २० नोव्हेंबर १९१४ ला हिंदुस्थानात येऊन पोहोचले. युद्धाच्या अडचणीत इंग्लंड सापडले असल्यामुळे हिंदुस्थानत जाऊन जमले तर सशस्त्र क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने जे अनेक क्रांतिकारक येत होते त्यातच येणारे हे पिंगळे. अजिबात वेळ न गमावता त्यांनी राशबिहारी व इतर क्रांतिकारकांच्या गाठी घेतल्या. ३१ डिसेंबर १९१४ ला राशबिहारी व पिंगळे ह्यांनी क्रांतिनेत्यांना बनारसला बोलावून घेतले. कोणत्याही एका विवक्षित दिवशीच निरनिराळ्या शहरातील पोलीस ठाण्यावर, लष्करी व तारायंत्र केंद्रावर हल्ले करण्याची योजना आखण्यात आली. कामाची वाटणी झाली, हल्ले करण्याच्या जागा निश्चित करण्यात आल्या व लष्करी ठाणी व छावण्या उध्वस्त कोणी व कशा करावयाच्या हेही ठरविले गेले. १६ जानेवारी १९१५ ह्या दिवशी पुन्हा सर्व नेते बनारस येथेच हरिश्चंद्र घाटाच्या नजीकच्या खोलीमध्ये जमा झाले. १५ दिवसात केलेल्या कार्याचा आढावा प्रत्येकाने दिला. २१ फेब्रुवारी १९१५ हा सार्वत्रिक उठावणीचा दिवस नक्की करण्यात आला. राशबिहारी अमृतसरला गेले, ज्योतीद्रनाथ बंगालकडे निघून गेले व पंजाबात पिंगळे गेले. राजकीय दरोडे टाकून व हत्याकांड उभारून भीतिग्रस्त वातावरण कायम फैलावण्याचे काम अमरेन्द्रनाथ चतर्जी ह्यांनी आपल्याकडे घेतले.

मोठ्या प्रमाणावर बॉम्ब निर्मिती चालू होतीच. जालंदर, बन्नू, कोहट, झाशी, रावळपिंडी, पेशावर, होशियापूर, झेलम, कपुरथळा, फेरोझपूर, अंबाला, मीरत येथील लष्करी छावण्यांतील हिंदू सेना व घोडदळ फितविण्याचे व त्यांना २१ फेब्रुवारीला एकदम उठावणी करून ब्रिटिश ऑफिसर्सना मारून टाकण्याच्या कामाची बरोबर अचूक कल्पना देणे चालू होते. चक्रे वेगाने फिरू लागली. सिंगापूरला गेलेल्या हिंदू व शीख पलटणी (५वी नेटिव्ह लाइट इन्फंट्री) ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हुकूम मानेनाशी झाली. पंजाबातील १२व्या नंबरचे पायदळ, १२८ पायोनिअर्स, झाशीची ८वी पायदळ पलटण, मीरतची २३ वी घोडदळ पलटण व ७वी रजपूत रेजिमेंट फितविण्यात क्रांतिकारकांना चांगलेच यश मिळाले. या पलटणीमधील सैनिकांनी आफ्रिकेत जाण्याविषयी नकार दिला व सक्ती केल्यास परिणाम वाईट होतील, अशी ब्रिटिश अधिकाऱ्यांना तंबी दिली !

इतकी सर्व तयारी झाली; पण दुर्दैवाने विनायक कापले व कृपालसिंग ह्या दोन नतद्रष्ट हेरांनी अखेर धोका द्यायचा तो दिलाच ! ५ फेब्रुवारीला लाहोर स्टेशनवर रात्री राशबिहारी गेले असताना तेथे त्यांना कृपालसिंगाच्या हालचालीवरून एकदम संशय आला. त्यांनी रात्रीच्या गाडीने कानपूरला जाण्याचे रहित करून, स्वतःजवळील बॅगमधून वेष बदलण्याचे साहित्य काढले. लांब दाढी चिकटविली, वेष बदलला व कृपालसिंगाच्या हालचालीवर पुढील २४ तास पाळत ठेवून बरोबर छडा लावला. त्याला गोळी घालून ठार मारून टाकण्याचे त्यांनी ठरविले; पण त्या दिवसापासून तो जो फरारी झाला तो त्यांना व इतर क्रांतिकारकांना दिसलाच नाही ! ह्याच वेळी पंजाबमध्ये क्रांतिकारकाच्या गटागटात ब्रिटिशांनी जे हेर पेरून ठेवले होते त्यांनी—मूलासिंग, लियाकत ह्यातखान, बेलासिंग झैलदार, व बलवंतसिंग ह्यांनी पंजाबातील डाव उधळून लावला. राशबिहारींनी ६ फेब्रुवारीला सर्व केंद्रांना कळविले की, सार्वत्रिक उठावणीचा दिवस, जो २१ फेब्रुवारी नक्की झाला आहे तो बदलून १९ फेब्रुवारी ठरविला आहे. १९ फेब्रुवारीच्या उठावणीचा संदेश काही केंद्रांना पोहोचला. काहींना नाही. पण त्यामुळे गोंधळ मात्र झाला. उघडपणे काही करता येणे, बोलणे वा लिहिणे हे धोक्याचेच होते. दिनांक का बदलला, हे कित्येकांच्या ध्यानातच येईना. हेरांनी पोलिसांना २१ फेब्रुवारी हा उठावणीचा दिवस म्हणून सांगून ठेवलेले, त्याच्या अगोदर जितके क्रांतिकारक पकडता येतील तेवढे पकडावयाचे, असे ठरवून पोलिसांनी निरनिराळ्या ठिकाणी १९ फेब्रुवारीलाच धाडी घालण्यास सुरुवात केली. असाच एक छापा १९ तारखेस पहाटे लाहोरला मोची गेटजवळील एका पडक्या घरावर टाकण्यात आला. हेर कृपालसिंग पोलिसांबरोबर होताच. काही क्रांतिकारक पकडले गेले, काही निसटले ! निसटणाऱ्यामध्ये राशबिहारी व पिंगळे होते. दोघेही जण तेथून बनारसला निघून गेले !

पंजाब, बंगाल, उत्तर प्रदेश, सरहद्द प्रांत येथील क्रांतिकारकामध्ये मिसळलेल्या हेरांचा १९१६ नंतर चांगलाच काटा काढला गेला. कृपालसिंग जून १९१७ मध्ये व विनायक कापले फेब्रुवारी १९१८ मध्ये मारून टाकले गेले व पंजाबमधील हेरांचीही तशीच संभावना झाली.

२१ फेब्रुवारीला काही ठिकाणी क्रांतिकारकांनी छापे घातले

पोलीस चौकीवर हल्ले केले, तारायंत्रे निकामी करण्यात आली. दहशत निर्माण झाली; पण उठाव निष्फळ झाला, एवढे मात्र खरे! ब्रिटिशांनी पेरलेल्या हेरांनी ह्या सार्वत्रिक उठावाच्या रंगाचा बेरंग करून टाकला. सारीपाट उधळला गेला. बरेचसे शूर हिंदू-क्रातिकारक प्राणाला मुकले, काही जन्मभर सडत-कुजत कारावासात पडले, काही बेपत्ता झाले, काही वेडे झाले! इतके अपयश पदरी पडले तरी राशबिहारी व पिंगळे आशावादीच होते. 'हिंमत खचणे' हे शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हतेच! 'क्रांती-क्राती' हे शब्द त्यांच्या रोमरोमात भिनले होते. वेडेपिसे झालेले पिंगळे पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागले. सेना फितूर करता आली तर प्रयत्न करून पहावा, म्हणून त्यांनी मीरतच्या १२८ पायोनियर्स व १२वी पायदळ पलटण ह्यांच्याकडे संपर्क साधण्यास सुरुवात केली. मार्चच्या पहिल्या आठवड्यात पायोनिअर्स पलटणीतील नदीरखान नावाचा मुसलमान अधिकारी पिंगळ्याना भेटला. त्याने मदत देण्याचे वचन दिले, पण ते सर्व खोटे होते. २३ मार्चला पिंगळे पुन्हा पलटणीत जाऊन नदीरखानला भेटले, पण त्या दुष्ट व नीच मुसलमानाने सरळ पिंगळ्यांना ब्रिटिश अधिकाऱ्याकडे नेले व कैद केले. त्यांच्या अंगझडतीमध्ये एक भरलेले पॉवर पिस्तूल व दोन बॉंब मिळाले. पिंगळे पकडले गेल्याचे कळल्याबरोबर राशबिहारींनी बनारसला रामराम ठोकला व ते चंद्रनगरला निघून गेले.

## सिंगापूर....शांघाय....जपान

आता क्रातिकार्य पुढे रेटणे मुश्किलीचे पडू लागले. सर्व बाजूनी ते हळूहळू घेरले जाऊ लागले. हे ध्यानात घेऊन हिंदुस्थान सोडून परदेशी जाण्याचे त्यांनी ठरविले. पी. एन. टागोर ह्या नावाने पासपोर्ट काढला व त्यानी जपानला निघून जाण्याची सिद्धता केली.

त्याना हिंदी, उर्दू, पंजाबी, बंगाली, गुरुमुखी, इंग्लिश व फ्रेंच ह्या भाषाचे चागले ज्ञान होते. निरनिराळे वेश करण्यात व विशेषत: स्त्री-वेष करण्यात ते दर्दी झाले होते. स्त्री-वेषात ते बिनदिक्कतपणे व बेडरपणे समाजातदेखील वावरत असत, हे विशेष. बनारसला बिभूतिशरण हलधरांच्या घरावर पोलिसांचा छापा पडला त्या वेळी आतमध्ये स्त्री-वेषात असलेले राशबिहारी पोलिसांच्या नजरेतून सहजासहजी निसटून गेले. सगळ्यात आश्चर्य म्हणजे 'पी. एन. टागोर' ह्या बनावट नावावर मिळवावयाच्या पासपोर्ट-ओळखपत्रावर सही घेण्यासाठी व सरकारी शिक्का-मोर्तब मिळविण्यासाठी राशबिहारी १९१५च्या एप्रिल महिन्यात कलकत्त्याच्या पोलीस आयुक्ताना भेटले व काम फत्ते करून आले. त्या वेळी आयुक्तांना त्यांनी असे भासविले की, रवीन्द्रनाथ टागोर १९१६ साली जपानला भेट देणार आहेत. तेव्हा त्यांची अगोदरची व्यवस्था करण्यासाठी आपण जपानला जात आहोत!

अखेर 'शानुकी मारू' ह्या जपानी बोटीने राशबिहारींनी १२ मे १९१५ ह्या दिवशी हिंदुस्थानचा किनारा सोडला. पुढील तीस वर्षांत जन्मभूमीला त्यांचे पाय लागले नाहीत! २२ मेला ते सिंगापूरला पोहोचले व १५ जूनला टोकिओ. जूनअखेर भगवानसिंगबरोबर ते शांघायला गेले. कारण काही क्रांतिकारक जपानमधील जर्मन वकिलातीमार्फत पैशाची व शस्त्रास्त्राची भरपूर मदत शाघायमध्ये करण्यास तयार होते. 'हिंदुस्थानातील श्रेष्ठ, सचोटीचा हिंदू क्रांतिकारक' म्हणून राशबिहारीचे नाव जर्मन वकिलातीकडे दाखल झालेले होते. जपानला पूर्वी पळून आलेले डॉ. सनयत् सेन व बर्माचे मोटोसुरू टोयोमा ह्यांचीही येथे राशबिहारीशी गाठ पडली. डाक्का येथील अनुशीलन समितीच्या क्रातिकारकाबरोबर त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. त्यांनी शस्त्रास्त्रे हिंदुस्थानातील किनाऱ्यावर उतरवून घेण्याची व्यवस्था होईल असे कळविल्याबरोबर राशबिहारींनी शाघायहून दोन चिनी क्रांतिकारकांमार्फत दोनशे पॉवर पिस्तुले कलकत्त्याला धाडण्याची व्यवस्था केली. बरीचशी पोहोचली. काही गडप झाली. त्याच वेळी क्रांतिकारक अभनीनाथ मुकर्जी जपानहून शांघायला जात होता, तो त्याला सिंगापूरला ब्रिटिशांनी पकडला. त्याच्याजवळच्या झडतीत नोंदवह्या, बरेचसे पत्ते, क्रांतिकारकांची नावे पोलिसांना मिळाली. त्या सर्वांवर पकडवॉरंटे काढण्याची त्यांनी हिंदुस्थान सरकारला विनंती केली. त्यावरून पत्ता लागला की, राशबिहारी फरारी होऊन जपानमध्ये वास्तव्य करून आहेत. २० नोव्हेंबर हा जपानच्या राजाचा राज्यारोहणदिन. राशबिहारींनी तो दिन १९१५ साली आवर्जून साजरा केला व एक खाना दिला! त्याच वेळी क्रातिकारकाची एक बैठक घेतली. लाला लजपतराय व हेरंबलाल हजर होते. अमेरिकेतील तरखनाथदास आदी हिंदू क्रातिकारकांबरोबर राशबिहारीचा पत्रव्यवहार सुरू झाला. 'दामाटो शिंबू' व 'ओसाका मायतिची' ह्या जबाबदार जपानी भाषेतील वर्तमानपत्रात लेख लिहून त्यांनी ब्रिटिशविरोधी चळवळ उभारली. हिंदुस्थान सरकारकडून त्यांच्या टोकिओमधील वकिलातीकडे राशबिहारींना पकडून हिंदुस्थानला पाठविण्यासंबंधी पत्रे येऊ लागली. राशबिहारींच्या जपानी मित्राना ते कळल्यावर त्यांनी राशबिहारींना जपानी पेहेराव देऊन त्यांचे 'इमाशी इचिसे' हे नाव ठेवले व एका सुशिक्षित कुटुंबामध्ये घरगडी म्हणून कामाला ठेवले. काही महिन्यांनतर तेथील नोकरीतून काढून टोकिओला बाकासूर्य बेकरीमध्ये पाव तयार करण्याच्या कामावर त्याला गुंतविले. लवकरच राशबिहारींनी जपानी भाषा आत्मसात करून टाकली. जपानी भाषेत ते लेखन करू लागले. बेकरीवाल्याची मुलगी टोशिको हिच्याबरोबर १९१८ साली त्यांनी विवाह करून टाकला. जपानी नागरिकत्व पत्करले. मूळ हेतू एकच की, कितीही आपत्ती आल्या तरी ब्रिटिशाच्या हाती लागावयाचे नाही! कारण पकडलं की फाशी ठेवलेलीच! आता, आतून नव्हे तर बाहेरून, ब्रिटिशांचे हिंदुस्थानवरील शासन कसे उधळून लावावयाचे ह्याचा ते विचार करू लागले. ६ एप्रिल १९१७ ह्या दिवशी अमेरिका युद्धात पडली व नंतर ताबडतोब तेथील हिंदू क्रातिकारक पकडले गेले. नोव्हेंबर १९१८ मध्ये महायुद्ध संपले. हिंदुस्थान स्वतंत्र करता आला नाही, म्हणून सर्वच सशस्त्र क्रातिकारक दु:खीकष्टी झाले. बराच प्रयत्न करूनसुद्धा जर्मनी, इंग्लंड व अमेरिका ह्यांच्यामध्ये झालेल्या व्हर्सायच्या तहाच्या अटींमध्ये हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य दिले जावे, हे कलम ब्रिटिशानी घालूच दिले नाही. पारतंत्र्याची पक्कड अधिकच घट्ट झाली. जुलूम—जबरदस्ती वाढतच गेली.

महायुद्ध संपले. युरोप थंड पडला! रशियात साम्यवादी बोल्शेव्हिकांचे शासन आले अन् हिंदुस्थानात टिळक-युग संपून गाधी-युग

सुरू झाले. महात्मा गांधींची कॉंग्रेस निःशस्त्रांच्या राजकारणात घुसली आणि अहिंसा व असहकारही दोन अस्त्रे पाजळून ब्रिटिश साम्राज्याबरोबर झुंज देण्यास सिद्ध झाली. महायुद्धाच्या पडझडीमुळे दिशाहीन झालेले हिंदू क्रांतिकारक रानोमाळ सैरावैरा भटकत. अखेर त्यामुळे काही अहिंसक कॉंग्रेसवादी झाले व बाकीचे हिंदुस्थानातच साम्यवादाकडे वळले !

## आय्. एन्. ए. ची स्थापना

महात्मा गांधींच्या आत्यंतिक अहिंसावादावर व रशियाच्या साम्यवादी आत्यंतिक हिंसावादावर राशबिहारींचा मुळीच विश्वास नव्हता. पुढील पाच वर्षे वाचन व लेखन करीत त्यांनी काढली. १९२४ मध्ये रवींद्रनाथ टागोर जपानला गेले होते. त्यांच्याबरोबर विचार विनिमय करून त्यांनी इंडियन इंडिपेन्डन्टस लीग स्थापन केली व Asia for Asians हे बोधवाक्य घालून नवीन चळवळीचा श्रीगणेशा केला. इंडो–जपानीज कल्चरल लीग स्थापन करून त्याकरवी हिंदुस्थानातील क्रांतिकारकांशी संपर्क साधण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. सिंगापूर, शांघाय, मलाया बेटे, बर्मा, जपान ह्या भागात स्थायिक झालेल्या हिंदूंना जपानला पाचारण करून त्यांनी नागासाकी येथे १ ऑगस्ट १९२६ ह्या दिवशी South–East Asian Conference घेतली. नवनवीन हिंदू तरुण त्या परिषदेला आलेले होते. त्यांचे अपेक्षेबाहेर सहाय्य राशबिहारींना मिळाले. हिंदू व्यापाऱ्यांनी भरपूर पैशाची मदत केली. राशबिहारींनी पुन्हा चळवळ सुरू करून कार्याला चालना दिली. १९३३ साली हिटलर जर्मनीत सत्तेवर आला व युरोपमध्ये निराळेच वारे वाहू लागले, हळूहळू युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊ लागली. ७ जुलै १९३७ ला चीन–जपान युद्ध सुरू झाले. हिंदुस्थानातील कॉंग्रेसने जपानचा धिक्कार केला व चीनला मदतीचे आवाहन केले. हिंदूचे गलिच्छ राजकारण पाहून राशबिहारींच्या अंगाचा भडका उडाला. 'बळी तो कान पिळी' 'शस्त्र–संभाराच्या ताकतीवरच मुडदाड राष्ट्र उठते', 'हिंदूंनी सशस्त्र व्हावे–निःशस्त्र राहणे हे पाप आहे !' 'इंग्लंडचा शत्रू तो आपला मित्र' असे सुंदर सुंदर लेख त्यांनी लिहिले व हिंदूंच्या आत्मघातकी वृत्तीचा धिःकार केला ! पुढेदेखील 'हिंदी–चिनी भाई भाई', 'हिंदू-मुसलमान भाई भाई', 'हिंदी-रूसो भाई भाई' ह्या घोषणा नामर्दांच्या आहेत, दुबळेपणाच्या आहेत, मुडदाडपणाच्या आहेत, असेच त्यांना वाटे. सावरकरांची 'सकल-हिंदू भाई भाई' हीच घोषणा त्यांना आवडे, म्हणून ते हिंदुसभावादी झाले. जपानमध्ये त्यांनी हिंदू–महासभेची शाखादेखील स्थापन केली !

२८ ऑक्टोबर १९३७ ला राशबिहारींनी आशियातील हिंदू विद्यार्थ्यांची एक बैठक टोकिओला घेतली. Asia for Asians : Go home असा ठराव पास करून घेऊन नोव्हेंबरमध्ये एक जाहीरनामा प्रसिद्धीला दिला. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले पण उत्थापन करण्याची संधी पुन्हा वाया जाऊ नये म्हणून राशबिहारींची धडपड सुरू झाली. सावरकर, सुभाष बोस व अन्य हिंदू क्रांतिकारकांबरोबर त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. प्रचंड प्रमाणावर उठावणी केली तरच ब्रिटिश हिंदुस्थानातून काढता पाय घेतील, अशी खूणगाठ मनाशी बांधून तशा दृष्टीने ते कार्याची आखणी करू लागले. ७ डिसेंबर १९४१ ला पर्ल बंदरावर हल्ला झाल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून त्यांनी दौऱ्याला आरंभ केला. जपानमध्येच रहाणाऱ्या हिंदूंची त्यांनी २६ डिसेंबरला टोकिओला बैठक घेतली. कोबे, योकोहामा, ओसाका आदी अन्य ठिकाणाहून बरेच हिंदू तरुण बैठकीला उपस्थित होते. दरेक महत्त्वाच्या जपानी व इंग्लिश भाषेतील जबाबदार वर्तमानपत्रांतून त्यांनी हिंदूंना चेतावणी देणारे लेख लिहिण्यास सुरुवात केली. ह्याचा परिणाम असा झाला की, जपानचे पंतप्रधान टोजो ह्यांनी डायट् (पार्लमेंट) मध्ये जाहीर केले की, 'हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे क्रांतिकारक गट तयार असतील त्यांना सर्वतोपरी सहाय्य जपान देईल !' ह्या वेळेपर्यंत जर्मनीने प्रत्येक रणभूमीवर ब्रिटिशांना धूळ चारली होती. हिंदुस्थानातही ब्रिटिश सैन्य अगदी थोडे होते. ह्याचा फायदा घेऊन बाहेरून परस्पर जपानच्या मदतीने लष्कर उभारून हिंदुस्थानावर चाल केली तर दिल्ली काबीज करता येईल, असा त्यांनी होरा बांधला. Indian Independance League च्या शाखा निरनिराळ्या देशांतून होत्याच. त्यांना कार्य वाटून देण्याच्या दृष्टीने ते मलाया, सिंगापूर व इतर देशात जाऊन आले. हिंदुस्थानातील पकडून ठेवलेली सेना जपान, जर्मनी व इटली ह्यांनी आपल्या ताब्यात घ्यावी म्हणजे बर्माच्या बाजूने स्वारी करणे सोइस्कर होईल असा सल्ला जपानच्या पंतप्रधानांना त्यांनी दिला. जपानने समती दिली. हिंदू युद्धकैदी मोकळे केले गेले. आय. एन. ए. स्थापन झाली. सरदार प्रीतमसिंग ह्यांना सैन्याचे नेतृत्व देऊन ब्रह्मदेशावर चाल करून जाण्यासाठी राशबिहारींनी डावपेच टाकण्यात सुरुवात केली. मोहनसिंगचा अंगचुकारपणा राशबिहारींच्या ध्यानात आल्याबरोबर त्यांनी स्वतंत्र चौकशी सुरू केली. त्यातच सैन्यातील वरच्या दर्जाच्या पाच अधिकाऱ्यांनी मोहनसिंगाची अरेरावी व कार्यातील गलथानपणा राशबिहारींच्या नजरेस आणून दिला ! मोहनसिंगला काढून टाकून सैन्याच्या आघाडीचे नेतृत्व त्यांनी स्वतःकडे घेतले. कौलालंपूरला सैनिकी शिक्षणाचे प्रचंड केंद्र उभारण्यात आले. परदेशातील हिंदु, लष्करी शिक्षण घेण्यासाठी केन्द्रात दाखल होऊ लागले.

ह्या वेळची हिंदुस्थानातील परिस्थिती मोठी चमत्कारिक होती. गांधीवादी कॉंग्रेस आपले अहिंसक सैनिक तुरुंगभरती करण्यासाठी धाडीत होती. कडवे हिंदुद्वेष्टे मुसलमान, हिंदुस्थानचे तुकडे पाडून स्वतंत्र मुसलमानी राज्ये स्थापन करण्याचा मनसुबा राखून, त्या दृष्टिकोनातून चळवळ करीत होते, तर ब्रिटिश राज्यकर्ते आपले साम्राज्य कसे टिकवायचे व यदाकदाचित हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यावयाचे ठरले, तर देशाची फाळणी करून आपले स्वत्व कसे टिकवायचे, ह्या विचारात गढून गेलेले होते ! हिंदुत्ववादी सावरकर रत्नागिरीच्या गुहेतून बाहेर पडून राजकारणाच्या रिंगणात उतरले होते. हिंदू तरुणांनी सैन्यात शिरावे, लष्करी शिक्षण घ्यावे, निरनिराळ्या प्रकारची शस्त्रे हाताळावीत म्हणजेच पुढे हिंदुस्थान स्वतंत्र करणे सोपे जाईल, हे अट्टाहासाने जीव तोडून सांगणारे फक्त एकच व ते म्हणजे सावरकर ! कॉंग्रेसवादी हिंदूंनी त्यांची उलटी टिंगल व बेअब्रू केली. त्यांची वैचारिक भूमिका शेवटपर्यंत त्यांना समजलीच नाही. सैन्यातील पकडलेल्या गेलेल्या हिंदु सैनिकांनीच आझाद हिंद सेना मजबूत केली व ब्रह्मदेशावर धडक

मारली, नौदलात बंडे उभारली आणि ब्रिटिशांना हैराण करून सोडले.

१९३९ मध्ये सुभाषचंद्र बोस कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले, गांधी व जवाहरलाल जपानविरोधी व अहिंसावादाचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी जहाल राजकारणी सुभाषचंद्रांना अर्धचंद्र दिला. २९-४-१९३९ला कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यावर चारच दिवसांत सुभाषचंद्रानी फॉरवर्ड ब्लॉक निर्माण केला. ह्या दोन्ही घटना अत्यंत आशादायी घडल्या असा राशबिहारींनी निष्कर्ष काढला व ते खूष झाले. त्यांनी सावरकर व सुभाषचंद्र ह्या दोघांच्याही पाठीमागे टुमणे लावले की, त्यांनी ताबडतोब हिंदुस्थान सोडून, परदेशात जाऊन, बाहेरून क्रांती घडवून आणावी; ते अधिक सोपे आहे. इंग्लंडचे शत्रू आपणास मदत करण्यास सिद्ध आहेत. बाहेर स्वातंत्र्य-सेना लवकर उभी राहील व दोघेहीजण समर्थ नेते असल्यामुळे स्वातंत्र्य मिळविणे सोपे जाईल. ह्यांच्यातील पत्रव्यवहार बौद्ध भिक्षूंच्यामार्फत चालत होता. बालिगंज सेंट्रल बँकेचे मॅनेजर, जे. सी. दास व कलकत्त्यातील एक क्रांतिकारी विचाराचा तरूण बंगाली इंजिनिअर जतिन लोचनमित्र, चंद्रनगरचे श्रीचंद्र घोष व ग्लोब नर्सरीचे अमरनाथ रॉय ह्या सर्वांच्या मार्फतही पत्रव्यवहार होत असे.

अखेर २२ जून १९४० रोजी सावरकर व सुभाषचंद्र गुप्तपणे भेटले, विचारविनिमय झाला व सध्या फक्त सुभाषबाबूंनीच हिंदुस्थान सोडून जावे, असे ठरले. मार्चमध्ये अफगाणिस्तानमार्गे बोस जर्मनीला निघून गेले. बँकॉकला १५ जून ते २३ जून १९४२ ह्या आठवड्यात भरलेल्या क्रांतिकारकांच्या बैठकीत सुभाषबाबूंना बोलावून घेण्याचे ठरले. राशबिहारींनी तशी व्यवस्था केली. लीगचे प्रमुख कार्यालय बँकॉकहून सिंगापूरला नेण्यात आले. राशबिहारींच्या बोलावण्यानुसार सुभाषचंद्र जर्मनीहून पाणबुडीने जपानला गेले व १३ जून १९४३ ला टोकिओला पोहोचले! मलाया-ब्रह्मदेश ह्या भागातून हिंदुस्थानवर स्वारी करण्याची आखलेली योजना राशबिहारींनी सुभाषचंद्राना बरोबर समजावून दिली. ४ जुलैला दोघेजण सिंगापूरला गेले. ५ जुलैच्या सैनिक मेळाव्यात राशबिहारींनी आय. एन. ए.च्या नेतेपदाचा राजिनामा दिला व नेतेपद सुभाषचंद्राच्याकडे सोपवले. पुढील वर्षभर दोघानी एकत्र राहून प्रचंड संघटना मजबूत केली. क्रांतिकार्य पुढे खेचत नेले. जपानची उत्तम मदत झाली. आझाद हिंद फौज दिल्लीच्या रोखाने पुढे सरकत राहिली. हिंदुस्थानातील फौज बिथरली. निरनिराळ्या लष्करी व नाविक केंद्रावर बंडे होऊ लागली. ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हुकूम हिंदू सैनिक धुडकावू लागले. अमेरिकेच्या मदतीने महायुद्धाचा रंग पालटला व १९४४ पासून असे वाटू लागले की, जर्मनी, इटली व जपान युद्ध हरणार!

हिंदुस्थानचे दुर्दैव असे की, अशा ह्या संधिकालात व आझाद हिंद सेनेच्या फौजा हिंदुस्थानात घुसून व दिल्लीत जाऊन थडकणार अशा वेळी राशबिहारी २१ जानेवारी १९४५ ह्या दिवशी मृत्यू पावले व त्याच्यापाठोपाठ १८ ऑगस्ट १९४५ ह्या दिवशी सुभाषचंद्र बोस विमान अपघातात सापडून मरण पावले!

दोन्ही महायुद्धे राशबिहारींनी सशस्त्र क्रांतिकारकांच्या दृष्टिकोनातून न्याहाळली. स्वत.चे अनेक मित्र पहिले महायुद्ध संपल्यानंतर गांधीवादी झाले, साम्यवादी झाले; पण त्याची यत्किंचितही क्षिती न बाळगता मरेपर्यंत हिंदुत्वाची ध्वजा निरतिशय प्रेमाने, अत्यंत आदराने, स्वतःच्या खांद्यावर मोठ्या अभिमानाने त्यांनी निःसंकोचपणे मिरवली. सावरकरांना व सुभाषबाबूंना हिंदुस्थान सोडून परदेशात येऊन क्रांतिकार्य करण्याची स्फूर्ती व हिंमत दिली. दुसरे महायुद्ध सुरू झाल्याबरोबर मोठ्या हिंमतीने आझाद हिंद सेना उभी करून व लष्करी शिक्षणाची केंद्रे उभारून दोन वर्षे नेतृत्व केले व आपल्यापेक्षा काकणभर सरस असे सुभाषचंद्र भेटताच त्यांच्या मस्तकावर नेतेपदाचा मुकुट ठेवून स्वतः बाजूस सरकले! १९०७ पासून तब्बल ३८ वर्षे सतत त्यागी वृत्तीने राहून मायभूमी स्वतंत्र करण्यासाठी ज्यांनी जिवाचे रान केले, अक्षरशः कण न् कण झिजविला व अखेरी पेटलेल्या महायज्ञात २१ जानेवारी १९४५ ला आपली समिधा अर्पिली, अशा थोर महान हिंदू सशस्त्र क्रांतिकारकाचे नाव आहे-राशबिहारी बोस!

त्यांच्या बहुरंगी आयुष्यात कोणत्या यातना अन् हालअपेष्टा भोगावयाच्या शिल्लक राहिल्या होत्या? नाही घडला तो फक्त तुरुंगवासच! हिंमत न हारता भीतिग्रस्त जीवन, हिंदुस्थानात १९०७ ते १९१५ ही आठ वर्षे व जपानमध्ये १९१६ ते १९२३ ही सात वर्षे काढणे हे केवढे धीरोदात्त व ध्येयवादी कर्तृत्व!

सशस्त्र क्रांतिकारक म्हणून काहीही करावयाचे त्यांचे शिल्लक राहिले नव्हते. त्यांनी बॉम्ब हाताळले, पिस्तुले घडविली, क्रांतिकारकांच्या संघटना उभारल्या, आझाद हिंद सेनेचे दोन वर्षे नेतृत्व केले, इंग्लिश व जपानी भाषेत भरपूर लेखन केले, अनेक खोटी नावे धारण करून क्रांतिकार्य केले अन् ते अशा अवस्थेत की, ज्या वेळी ब्रिटिश सरकारने त्यांना पकडून देणारास लाख लाख रुपयांची बक्षिसे जाहीर केली होती तेव्हा! टीचभर पोट भरण्यासाठी व स्वत.चा ठावठिकाणा लागू नये म्हणून त्यांनी भटारखान्यात रोटघा बडवल्या, हॉटेलमध्ये राहून कप-बशा विसळल्या, घरगड्याचे काम केले, वर्तमानपत्रे विकण्याचा व्यवसाय केला, स्टेशनवरती व बंदरावरती हमाली केली, फोटोग्राफरकडे नोकरी केली......काहीही करावयाचे शिल्लक ठेवले नाही! अन् हे सर्व कशासाठी? तर स्वतः जिवंत राहून, ब्रिटिश राज्यकर्त्यांचा सूड घेऊन, हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी!

असा सूडाने पेटलेला दुर्दम्य आशावादी हिंदू क्रांतिसिंह २१ जानेवारी १९४५ ह्या दिवशी मायभूमीपासून दूर जपानमध्ये चिरशांती घेण्यासाठी कायमचा झोपी गेला! 'जिवंतपणी स्वतंत्र झालेला हिंदुस्थान मी पाहीन व नंतर मरेन!' हे त्यांचे केवळ एक दिवास्वप्न ठरले. आजच्या दिनी ही त्यांना श्रद्धांजली!

कवी बोरकर म्हणतात :

'परि तयांच्या दहनभूमिवर
नाही चिरा, नाही पणती
तेथे कर माझे जुळती'

□

पुस्तके

# The Old Patagonian Express

By train through the Americas
By : Paul Theroux
(Penguin Books, Pages 430
£ 1·50–about Rs. 29/–)

हे पुस्तक इतक्या तरुण शैलीत लिहिले आहे की, माझ्यासारख्यांना जनरेशन गॅपचीच जाणीव व्हावी !

याच लेखकाच्या 'The Great Railway Bazar' या पुस्तकावर मी 'माणूस' (२३–४–७७) मध्ये लिहिले आहे. मी त्या वेळेला या लेखकावर थोडीशी टीकाच केल्याचे मला आठवते.

परंतु हे पुस्तक वाचून आता मला माझे मत बदलावे लागत आहे. श्री. थेरोंना प्रवासाबरोबर लिखाणाचाही सराव झाला आहे असे वाटते. सी. पी. स्नो ह्या प्रख्यात लेखकानेही हे पुस्तक प्रशंसिले होते. 'एक अत्यंत वाचनीय प्रवासवर्णन' असे या पुस्तकाबद्दल ते म्हणाले होते.

आपण अमेरिका–अमेरिका म्हणतो तेव्हा आपल्याला यू. एस्. ए. च अभिप्रेत असतो; पण शेजारच्या प्रचंड अमेरिकेची आपल्याला फारशी माहिती नसते. अर्थात आपण अर्जेंटिना, चिली, मेक्सिको व भूगोलात पनामा कॅनल अशी नावे मुखोद्गत केली होती. पनामा कॅनल ५० मैल लांब आहे व तो अटलांटिक व पॅसिफिक महासागरांना जोडणारा आहे असे ५ वेळा घोकण्याचे मास्तरांनी सांगितलेले आता आठवते; पण पॅटॅगोनिया हे नाव शाळेच्या भूगोलात आलेलं मला तरी आठवत नाही. हा पॅटॅगोनियाचा भाग दक्षिण अमेरिकेच्या खालच्या भागात अर्जेंटिना व चिली या दोहोंच्यामध्ये सँडविच झाला आहे. हा भाग अँडीज पर्वताच्या पूर्वेस आहे. अँडीज पर्वतावरच काही वर्षांपूर्वी एक विमान कोसळले होते व वाचलेल्या प्रवाशांना मेलेले प्रवासी खावे लागले होते ! (या विषयावरच 'अलाइव्ह्' नावाचे पुस्तक पिअर्स पॉल रीडने लिहिले आहे ज्याचे भाषांतर श्री. रवींद्र गुर्जर यांनी 'सत्तर दिवस' नाव देऊन केले आहे.)

पॅटॅगोनियाचा बहुतेक भाग एखाद्या मोठ्या वाळवंटासारखा आहे. मी 'वाळवंटासारखा' असे म्हटले कारण तो भाग semi-arid आहे. हे अमेरिकेतील सर्वांत मोठे वाळवंट आहे. त्याचे क्षेत्रफळ सुमारे २,६०,००० चौ. मैल आहे. वकिलाच्या भाषेत सांगायचे तर त्याच्या उत्तरेकडे रायो कॉलॅरॅडो, पूर्वेस अॅटलांटिक महासागर, दक्षिणेस रायो कॉइग (कॉइल) आणि पश्चिमेस अॅन्डीज अशा चतुःसीमांनी तो बांधलेला आहे. (१८ व्या शतकातले लंडनचे पॅपेट थिएटर हे सुद्धा पॅटॅगॉनियन थिएटर म्हणून ओळखले जात असे.) काही भागात गवत चिकार असल्याने शेळ्या–मेंढ्या पाळणे हा एक तिकडे मोठाच उद्योग आहे. इथे काही प्रमाणात तेलसुद्धा होते. दक्षिण अमेरिकेच्या निम्म्या भागाच्या खाली थोडासा हत्तीच्या सोंडेसारखा जो प्रदेश आहे त्यालाही ढोबळपणे पॅटॅगोनिया म्हणता येईल.

व्हेसपुसी याने या प्रदेशात इ. स. १५०१ मध्ये पहिला पाय ठेवला होता !

पॅटॅगोनियन्स लोकांची अस्मिता ही नेहमी ज्वालामुखीमुळे जागृत राहिलेली दिसते ! (खरंच, माझ्यावर विश्वास ठेवा, हे असे आहे !) तिथल्या पुष्कळशा चलनी नोटांवर ज्वालामुखीचे फोटो असतात. शिवाय अनेक राष्ट्रीय चिन्हांवरही हे ज्वालामुखी कोरलेले किंवा छापलेले आढळतात.

'त्या' अमेरिकेत जितकी बरकत आहे तितकीच या अमेरिकेत परवड आहे ! इथे गरिबी नेहमी मी म्हणत असते. या लॅटिन अमेरिकेच्या दारिद्र्याच्या पार्श्वभूमीवर श्री. ऑस्कर लुई यांनी 'Children of Sanchez. Autobiography of a Mexican Family' या नावाचे एक क्लासिक पुस्तक लिहिले आहे. दारिद्र्याचा केलेला इतका खोल अभ्यास मी तरी आत्तापर्यंत वाचलेला नाही ! अमेरिकेतसुद्धा थर्ड आणि फोर्थ वर्ल्ड देश आहेत हे वाचून एक प्रकारचं समाधान मिळतं. अर्थात त्या अमेरिकेच्या आधी साउथ लावलं तर तेवढं समाधान मिळत नाही. नाही तरी काय पनामाच्यावरील व खालील प्रदेशास 'द अमेरिकाज' म्हणून संबोधले जातेच की !

या पॅटॅगोनियामध्ये संधिप्रकाशाचा प्रकार फारसा नाहीच. एकदा श्री. जी. ए. कुलकर्णींच्या का कुणाच्या तरी कथेत एक विचित्र कल्पना वाचली होती. एकटा प्रवासी रानातून वाट काढीत होता. (एकटा वगैरे आला मग हे जी. ए. च असतील ! काय बुवा सांगता येत नाही, जे. एन्. सुद्धा असू शकतील !) आधी अंधःकार झाडावर जाऊन बसला, म्हणजे आधी झाडाच्या भोवती घुटमळला. त्यानंतर अगदी अल्पकाळातच अंधःकाराने जमिनीवर उडी घेतली व बघता बघताच दाट काळोख पसरला ! सध्याकाळच्या वेळेला जे निर्जन जागी फिरायला गेले आहेत त्यांना हा अनुभव आला असेलच. श्री. पॉल थेरोंनी या पॅटॅगोनियातील रात्री अशाच पाहिल्या !

पॅटॅगोनियातील या निमवाळवंटात कशासाठी, पोटासाठी करीत ते मनसोक्त हिंडले. मेक्सिकोमधील नुव्हों लॉरॅडो शहरात श्रीमंत टॅक्सन्स पुष्कळ येत असतात. 'Texang are attracted to its anarchy of sex and hunger.' असे थेरोंनी लिहिले आहे. ग्वाटेमालातील शेतकरी हा भारतीय शेतकऱ्यासारखाच गरीब व कष्टाळू आहे असे त्यांना आढळून आले. मध्य अमेरिकेच्या या प्रदेशात भुकेली व उघडी-नागडी मुलेही त्यांना भरपूर दिसली.

रात्री अंधारात प्रवास करताना ते जे वर्णन करतात ते वाचनीय आहे. अनेक स्टेशनांवर जेव्हा गाडी थांबते तेव्हा ते कोणते स्टेशन आहे ते वाचण्यापुरता प्रकाशही नसतो. दाट दाट काळोखात आगगाडी पुढे जात असते व थेरोना कधी डुलक्या तर कधी गाढ झोप लागलेली असते आणि आपण जेव्हा पुष्कळ दिवस एके ठिकाणी राहिल्यानंतर काही दिवस जागा बदलतो तेव्हा नवीन जागेत झोपेत आपल्याला कधीकधी असा भास होतो की, आपण जुन्या जागेतच आहोत ! काही क्षणानी सररिअॅलिटीला रिअॅलिटी जॉल्ट देते व आपल्याला नवीन जागेची मांडणी मनात दिसू लागते. इथे दार, इथे खिडकी, इथे पलंग. लयबद्ध रोल होत रहाणाऱ्या चाकाच्या ललबाईने व कधीकधी दिलेल्या जॉल्टने थेरो यांचेसुद्धा झोपेत

त्यांच्या घरापर्यंत उड्डाण व्हायचे !

ग्वाटेमालाला ते अस्थिर आणि भांडखोर राज्य म्हणतात. इथे अनेक वेळा बंड झाल्यानंतर नाखूष कॉन्स्टिटयूशनल राजवट अस्तित्वात आली. थेरो त्याला 'futile independence' असे म्हणतात. त्याशिवाय मेक्सिकोचा वाघ ग्वाटेमालाच्या मागे लागलेला असतोच ! या वाघाला कंटाळून, घाबरून एक वेळ अशी आली की, ग्वाटेमाला त्याच्यासमोर सारखी ऑलिव्ह ब्रान्च हलवू लागला ! सारखा मेक्सिकोकडून अपमान होऊ लागल्याने मेक्सिकोच्या बाहुपाशातच शिरून, विलीन होऊन जावे असे त्याला वाटायला लागले; पण हा बाहुपाशवाला नवरा (मेक्सिको) सुद्धा अस्थिर ! विलीन झाल्यानंतर मोठा बिग बँग झाला. मेक्सिको खंडप्राय झाला व त्यातून स्वतःचा एक (ग्वाटेमाला), कॉस्टारिका, हाँडूरास निकारगुआ आणि एल्. साल्वाडोर असे तुकडे पडले. नंतर तब्बल १५ वर्षे या पाचही देशांत अराजकतेची आतषबाजी उडाली ! (हे बहुतेक १९२२ नंतर घडले.)

थेरो काय पण या पाच देशाच्या आकारांचे वर्णन करतात ! ग्वाटेमाला मेक्सिकोच्या शेजारी ऐरणीसारखा, एल साल्वाडोर अगदी छोटं, शेजारच्या मोठ्या गोळ्यासारख्या हाँडुरासने दबलेले, निकारागुआ हे पाचरीसारखे आहे आणि कॉस्टारिका हे पनामाच्या बाहीवरचे छोटेसे कफ-लिंक.

भौगोलिकदृष्ट्या हे सर्व देश भूकंपाच्या पट्ट्यात आहेत. त्याच्या चलनी नोटांवर व राष्ट्रीय चिन्हांवर जे ज्वालामुखी आहेत त्यांना या इन्फाइटस् बघून वीट आल्यासारखे झाले आहे. त्यांच्या पोटातील धडधड व गडगडण्याचे रूपांतर भूकंपात झाल्यानंतर भांडणासकट या देशाना कधी खाऊ व कधी गिळू असं ह्या ज्वालामुखीना झालं आहे. ज्वालामुखीच्या या दुर्वासीय रागाला शमवण्यासाठी त्याचीच चित्रे हे लोक फडफडवीत असतात असे वाटते !

—जे. एन्. पोंडा

रंगभूमी

# झुंज

## तोरडमली नाटक की परीकथा ?

'चंद्रलेखा' प्रकाशित आणि प्रा. मधुकर तोरडमललिखित-दिग्दर्शित 'झुंज' हे नाटक रंगभूमीवर आले. 'झुंज' असे नाव म्हटल्याबरोबर झटकन् माझ्या नजरेसमोर 'बेइमान' नाटकाच्या जाहिरातीतील दोन मस्त बैलांची टक्कर, त्यापाठोपाठ बेइमान-बेकेट-नमकहरामचे कथासूत्र तरळून गेले. 'झुज' पाहताना काही वेळा त्याच कथासूत्राचा व्यत्यास मी पाहतो आहे की काय, असा संभ्रम मला पडला होता. 'बेइमान'चे कथासूत्र आठवणीसाठी थोडक्यात मांडायचे, तर आपल्या कामगारांना फोडण्यासाठी म्हणा, फसवण्यासाठी म्हणा अथवा त्यांच्या अधिक शोषणासाठी म्हणा, एका उद्योगपतीने आपल्या जिवलग मित्राला कामगारांमध्ये जाऊन काम करण्याचे नाटक करायला सांगितले. प्रत्यक्षात मात्र कामगारांमध्ये गेल्यानंतर हा मित्र त्यांच्या परिस्थितीच्या दर्शनाने खरोखरच त्यांच्या बाजूने उभा राहिला. त्यातूनच एका अन्यायी, शोषक व्यवस्थेचा प्रतिनिधी म्हणून तो उद्योगपती आणि या शोषणाचा विरोधक म्हणून शोषितांच्या बाजूने दंड थोपटून उभा असलेला त्याचा भूतपूर्व मित्र या दोघांमधील टक्कर जुंपली! याच पार्श्वभूमीवर विचार करताना 'झुज'चे कथासूत्र असे—

गावचे एक कॉलेज, आमदार दादासाहेब देशमुख (जगन्नाथ कांदळगावकर) त्या कॉलेजच्या कार्यकारी नियामक मंडळाचे अध्यक्ष. त्या कॉलेजातील एक दलित प्राध्यापक प्रा. कांबळे (सिताराम खैरे) यांनी त्या कॉलेजचे प्राचार्य-प्राचार्य अभ्यंकर यांच्या निषेधार्थ उपोषण सुरू केले. अभ्यंकरांनी जातीयतेच्या द्वेषाने आपल्यावर अन्याय केला, असे प्रा. कांबळ्याचे म्हणणे. या उपोषणाच्या वेळी प्राचार्य अभ्यंकर बाहेरगावी गेले होते.

कॉलेजातील अन्य प्राध्यापक प्रा. ऋषी (मोहन मुंगी), प्रा. गुप्ते (उपेंद्र दाते) आणि प्रा. चव्हाण (अनंत जोग) यांनी कॉलेजातील दुसरे दलित प्राध्यापक प्रा. गायकवाड (मधुकर तोरडमल) यांना कांबळ्यांवर सोडायचे ठरवले. त्यांनी काबळ्याना उपोषण सोडण्यास-निदान अभ्यंकर येईपर्यंत ते पुढे ढकलण्यास-सांगावे, असे या प्राध्यापकांचे गायकवाडांना सागणे; पण प्रा. गायकवाड या सगळ्याच प्रकरणात तटस्थ राहिले. 'प्राध्यापकाने आपला अध्यापनाचा उद्योग खणखणीत करावा, उगाच राजकारणात पडू नये. शिवाय कांबळे अथवा त्यांच्या संदर्भात निर्णय घेणारे अधिकारी यांना आपापले निर्णय घेण्याची, त्यासंबंधी विचार करण्याची कुवत असताना मी त्याबाबत दोघांना काही का सुचवावे ?' अशी गायकवाडाची भूमिका. या अशा आणीबाणीच्या वेळीच प्राचार्य अभ्यंकरांचे अपघातात निधन झाले आणि त्या रिकाम्या प्राचार्यपदावर दादा साहेब देशमुखांनी अन्य प्राध्यापकांना डावलून प्राध्यापक गायकवाडांची नियुक्ती केली.

दलिताचे प्रश्न आणि त्यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध चाललेला संघर्ष यांचा 'बेइमान'च्या कथासूत्राला समांतर विचार करताना गायकवाडांना प्राचार्य बनवून प्रा. कांबळ्यांच्या विरुद्ध उभ्या असलेल्या व्यवस्थेचा भाग बनविणे या दृष्टीने 'झुज' हा 'बेइमान'चा व्यत्यास असावा, असा माझा समज झाला. (हा समज गैर ठरला नसता तर ? तर कदाचित एक खरोखरीची अन् किती तरी गुंतागुंतीची झुंज पाहायला मिळाली असती! 'गुड बाय डॉक्टर' या नाटकात प्रा. तोरडमलांच्याच लेखणीतून उतरलेली हॅम्लेट आणि ऑथेल्लोची रस्सीखेच विस्मृतीत गडप होऊ शकेल का ? )पण दुर्दैवाने नाटकाच्या पुढील दोन्ही अंकांमध्ये तोरडमलांनी या झुजीची एक गोड परीकथा बनवून टाकली आणि सगळ्याच गोष्टी सोप्या-सरळ करून टाकल्या !

प्राचार्य झाल्यानंतर गायकवाडांनी काबळ्यांची निःपक्षपाती चौकशी करण्याचे ठरवले. हे ऐकल्याबरोबर कांबळे आणि गायकवाडाचा मुलगा राम (प्रमोद पवार) गायकवाडांवर खवळले. त्यांची अपेक्षा-गायकवाडांनी ताबडतोब अभ्यकरांचे निर्णय फिर-

सूनू कांबळयांवरील अन्याय दूर करावा. गायकवाडांनी हे नाकारताच राम घराबाहेर पडला. (गायकवाडाची प्रथम पत्नी अकाली मेल्यामुळे रखमा (वंदना गुप्ते) नावाची स्त्री विवाह न करताच त्यांच्याकडे राहात होती. या गोष्टीचाही त्याच्याविरुद्ध लोक उपयोग करतील, अशी जाणीव रामने घराबाहेर पडताना त्यांना दिली.) नंतर गायकवाडांनी कांबळयांची फाइल तपासून अभ्यंकरांचे निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा दिला आणि ते मानण्यास कांबळयांना भाग पाडले. आपल्याला मागे सारून पुढे गेलेला हा दलित प्राचार्य अन्य सवर्ण प्राध्यापकांना खुपत होताच. त्यासाठी गायकवाडाच्या पूर्वायुष्यातील अनेक मढी उकरून या प्राध्यापकांनी त्यांच्यावर अनेक आरोप ठेवले; पण श्रीमती अभ्यंकर (उषा लिमये) या प्रेमळ जादूगारिणीने येऊन एक जादूची काडी फिरवताच आपला कथानायक राजपुत्र गायकवाड सर्व संकटांमधून मुक्त झाला आणि आपले प्राचार्यपदाचे राज्य निर्वेधपणे करू लागला.

आपल्या बौद्धिक ताकदीच्या आणि शैक्षणिक पात्रतेच्या जोरावर समाजात मानाचे स्थान मिळविणारा, पण आपल्या काहीशा अलिप्त वृत्तीमुळे दलित समाजापासून दुरावलेला एक दलित प्राध्यापक. दलित समाजातील अज्ञानाशी, पराभूत मनोवृत्तीशी, क्वचित संधिसाधू वृत्तीशी चाललेली त्याची झुंज आणि त्याच वेळी तथाकथित उच्च प्रस्थापित समाजव्यवस्थेशीही दलित म्हणून चाललेला संघर्ष, अशी दुहेरी पातळयावरील झुंज प्रा. तोरडमलांना अपेक्षित होती का ? गेल्या पिढीतील उच्चशिक्षित दलितांचे मवाळ समजुतीचे धोरण, त्यामुळे आजच्या दलित पिढीच्या जहाल संघर्षप्रधान मनोवृत्तीशी निर्माण झालेले मतभेद, ही झुज तोरडमलांच्या मनात होती का ? शिक्षणातून झालेल्या संस्कारांमधून *'प्रथम लायकी सिद्ध करा. मग न्याय्य मागण्यांसाठी झगडा !'* असे विचार मांडणाऱ्या प्राध्यापकाचा, स्वतःशी चाललेला मानसिक संघर्ष त्यांना या नाटकातून दाखवायचा होता का ? *या आणि अशा* साऱ्याच गोष्टी तोरडमलांच्या डोक्यात असाव्यात, असे नाटक पाहताना जाणवते ; पण प्रत्यक्षात नाटकात दिसतात—देवपार्टी विरुद्ध राक्षसपार्टीचा लढा, राक्षसपार्टीने रचलेली अत्यंत फुटकळ कारस्थाने (गायकवाडांच्या मुद्दाम नेमलेल्या मोलकरणीमार्फत त्यांच्यावर बलात्काराचा आरोप करणे) आणि काही अतर्क्य योगायोगांनी वा युक्तिवादांनी देवपार्टीने केलेल्या त्या कारस्थानांचा भेद,काही टाळीची वाक्ये आणि काही हुमखास आसवे खेचणारे प्रसंग ! संपूर्ण झुजीचे वा संघर्षाचे असे अचानक परीकथेत रूपांतर होण्याची दोन प्रमुख कारणे आहेत :

१) दलितांवर अन्याय होणे चूक आहेच; पण त्याचबरोबर सरसकट सर्व सवर्ण अन्याय करण्यासाठीच टपलेले असतात, असे मानणेही तितकेच चूक आहे, अशी समन्वयवादी भूमिका प्रा. तोरडमलानी घेतली आहे. नाटकातून घडणाऱ्या घटनांमधून ही भूमिका मांडली गेलीच पाहिजे, अशा दृष्टीने नाटकातील घटना घडवल्या गेल्या आहेत. साहजिकच एखाद्या हिंदी चित्रपटाला शोभेलशा रीतीने ठरलेल्या गोड शेवटाकडे त्या घटनांची घोडदौड चालू राहाते.

२) संपूर्ण नाटकातून जाणवणारी गोष्ट म्हणजे, प्रा. तोरडमलांजवळ असणारा दलित आयुष्याच्या, त्यांच्या समस्यांच्या प्रत्यक्ष अनुभूतीचा अभाव. हा माझा अंदाज किती खरा आहे, हे मला माहीत नाही; पण दलित आयुष्याची पाहणी आणि त्या आयुष्याच्या तप्ततेची लागलेली आच हा फरक नाटकभर जाणवत राहतो. त्यामुळे नाटकात उभ्या राहणाऱ्या व्यक्ती अशुद्ध बोलणाऱ्या, रंगभूषा वा केशभूषेच्या बाबतीत दलितासारख्या दिसणाऱ्या असल्या तरी त्या 'दलित' वाटत नाहीत. त्यांच्या डोक्यातून प्रा. तोरडमलांचे विचार आणि मनातून तोरडमलांच्याच भावना बाहेर पडतात. (या संदर्भात तोरडमलांच्याच 'तरुण तुर्क म्हातारे अर्क'ची आठवण करून द्यावीशी वाटते. अहमदनगर कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम करताना तोरडमल जे आणि ज्यांच्यासमवेत कॉलेज-जीवन स्वतः जगले, ते कॉलेज—जीवन त्या व्यक्तीसकट 'तरुण तुर्क'मध्येही जिवंत झाले आहे. *प्रत्यक्ष अनुभूतीनंतर मग तोरडमलाचा* बंडा, तोरडमल म्हणून बोलत नाही तर एक अट्टल कॉलेज—युवक म्हणूनच बोलतो, वागतो. नेमकी हीच गोष्ट 'झुज' मध्ये नाही.)

'वा, लेकरा, वा. चांगले पांग फेडलेस. मातीतनं माणसं घडवायला मी झटत होतो; पण आज तू दाखवून दिलंस, मातीतनं माणसं कधीच घडत नाहीत. माणसाची माती व्हायलाही काही वेळ *लागत नाही.'* (चुक् चुक् चुक् चुक् आणि टाळया.) अशी अनेक टाळीदार वाक्ये तोरडमल सराईतपणे लिहून जातात ! शोषक म्हणजे मदमस्त पांढरे हत्ती, त्यांच्या पायाखाली तुडवल्या जाणाऱ्या मातीतून उगवणारी क्रुद्ध वाघाची रोपटी, हत्तीचा मद उतरवल्यावर शांत झालेले वाघ आणि मग समानतेच्या नात्याने उभी राहाणारी एकच मानवजात, अशी काव्यमय रूपकेही त्यांच्या लेखणीतून उतरतात; पण या अलंकारिक साजाचा मूळ देहाचे पोषण होण्यासाठी वा सौंदर्य वाढविण्यासाठी उपयोग होत नाही. शिवाय, नाटकाला आलेला आणि वर उल्लेखलेल्या वाक्यांना प्रतिसाद देणारा प्रेक्षकवर्ग बदलल्यास प्रतिसादातही संपूर्णतः बदल घडेल, हे वेगळे सांगायला नकोच.

नाटकाचे दिग्दर्शक स्वतः प्रा. मधुकर तोरडमलच आहेत. ताण हलका करण्याच्या प्रयत्नासाठी योजलेले काही किरकोळ विनोद वगळता त्यानी प्रयोग पार बसवून टाकला आहे. त्यांनी सादर केलेला प्राचार्य गायकवाड मात्र फारच पटला. स्वतःच्या रंगभूषेपासून, वेशभूषेपासून आपल्या व्यक्तिरेखेबाबत अतिशय काळजी घेण्याबाबत तोरडमलाचा लौकिक आहेच. या गोष्टीबरोबरच बारीकसारीक तपशिलांसह आपल्या वाचिक, कायिक अभिनयाने आणि मुख्यतः मुद्राभिनयाने ही प्रमुख भूमिका तोरडमलांनी संयमितपणे उभी केली. आपल्या भडकपणामुळे नाटकात भाव खाऊन *जाणाऱ्या रखमा व प्रा. ऋषी या* दोन्ही व्यक्तिरेखा अनुक्रमे वंदना गुप्ते आणि मोहन मुगी यांनी छान उभ्या केल्या. वंदना गुप्त्यांचे अतिनाटय आणि अवाजवी सहजता *याना थोडासा आवर बसल्यास त्यांचे काम* जास्त सुसह्य होईल. बाकी खुपशी पात्रे प्रेक्षकांकडे संपूर्ण तोंड करून रंगमंचाला समांतर उभी करण्यासारखा मोठा दोष नाटकात कायम ठेवणे हा तोरडमलांचा निष्काळजीपणा म्हणावा, की नवीन प्रयोग म्हणावा ?

नाटकाचे नेपथ्य व प्रकाशयोजना मोहन वाघ याची होती. प्राचार्यांच्या *ऑफिसपासून* कॉलेजातील रस्त्यापर्यंतच्या अनेक गोष्टी प्रत्यक्ष उभ्या करण्याच्या प्रयत्नात सरकता रंगमंच, निरनिराळे पडदे, वेगवेगळया प्रकाशयोजना याची नाटकभर एकच खंदळाखंदळी चालते. या सगळयात बराच वेळ रंगमंचावर अंधार आणि त्यात मधूनच चमकणाऱ्या विजेच्या असा प्रकार तर चालतोच, शिवाय ऐनवेळी पडदा अडकून राहणे वा नीट न पडणे, तो जास्त खाली आल्याने प्रकाशातच ओढून घेणे असेही प्रकार चालतात. ही सगळी भाऊगर्दी अधिक सफाईने उरकता आली, तर जास्त बरे.

नाटकाचे संगीत चंद्रलेखा कलाविभागाने बेतले आहे. 'झुज' शब्द आला की मागे तालवाद्यांचा कडकडाट, करुणरस रंगमंचावर वाहू लागला की, व्हायोलीन किंवा सतारीचे आवाज असे अपेक्षित संगीतच नेहमी ऐकू येत असल्याने ते फारसे जाणवत नाहीच.

गोड शेवटाची ही 'झुज' परीकथा म्हणून ठीक वाटली; तरी प्रा. मधुकर तोरडमलाचे नाटक म्हणून मात्र ते निराशा करते !

—सदानंद बोरसे

चित्रपट

# 'अनुभव' ते 'गृहप्रवेश'

## बाशुदांच्या अल्बमची तीन पाने !

कलंदर-विलंदर

ते दोघे एकमेकाला बिलगले आहेत. परस्परांना निरखून पाहात, हळुवार स्पर्श करत, विशुद्ध शारीरिक प्रेमाचा वर्षाव चालू आहे. पार्श्वभूमीवर एक प्रेमगीत आहे. कॉफी पिण्याच्या इच्छेनं त्या दोघांना शब्द फुटतात. ते दोघे कोण ? तसे कोणीही; पण इथे मात्र अमर व मानसी हे एक नवदांपत्य. मुंबईतील एका छोटेखानी पण गैरसोय होत असलेल्या घरात त्यांनी नुकतीच आपल्या वैवाहिक जीवनाला सुरुवात केली आहे.

कॉफीच्या निमित्तानं बोलल्या गेलेल्या प्रत्येक शब्दाला पंख फुटतात आणि मग नव्या घराचं स्वप्न भराऱ्या घेऊ लागतं. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी बोलता बोलता ते 'हनीमून'चा निर्णय रद्द करतात. पुढील आयुष्यात ज्या वेळी नीरसपणा येईल त्याच वेळी हनीमूनला जायचं, असंही ठरतं.

बघता बघता दहा वर्षांचा काळ सरतो. आता 'घरकुला'चा परीघ पूर्ण करण्यासाठी तिथे आठ वर्षांचा एक चंट मुलगा असतो, तरीही स्वप्न अपुरंच असतं. तेच गैरसोयीचं घर, पोपडे उडलेल्या भिंती, अमर-मानसीची 'दैनंदिनी' आणि 'रोजनिशी' आहे तशीच चालू असते. एका नित्यनैमित्तिक चाकोरीत त्यांच्या आयुष्यातले दिवस-रात्र सरत असतात.

परंतु मानसी मात्र नव्या घराचं स्वप्न उराशी बाळगून काटकसर, बचत करत असते. अमर कामावरून परतल्यानंतर या काटकसरीचे नवे मनसुबे व जमा केलेल्या बचतीचे हिशेब, हाच त्याचा नित्यक्रम बनतो. कधी तरी मुलाच्या शालेय जीवनातील धिटाईचं कोडकौतुक किंवा त्याच्या भवितव्याविषयी बोललं जातं. या पलीकडं त्या घरात वेगळं असं काहीच घडत नाही. अगदी केव्हा तरी नेसकॅफे संपते किंवा अमर भाजी आणायला विसरतो. एक सवयीचा, रोजचा दिनक्रम अगदी सहजपणे पचवत हे जोडपं जगत असतं.

पण...! पण काय ? काही नाही ! अमरच्या कार्यालयात आगळीक घडते. एका 'मॉड' आणि तरतरीत टंकलेखिकेच्या रूपात एक नवीच अडचण निर्माण होते. या टंच, कमनीय टंकलेखिकेच्या अस्तित्वामुळं कार्यालयातील लंपट कारकुनाचं कामावरील लक्ष उडतं. एकंदर कामकाजावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे अकौटंट म्हणून स्वतंत्र खोली असलेल्या अमरच्या केबिनमध्ये तिची बसण्याची व्यवस्था केली जाते.

सुरवातीला दुर्लक्षित झालेली 'सपना' आपल्या वैशिष्टयपूर्ण हालचालींनी अमरला विचलित करते. तिच्या अवखळपणाची त्याला भुरळ पडते आणि अमरचं आदबशीर 'प्रौढत्व' सपनाला आकर्षित करतं. काही दिवसांतच या परस्परविरोधी आकर्षणाचं प्रेमात रूपांतर होतं. चहाबाज सपना 'कॉफी पिअक्कड' अमरला चहाची सवय लावते !

नव्या घराच्या स्वप्नात रममाण झालेल्या मानसीला या 'ऑफिस-अफेअर'ची चाहूलसुद्धा लागत नाही. तिला अमरच्या वागणुकीत थोडा-फार बदल जाणवतो एवढंच. 'त्या' घरातील नित्यनैमित्तिक लडिवाळपणा आणि लोभस बोलणी केव्हाच थांबलेली असतात. एके दिवशी (खरं तर रात्री) बऱ्याच प्रयत्नानंतर अमर मानसीला आपल्या नव्या प्रेमाची हकीकत सांगतो. मानसी त्याला मूक प्रतिसाद देते. मात्र त्याच्या पुढील आयुष्यात 'वारस' ठरणाऱ्या त्या स्त्रीला घरी आणण्याची इच्छा ती अमरजवळ व्यक्त करते. त्याच्या या अनपेक्षित प्रेम-प्रकरणावर ती कसलेल्या गृहिणीप्रमाणे डाव टाकते. अमर काहीसा टरकतो आणि सपनाला घेऊन येण्यासाठी जातो.

त्या वेळेतच मानसी त्या छोटेखानी घराचं 'घरकुल' बनवते. भिंतींना रंग लागतात, वस्तूंना आकार प्राप्त होतात. संसारावर वर्षानुवर्षे बसलेली धूळ क्षणार्धात झटकली जाते. मानसीही नववधूसारखी नटते. त्या नीरस, निर्जीव सांसारिक जीवनाला सजीवता प्राप्त होते.

अमर सपनासह घरी येतो आणि त्याच्या आठ वर्षाच्या मुलाप्रमाणेच हा अचानक झालेला बदल पाहून तो बावरतो. सपनालाही अप्रत्यक्षपणे सूचना मिळते की, इथंही एक 'घरकुल' आहे, प्रेमाच्या आणा-भाका घेऊन बांधलेलं. परस्परांच्या आशा-आकांक्षा, अपेक्षा-जबाबदाऱ्यांनी सजलेलं. वैवाहिक जीवनातला हा अविभाज्य भाग, अमरनं दुसरं लग्न केलं तरी टाळता येणार नाही, हे सपनाला उमजतं !

दडपून ठेवलेलं सारं असं अचानकपणाने एकदम उफाळतं, हरवलेलं गवसतं. अमर-मानसीचा मेळ जमून ते त्याच घरात प्रवेश करतात आणि सपना एक 'ग्रेस फूल एक्झिट' घेते. इथेच बाशू भट्टाचार्य यांचा 'गृहप्रवेश' संपतो.

### एका दांपत्याचं पोर्ट्रेट

पांढरपेशांचा वैवाहिक जीवनाविषयीचा आलेख चितारणाऱ्या बाशुदांच्या या चित्रपटात घटना अशा विशेष नाहीत. ज्या आहेत त्या चाकोरीबद्ध जीवन जगणाऱ्यांच्या आयुष्यात नित्यनेमाने घडू शकणाऱ्या. लग्न, पहिली रात्र, घराचं स्वप्न, मुलाचं भवितव्य, नित्यनैमित्तिक लडिवाळपणा आणि लोभस बोलणी, घरकामाचे तपशील, त्यांचा कधी न संपणारा रगाडा—या सर्वांच्या चाकोरीत कळत-नकळत जगणाऱ्यांना एकमेकांचा 'उबग' येतो; पण हे त्यांना उमगतं 'सपना'-च्या निमित्तानं आणि पुन्हा एकदा गंज लागलेल्या भाड्यांना कल्हई लावली जाते ! हाच या चित्रपटाचा खरा जीव !

कदाचित न पटणारा, काहीसा आदर्शवादी, तरी पण एका दांपत्याचं 'पोर्ट्रेट' चितारणाऱ्या बाशुदांनी, 'गृहप्रवेश'पूर्वी 'अनुभव' आणि 'आविष्कार' हे दोन विवाहोत्तर जीवनाचे 'अल्बम' सादर केले होते.

व्यवसाय आणि कला याच्यात दुवा साधून 'मध्यम मार्ग' चोखाळणारा एक दिग्दर्शक म्हणून बाशुदांचा नावलौकिक आहे. व्यवसाय आणि कला यांचं बेमालूम मिश्रण करणाऱ्या आणि भारतीय सिनेमाला व्यामिश्र चित्रपदीय संकल्पना बहाल करणाऱ्या बिमल रॉयकडे बाशुदांनी चित्रपटनिर्मितीचे पहिले धडे घेतले आणि १९६६ साली शैलेंद्रच्या 'तीसरी कसम' या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पहिलं स्वतंत्र पाऊल टाकलं !

गेल्या पंधरा वर्षांत बाशुदानी ११ चित्रपट निर्माण केले. त्यापैकी काही अपूर्ण आहेत, काही अजूनही डब्यात आहेत, तर काहीना वितरक मिळालेले नाहीत. तरीही बाशुदा सातत्याने चित्रनिर्मिती करीतच आहेत. आपल्याला हवे तसे, मनासारखे चित्रपट काढतच आहेत !

चित्रपट-व्यवसायाचे नियम स्वीकारूनही कलात्मकता जोपासणाऱ्या या दिग्दर्शकाने, हिंदी चित्रपटाच्या जुगारी आणि बाजारू दुनियेत हे धाडस केलं आहे. परिणामी त्याच्या चित्रपटात राजेश खन्ना, शर्मिला टागोर, संजीवकुमार, सारिका अशांसारख्या वलयांकित चंदेरी ताऱ्यानाही स्थान मिळालं आहे. त्याच्या चित्र-कारकीर्दीतील सहजसुंदर अभिनयाचं दर्शन बाशुदांच्याच चित्रपटांमध्ये घडलं आहे आणि बाशुदांनी सक्षम जाण दाखवून त्यांच्यातील सुप्त अभिनयाला वाव दिला आहे.

चंदेरी ताऱ्याचा वावर, उत्कृष्ट तांत्रिक कलाकुसर आणि आटोपशीर निर्मिती-खर्च असूनही बाशुदांच्या चित्रपटांना रुपेरी पडद्यावर झळकण्याचं भाग्य लाभत नाही. याबाबत बाशुदाच म्हणतात, 'माझे चित्रपट मी निर्मितीपूर्वी वितरकांना विकत नाही. कारण ते विकले तर चित्रपटाच्या कलात्मक रचनेत ढवळाढवळ करण्यास त्याना संधी मिळते आणि त्यांनी हस्तक्षेप केला तर त्या बद्दल फार मोठी 'किंमत' मोजावी लागते !'

### जनजीवनात रमलेला बाशुदा

वितरकाला बळी न पडता चित्रपट काढणारा बाशू हा बंगाली असामी असूनही मुंबईत स्थिरावलेला, मुंबईवर प्रेम करणारा 'बंबैवाला' आहे आणि म्हणूनच त्याच्या चित्रपटात 'न्यूऑन साइन'च्या दिव्यांचा झगमगाट तो चित्रित करतो. त्याच्या चित्रपटीची ध्वनिफिती दूरध्वनीवरील संभाषणाने व्यापलेली असते. बंगालच्या उपसागरातील कोळीगीतं विसरून उंच इमारतींच्या खिडक्यांतून डोकावणारा अरबी समुद्र इथं दिसतो. त्या खिडक्यांच्या तावदानांतूनच सूर्य उगवतो आणि मावळतो आणि याच पार्श्वभूमीवर 'एकटेपणाच्या' भावनेला दाबण्यासाठी, खोल्या-खोल्यांतून उगाचच भटकणाऱ्या खाशी 'बबैय्या' स्त्रियांच्या भावविश्वात तो डोकावतो.

महानगरातील 'ट्रॅफिक'चा गोगाट, त्याचे इतरही आनुषंगिक आवाज आणि गर्दीत हरवलेल्या मुंबईकरांना पहाटेपासून रात्रीपर्यंत साथ-संगत करणाऱ्या व दिलासा देणाऱ्या 'विविध भारती'नंच त्यांच्या चित्रपटांचा साउंडट्रॅक भरलेला असतो. याच गोष्टी त्याच्या चित्रपटातील दांपत्याच्या जीवनातील संवाद व विसंवादाला पार्श्वभूमी देत असतात.

व्यवसाय आणि कला यांची सांगड घालताना बाशू बिमल रॉयचा कित्ता गिरवतो; पण 'बंगाल' मात्र विसरतो ! आपल्या चित्रकारकीर्दीची उभी हयात मुबईत घालवणाऱ्या व एक यशस्वी दिग्दर्शक म्हणून अढळ स्थान मिळवणाऱ्या बिमल रॉयच्या चित्रपटात बंगालची आठवण सातत्याने होते. मग तो 'दो बिघा जमीन' असो किंवा 'काबुलीवाला' असो, 'बंदिनी' असो किंवा 'पारख' असो. त्यातील व्यक्तिरेखा बंगाली असतात, तर कधी 'सुन मेरे बंधू' किंवा 'मोरे साजन है इस पार' असे खास बंगाली सूर बिमल रॉयच्या चित्रपटात कानावर पडतात. बंगालच्या प्रादेशिकतेची झाक असूनही तो चित्रपट मुबईत तयार केला जाऊ शकतो आणि देशभर त्याला प्रतिसाद मिळतो, त्याच कारण त्यातलं निखळ, सर्वव्यापी सगळ्यांना भावेल असं मानवी जीवन !

बिमल रॉयचे पट्टशिष्य हृषिकेश मुखर्जी यांच्या चित्रपटातही ही जाण दिसते. काही वेळा ती शोधावी लागते; पण बाशुदांनी मात्र बंगालच्या मुशीत तयार झालेल्या संवेदनक्षमतेला पूर्णपणे फाटा दिलेला आहे आणि मुबईच्या जनजीवनातच ते रमले आहेत !

बाशूनं जाणीवपूर्वक हे जीवन स्वीकारलं आहे. बिमल रॉयचीच मुलगी रिंकीशी विवाह करून, असाच समुद्रकिनाऱ्यावर संसार थाटणाऱ्या बाशूचं व्यक्तिगत जीवन सुखी-समाधानी आहे. रिंकी-बाशूचा संसार हा कुणीही हेवा करावा असाच आहे !

त्यामुळे व्यक्तिगत जीवनातील सुख-समाधान इतरांना मिळावं या इच्छेनेचे बाशू वैवाहिक जीवनाची सतत उकल करत आहे. सामाजिक संबंधातील एक अतिशय नाजुक आणि महत्वपूर्ण अशा विवाहसंबंधाचं विश्लेषण त्याला सतत करायचं आहे.

### नव्या महानगरीय प्रेमकथा

नव्या चित्रपटकारांनी दुर्लक्षित केलेल्या आणि बाजारू चित्रपटांनी उथळपणे मांडलेल्या या विषयाबद्दल बाशूला आस्था आहे, आत्मीयता आहे आणि म्हणूनच महानगरातील सुस्थिर मध्यम वर्गात तो नकळत डोकावतो. त्यांच्या ताण-तणावामागील कारणांचा शोध घेतोय.

'अनुभव' (१९७२), 'आविष्कार' (१९७४) आणि नुकताच प्रदर्शित झालेला 'गृहप्रवेश' (१९७९) या सलगपणे काढलेल्या तीन चित्रपटांत बाशुदांनी याच प्रश्नाचा मागोवा घेतलाय. बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत अपरिहार्यपणे विवाहबंधनात अडकणाऱ्या स्त्री-पुरुष संबंधाचा आणि त्या संबंधांमुळे निर्माण झालेल्या ताण-तणावांचं जाळं त्यांनी इथं विणलं आहे.

ही 'ट्रायॉलॉजी' म्हणजे आजच्या काळातल्या अस्सल प्रेमकथा आहेत. खरं तर नव्या महानगरीय परिकथाच ! एकच धागा पकडून सलगपणे चित्रपट काढण्याचं धाडस करताना यातील प्रत्येक चित्रपटाच्या निर्मितीबरोबर खोलवर विचार करणारी बाशुदाची समज यातून स्पष्ट होत आहे, त्या मिश्र परिस्थितीचे धागेदोरे न्याहाळून तो त्यातील बारकाव्यांचा शोध घेताना दिसतो. आणि प्रत्येक चित्रपटाबरोबर त्याची ही जाणीव अधिकच प्रगल्भ बनत आहे.

हे सर्व करत असतानाच बाशू समाजात

ह्या आणि ह्याच एकमेव प्रश्न असल्याचा दावाही करत आहे. तो म्हणतो, 'जीवनाविषयी मर्यादित दृष्टिकोन स्वीकारणारेच या प्रश्नाला कमी लेखतात, माझ्या दृष्टीने न सुटलेला असा ह्याच एक प्रश्न आहे, जो अमर्याद आहे ! इतर सर्व समस्या या प्रश्नाचेच विविध कंगोरे किंवा पडसाद आहेत. स्त्री आणि पुरुष हेच समाजाचं अंगभूत मूळ आहे आणि आज-काल या प्रश्नाकडे दुर्लक्षच नव्हे, तर त्याला वेगळं करण्याचा घाट घातला जात आहे.' बाशुदाचे हे उद्गार हीच त्यांच्या या चित्रत्रयीच्या निर्मितीमागची मूळ प्रेरणा आहे. म्हणूनच या तिन्ही चित्रपटांचा स्वतंत्र व एकत्रितही विचार करणं आवश्यक आहे.

### मीता आणि चारुलता

या चित्रत्रयीतलं पहिलं पाऊल म्हणजे 'अनुभव'. अतिशय साधा आणि सुगम अनुभव. मात्र आधुनिकेतच्या संदर्भात नैतिक नियमातील विसंगतीवर इतर चित्रपटाच्या तुलनेत उथळपणे बोट ठेवणारा. त्यातील नायक अमर (संजीवकुमार) एक अभ्यासू पत्रकार. मनमोकळा आणि प्रगतीकडे झेपावणारा. उच्चभ्रू वर्गातील असूनही मध्यम वर्गातल्या मीताशी (तनुजा) लग्न करतो. (कदाचित उच्चभ्रू वर्गात व्हर्जिन मुलगी मिळण्याची शक्यता नसल्यामुळे) पण मीताच्या जीवनात पूर्वीच्या प्रियकराचे पुनरागमन झाल्याची चाहूल लागताच 'आदिम' प्रकृतीचं दर्शन घडवतो.

स्त्री ही एक मालमत्ता. विवाहोत्तर नैतिकतेची जपणूक करण्याची जणू काही तिची एकटीचीच जबाबदारी, असा गैरसमज करून आत्मकेंद्री अमर मीताच्या एकटेपणाची दखलही घेत नाही. मूल नसलेली मीता अमरने लादलेल्या एकांतवासात नकळतपणे जुन्या आठवणीच्या जवळ जाते. व्यावसायिकेत गुतलेला अमर आणि सांसारिक सुखाला आसुसलेली मीता अशा दोन व्यक्तिरेखा उभ्या करून बाशुदा विवाहोत्तर जीवनात समतोलाचं भान राखण्याची आवश्यकता व्यक्त करतात.

बाशुदा आणि सत्यजित रे यांची तुलना करण्यास कोणी धजावणार नसले तरी 'अनुभव' पाहताना 'चारुलता'ची आठवण काढण्याचा मोह टाळणं अशक्य आहे. 'अनुभव'चा त्रिकोण ह्याच 'चारुलता'चा विषय आहे. (अर्थात 'चारुलता' १९६४ चा चित्रपट आहे.) रवींद्रनाथ टागोरांच्या 'नष्टनीडा' या दीर्घकथेवरून 'चारुलता' घेतलेला आहे. चित्रपटाला १९ व्या शतकाची पार्श्वभूमी आहे. भूपती ह्या वर्तमानपत्राचा संपादक. त्याची सुशिक्षित पत्नी चारुलता (माधवी मुखर्जी). स्त्रीने पुरुषाच्या बरोबरीने उतरायचा तो काळ नव्हता. अर्थातच चारू घरी बसते आणि चांगलीच कंटाळते. त्यात तिलाही मूल नाही. या परिस्थितीत भूपतीचा पुतण्या अमल येतो. 'साहित्याची आवड' या कॉमन विषयामुळे चारू-अमल जवळ येतात. न कळत तिचं अमलवर प्रेम जडतं. अमलला याची चाहूल लागताच तो निघून जातो. त्यानंतर एका पत्रावरून भूपतीला चारूचं अमलवरील प्रेम समजतं आणि तो चागलाच हादरतो. चारूच्या मनस्थितीला आपणच कारणीभूत आहोत, हे त्याला उमगत आणि तो तिच्या मिठीत विसावतो.

### 'चारुलता' आणि 'अनुभव'

इतकी साधी सरळ त्रिकोण कथा असूनही १९ व्या शतकाच्या पार्श्वभूमीवर सत्यजित रे ही कथा चितारतात. चारूचा एकटेपणा, तिच्या अंतर्मनातील विसंगती आणि घालमेल अगदी खोलात जाऊन टिपली जाते. चारूची व्यक्तिरेखा रे अशा काही झोकात उभी करतात की, स्थळ-काळाचं भान विसरून ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व लाभलेल्या सुशिक्षित स्त्रीची कैफियत बनते.

रेंच्या चित्रपटात न आढळणारे काही अपवादात्मक दोष वगळता 'चारुलता' बंदिस्त आविष्कार ठरतो. कारण अगदी बारीक-सारीक गोष्टींचं तपशीलवार परिशीलन करणाऱ्या रेंच्या निवेदनात्मक शैलीचे सर्व गुण इथे जातीने हजर असतात. या चित्रपटाच्या तुलनेत (रे शैलीचे भान विसरूनही) बाशुदाचा 'अनुभव' बराचसा उथळ, वरवरचा प्रयत्न वाटतो.

'अनुभव'चा नायक अमर प्रेमी नाही. तशी स्त्रीही त्याच्या मनात नाही. चित्रपट संपतो तेव्हा तो आपल्या पत्नीच्या प्रेमात पडतो आणि इथेच 'आविष्कार'ची सुरुवात आहे. इथे एक परिस्थिती तिच्या विकासक्रमात योग्य निष्कर्षाला पोहचते.

इथे एक तरुण आणि एक तरुणी प्रेमात पडतात आणि त्यांच्या छोटयाशा विश्वात बदल घडतात. परस्परांमधील नवागत कल्पनांचा शोध घेत घेत ते त्यात पूर्णपणे रमतात. बाहेरील जगाला विसरून ते एकमेकांत मिसळून काही काळापुरते एकजीव होतात: स्वप्नात दंग होणे ह्याच जीवनाचा अर्थ ठरतो. या स्वप्नातील अतृप्त क्षणांसाठी ते दोघे कालासमवेत जगू लागतात. मग त्या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी ते तास मोजू लागतात. क्षणांचंही मोजमाप होतं. सहवासाचे ते काही क्षण वगळता सर्व काही हवेत विरून जातं आणि तो तरुण आणि ती तरुणी विवाहबद्ध होतात ! एक पुरुष आणि एक स्त्री श्री अमर ...(राजेशखन्ना) आणि सौ. मानसी (शर्मिला टागोर).

काही क्षणांपुरतं असलेलं जीवन पूर्ण दिवस आणि पूर्ण रात्रीचं बनतं आणि इथंच 'आविष्कार'च हे लोभसवाणं जोडपं रोजच्या अस्तित्वातलं वास्तव समजण्यास अपयशी ठरतं. स्वप्न आणि वास्तव यांच्या सीमारेषा ओळखण्यात कमी पडतं. 'हनीमून'नंतरचा येणारा प्रत्येक दिवस हा नुसता नवा 'अनुभव' नसून मागे जाणाऱ्या दिवसाचंही ते फलित आहे, हे विसरतं.

---

### व्यावसायिकतेचा नवा पैलू

व्यवसाय आणि कलेचा मेळ घालणाऱ्या बाशुदांनी 'गृहप्रवेश'च्या निमित्तानं एक आगळीच व्यावसायिक करामत केली आहे. चहाबाज सपना आणि कॉफी-पिअक्कड अमर-मानसी यांच्यातील 'टसल' स्पष्ट करताना 'नेसकॅफे'ला नाहक प्रसिद्धी मिळाली आहे-शंका घेण्याइतपत-आणि शंका खरी आहे ! नेसकॅफेने या सहजपणे मिळणाऱ्या प्रसिद्धीसाठी बाशूला पैसे मोजले आहेत. याबाबत बाशूदा म्हणतात, 'मला ग्राहक वस्तूवर भर द्यायचा. नेसकॅफे ह्या योगायोग! चित्रपट पूर्ण झाल्यानंतर त्यांनी जाहिरातीची गळ घातली. बस.' याच चित्रपटात 'ग्लुकोज'ची रेडिओवरील जाहिरात चित्रपट पूर्ण झाल्यानंतर मिसळण्यात आली आहे ! बी. आर. चोप्रांनी 'इन्साफका तराजू' मध्ये तर 'विमल'चा फॅशन शो दाखवला. बाशूदाही तेच करतायत-बस एवढंच ! *

---

## पुढचं पाऊल 'गृहप्रवेश'

अमर 'अनुभव'प्रमाणेच पत्नीकडे दुर्लक्ष करणारा एक 'करिअरिस्ट' आहे. त्याची पत्नी मानसी, जी एका मुलाची आई आहे, तशीच लैंगिक भूक शमविणारी स्त्रीही आहे. मात्र ती आता मित्रही नाही की सहचरीही नाही! बाशुदा पुन्हा एकदा या परिस्थितीला कलाटणी देऊन त्रिकोण साधतात. 'अनुभव'-मधील पूर्वीच्या प्रियकराचं रूपांतर जाहिरात जगातील एका मस्त चेहऱ्याच्या पोरीत होतं. लग्नबाह्य प्रेम-प्रकरण थोडेसे सूचित केले जाते. जणु काही त्या 'करिअरिस्ट' माणसात अजूनही ओलावा आहे. सरतेशेवटी वाढदिवसाच्या 'गुच्छा'च्या निमित्ताने गैरसमज दूर होतो आणि ते दोघे जवळ येतात.

पती-पत्नीच्या मनातील संघर्ष, दुरावा, व्याकुळता बाशुदा तपशीलवार प्रसंगांतून उभी करतात. काहीशा आकर्षक स्वरूपात मांडतात. फ्लॅशबॅक तंत्राचा आततायी वापर आणि कलात्मकतेच्या हव्यासापायी 'गिमिक्स'च्या आहारी जाऊन बाशुदा एक 'डेकोरेटिव्ह' अल्बम बनवितात!

एकमेकापासून दुरावलेले पती-पत्नी वाढदिवसाच्या एका घटनेने जवळ येतात. रात्रभर आतल्या आत रडणारी मानसी पहाटे दूध घ्यायला दरवाजा उघडते तेव्हा तिच्यासाठी आणलेला, पण कोमेजलेला पुष्पगुच्छ दिसतो आणि तिचे गैरसमज दूर होतात. आत येऊन ती अमरला बिलगते! इथेच 'गृहप्रवेश'ची सुरुवात होते!

संसारातील काव्याबरोबर दूधवाला भय्याही आवश्यक असतो, हे जाता जाता 'आविष्कार'मध्ये सांगणारे बाशुदा 'गृहप्रवेश'मध्ये मात्र जीवनातील आर्थिक बंधनांचा समकालीनतेच्या संदर्भात शोध घेतात. त्यामुळेच आधीच्या दोन चित्रपटांपेक्षा 'गृहप्रवेश' एक पाऊल पुढे ठरतो. आधीच्या चित्रपटात भविष्याला अस्तित्वहीन आकार असतो, तर इथे भविष्याची गडद छाया वर्तमानावर पडलेली असते.त्यामुळे वर्तमान जरासा पुसट बनतो.

त्यामुळेच या चित्रपटातील जोडप्याचं, एका 'घरकुला'चं हे स्वप्न कोणाही मध्यम वर्गीय जोडप्याचं स्वप्न बनतं. बाशुदांच्या या लाडक्या अॅडम (अमर) आणि ईव्ह (मानसी)-द्वारे एकच गोष्ट ते वारंवार सांगतात. 'गृहप्रवेश' जोडपे जुन्याच घरात नव्याने प्रवेश करतात आणि आजच्या काळात स्वप्न विसरून, पराभव स्वीकारून, वास्तवाला सामोरे जातात आणि सुखाचा नव्याने शोध घेतात.

### स्त्रीच्या नजरेतील कुटुंबपट

या चित्रत्रयीच्या निमित्ताने बाशुदांनी लग्न, कुटुंब आणि स्त्री यांना मध्यबिंदू मानून, एकाच ठिकाणी आखलेली (मात्र निरनिराळ्या रंगात) ही तीन वर्तुळं आहेत. पांढरपेशांच्या तत्त्वज्ञानाशी रेंगाळणारा दृष्टिकोन स्वीकारून बाशुदा या तिन्ही चित्रपटांतून पुन्हा पुन्हा तेच तेच सांगत आहेत. विवाह–कुटुंबाबरोबरच बाशुदांच्या चित्रपटात 'स्त्री'ला मध्यवर्ती स्थान आहे. तिच्या भोवतीच हा पसारा ते उभा करतात. तिच्या दृष्टिकोनातूनच त्याची मांडणी करतात.

स्त्रीच रोजचं जगणं ते अतिशय आत्मीयतेने, त्यातील बारकाव्यांसह, आकर्षक पद्धतीने दाखवतात. मात्र पुरुषांच्या कार्यालयीन जीवनाकडे नुसता निसटता कटाक्ष टाकतात. 'अनुभव'मध्ये अमरच्या वृत्तपत्रीय जीवनाचं अंग क्वचितच दिसतं. त्याच्या व्यक्तिरेखेस ते अनुकूल असूनही! इतकंच काय, 'गृहप्रवेश'सारख्या चित्रपटात पटकथेच्या दृष्टीने गरज असतानाही बाशुदा 'अमर'चं कार्यालयीन जीवन फारच थोडं दाखवितात. (उलट त्या गैरसोयीच्या घरात जितकी जागा अमर–मानसीचा डबल बेड व्यापते तितकीच जागा सबंध चित्रपटात या 'बेडसीन'ला मिळते) आणि दाखवलं तरी ते त्या तरतरीत सेक्रेटरीच्या व्यक्तिरेखा चितारण्यासाठी खर्च केलं जातं.

त्यामुळे फक्त 'स्त्री'च्याच दृष्टिकोनातून हे 'कुटुंबपट' तयार केले आहेत असं वाटतं. चित्रपटातील बहुताश तपशील हा स्त्री-जीवनाबाबत असतो. एक तर तिच्या स्वतःच्या संदर्भात किंवा पती अथवा दुसऱ्या कोणा पुरुषाच्या संदर्भात आणि तरीही आखून घेतलेल्या पांढरपेशी 'लक्ष्मण रेषे'च्या आतच ती वावरते. 'अनुभव'मधील उदाहरण पुरेसं आहे. 'अनुभव'मध्ये मीता विविधभारतीच्या आवाजाने जागी झालेल्या मुंबईच्या सकाळी गॅलरीतून डोकावते. समोर झोपडपट्टीतील आई-मुलाला ती पाहते. पुढच्याच क्षणी तिचा 'क्लोज अप' घेतला जातो. कॅमेऱ्याचा अँगल, ती पाहते त्यावर नसतो. रेंच्या 'अपुर संसार'मध्ये अपर्णा (शर्मिला टागोर) खिडकीच्या पडद्याला पडलेल्या भोकातून झोपडपट्टीतील आई-मुलाला न्याहाळते आणि रेंचा कॅमेरा त्या भोकातून आरपार

### संगीताची योजना

आशयानुरूप संगीत देण्याचा आणि चित्रपटाच्या प्रकृतीची मिळती–जुळती 'लय' साधण्याचा बाशूचे गुरू बिमल रॉय यांचा सतत प्रयत्न असायचा. म्हणूनच बिमल रॉयच्या चित्रपटात उत्कृष्ट गाणी, पार्श्वसंगीत यांच्या बरोबरीनेच प्रासंगिक आवाज, गोंगाट, स्तब्धता (संगीताच्या संदर्भात) यांना स्थान होतं. 'काबुलीवाला', 'मधुमती' त्यामुळे लयपूर्ण काव्यं ठरली. बाशूदाकडे हा आपल्या गुरूचा गुण जाणवण्याइतपत आहे.

'तिसरी कसम'मध्ये हे संगीत रंजनाच्या स्वरूपात येतं. त्यात थोडा व्यावसायिकतेचा भाग होता; पण 'अनुभव', 'आविष्कार' आणि 'गृहप्रवेश'मध्ये हे संगीत आशयाच्या मुशीत परिश्रमपूर्वक मिसळलेलं आढळतं.

'कोई चुपकेसे आंके...', 'मेरा दिल जो मेरा होता...' अशी गीता दत्तच्या आवाजातली (अनुभवातील) उडत्या चालीची मिठास गाणी तर कधी 'हंसने की चाहने कितना मुझे रुलाया है.' (आविष्कार) सारखं धीरगंभीर उदास गाणं देणारा कानू रॉय, हा या चित्रत्रयीचा संगीतकार. 'गृहप्रवेश' हा तसा त्याचा शेवटचाच चित्रपट!

कानू रॉयच्या मदतीने बाशूच्या चित्रपटातील पात्र एक तर गुणगुणत असतात किंवा त्याच्या चित्रपटातील नायक–नायिकाच्या घराशेजारीच एखादं गाणारं जोडपं राहात असतं आणि त्याचे गायन कुटुंबातील ताण-तणावाला पार्श्वभूमी देत असतात. 'आविष्कार'मध्ये 'बाबुल मोरा...' गाणारे जगजीत सिंग आणि चित्रा सिंग, तर 'गृहप्रवेश'मध्ये दिनेश ठाकूर आणि प्रियदर्शनी हे गाणारं जोडपं!

याशिवाय विविध भारती, गाड्यांचे आवाज किंवा उतू जाणारं दूध अथवा स्तब्धता त्याच्या दिमतीला कायमच असते. *

थेट त्या आई-मुलावर स्थिरावतो. इथे अपर्णाच्या मनात त्या मुलाविषयी निर्माण झालेली जवळीक सहजपणे स्पष्ट होते !

बाशू मात्र आपल्या व्यक्तिरेखाशी सलगी करण्याच्या नादात त्यांना अधिकच व्यक्तिनिष्ठ बनवतो आणि म्हणूनच त्याची तांत्रिक कलाकुसर विसरून त्यात ओंगळपणा नसतो, हे कबूल करूनही, बाशूचे चित्रपट एकारलेले वाटतात. एखाद्या नाजूक, कमनीय बांध्याच्या मुलीने न झेपणारा पोषाख करावा तसे त्यातील स्त्रीचं सौंदर्य जाणवूनही कुठं तरी खटकतं. बाशूच्या चित्रपटाचं हे असच होतं. म्हणूनच त्याच्या चित्रपटातील काही प्रसंग 'देखणे' असूनही आपल्याला ते माहिती असतानादेखील पुन्हा पुन्हा रंगवून सांगितले जातात.

एखाद्याच्या लग्नाला उपस्थित राहूनही लग्नघरची मंडळी किंवा ते नवं दाम्पत्य, (बहुधा तेच) लग्नानतर आपल्याला पुन्हा आवर्जून बोलावतं. आपण जातो. गप्पाच्या ओघात हळुच ते नवदापत्य आपल्याजवळ सरकतं आणि अतिशय नीटस वेष्टण असलेला एक 'अल्बम' आपल्यापुढं सरकवला जातो. हळुहळु त्या अल्बमची पानं उलटताना 'अय्या, तो होता की 'आणि' खरंच कसला लाजतोय मी' अशा वाक्याची छेडछाड सुरू होते- नकळत ते नवदापत्य नुकत्याच घडून गेलेल्या आठवणीत हरवतं. आपल्याला त्या आनंदात ओढले जाते. सुरवातीला आपण प्रतिसाद देतो; तसा दाखवणाऱ्यांचा उत्साह वाढतच जातो; पण त्याचा उत्साह अमाप असला, तरी काही क्षणांनंतर आपल्याला 'अल्बम' पाहण्याचा कंटाळा येतो. भराभर पानं उलटून आपण 'अल्बम' सोडून दुसरा विषय काढतो. बाशू भट्टाचार्य यांच्या या चित्रत्रयीबाबत नेमकं असच होतं ! □

## 'बोलके' चित्रपट की बडबड ?

गुलजारसारख्या संवादलेखकावर बाशूचे प्रेम, काव्यमय संवाद हा गुलजारचा हातखंडा. व्यक्तिगत जीवनात 'बडबड्या' आणि उचापत्या म्हणून प्रसिद्ध असल्यामुळं म्हणा, बाशुच्या चित्रपटातील पात्रं जरा जास्तच बडबडी असतात. मग त्या पात्राना न पेलणारे, न झेपणारे संवाद त्यांच्या तोंडी भरवले जातात. 'गृहप्रवेश'मध्ये मानसी आपल्या आठ वर्षांच्या मुलासमोर अमरला 'घर खरीदण्याची' इच्छा व्यक्त करते. तर ते आठ वर्षांचं पोरगं 'घर कैसे खरीदा जा सकता है' असा न पेलणारा प्रश्न विचारतं आणि त्याला न झेपणारं उत्तर मिळतं, 'मकान खरीदा जा सकता है, घर तो नही!'

किंवा सपना (सारिका)ला अमर प्रेमाचं तत्त्वज्ञान सांगतो, 'नफरत एकतर्फा हो सकती है, क्रोध, करुणा, रहम एकतर्फा जैसा प्यार कभी एकतर्फा नही हो सकता है' किंवा 'जो हम नही जानते वो 'वो' जानता है' अशासारखे संवाद सातत्याने आहेत. 'अनुभव' व 'आविष्कार'मध्ये अशीच संवादाची जुगलबंदी आढळते. 'आविष्कार'मध्ये तर मुक्तछंदातल्या लांबलचक कविताच आहेत ! हे सारे संवाद लेखकाचे वाटतात, त्या त्या पात्रांचे वाटत नाहीत किंवा त्या व्यक्तिरेखेला शोभत नाहीत. सर्वजण हे बुद्धिगम्य संवाद फेकतात, त्यामुळे ते एकसुरी वाटतात ! मात्र जिथे संवाद नसतात तेच प्रसंग अधिक 'बोलके' झालेले आढळतात. *

## 'काटकसर' आणि 'बचत'

'तीसरी कसम' या व्यावसायिक चित्रपटात दिग्दर्शन केल्यानंतर बाशू स्वत:च निर्माता बनला आणि 'उसकी कहानी' द्वारे आटोपशीर निर्मितिखर्चाच्या 'लो बजेट' चित्रपटांची त्याने मुहूर्तमेढ केली. 'उसकी कहानी' हा फक्त ६० हजार रुपयात बनविलेला चित्रपट आहे, यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही !

याबाबत बाशू म्हणतो की, 'मी माझ्या कलाकाराना आगाऊ पैसे कधीच देत नाही. चित्रपट चालला तर मी त्यांना पैसे देतो. माझ्या चित्रपटात त्यांनी व्यावसायिक कलाकार म्हणून काम करावं असं मला कधीच वाटत नाही. कुटुंबातील एक घटक म्हणून त्यांनी माझ्या चित्रपटात काम करावं अशीच माझी अपेक्षा असते आणि त्यांना मी जे पैसे देऊ शकेन त्याला त्याच्या दृष्टीने कवडीइतकी किंमत नाही ! मग ते पैसे त्यांना देण्यापेक्षा कॅमेरामन अथवा तंत्रदिग्दर्शकाला देणे मला अधिक सयुक्तिक वाटतं आणि माझ्या चित्रपटातील सर्वच कलाकारांना हे मान्य आहे.'

आणि खरोखरीच बाशुदाच्या चित्रपटातील राजेश खन्ना, संजीवकुमार, शर्मिला टागोर; सारिका यांना त्यांनी पैसेही दिलेले नाहीत, म्हणूनच 'अनुभव' १ लाख ८५ हजार या आटोपशीर खर्चात तयार होऊ शकतो. काटकसर आणि बचतीचं हे गणित बाशुदांना पक्कं जमलंय हेच खरं ! *

## (बाशुदांची चित्रकारकीर्द)

१९६६ तिसरी कसम
(राष्ट्रपतीचे सुवर्णपारितोषिक)
१९६७ उसकी कहानी
(बंगाल फिल्म जर्नालिस्ट असोसिएशनचे पारितोषिक)
१९७२ अनुभव
(राष्ट्रीय पारितोषिक)
१९७४ आविष्कार
१९७५ डाकू
(एकाच ठिकाणी प्रदर्शित)
१९७६ तुम्हारा कल्लू
(दोन ठिकाणी प्रदर्शित)
१९७६ संगत
(अजूनही डब्यात)
१९७९ गृहप्रवेश
१९८० मधुमालती
आनंद महल
(सकलन टेबलावर)

अपूर्ण चित्रपट :
(१) आधे अधुरे
(मोहन राकेश याच्या नाटकावर आधारित)
(२) असमाप्त कविता
(फक्त निर्माता म्हणून)
स्पर्श (दिग्दर्शक : सई परांजपे)

आगामी :
स्मशान
लघु चित्रपट (दूरदर्शनासाठी)
(१) ध्येय सादा
(२) Know yet not Known *